रविवार, ५ फेब्रुवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१६४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 5 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-164 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5




# दारुला शिक्षा कधी होणार ?

## पद्मश्री डॉ. अभय बंग यांचा रोकडा सवाल




आधुनिक केसरी न्यूज

**प्रमोद पाणबुडे**

**वर्धा :** दारूमुळे कित्येक वर्ष समाजहित धोक्यात आले आहे. मात्र दारूला शिक्षा कधी होणार? हा प्रश्न अद्याप अनुत्तरीत असल्याची भावना गडचिरोली येथील शोधग्रामचे पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केली. वर्धा येथील महात्मा गांधी साहित्य नगरी परिसरात सुरु असलेल्या ९६व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनात शनिवारी पार पडलेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते.

डॉ. अभय बंग पुढे म्हणाले की,

व्यक्ती स्वातंत्र्य म्हणून उनाड इच्छा विरुद्ध समाजहीत असा दारूचा प्रश्न आहे. एकट्या महाराष्ट्रात दरवर्षी दोन लाख कोटींची दारू फस्त केली जाते. महाराष्ट्र हे मद्यराष्ट्र झाले आहे. दारूमुळे भारतीय स्त्री वैधव्याची इच्छा करत आहे. मात्र, राजकारण आणि निवडणुका दारुवर विसंबून असल्याने मद्य प्रश्नांच्या समस्येला बगल देण्यासाठीच दारूबंदीचा बागुलबुवा उठवल्या जात असल्याचा आरोप डॉ. अभय बंग यांनी केला.

आचार्य विनोबा भावे सभामंडपात पार पडलेली ही मुलाखत मुक्ता पुणतांबेकर, विनोद शिरसाठ आणि विवेक सावंत यांनी घेतली. सेवाग्राम ते शोधग्राम असा प्रवास उलगडताना डॉ. अभय बंग यांनी महाराष्ट्रातील मराठी साहित्यिकांवरही काही आक्षेप घेतले. महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्यावर विशेष असा प्रकाश मराठी साहित्यिकांकडून टाकण्यात आलेला नाही. स्वातंत्र्य युद्धाच्या काळात विविध विचारक, वेगवेगळे सेनापती इथे घडले. मात्र, या महाभारताचा वेध घेण्यात मराठी साहित्यिक अपयशी ठरले. हा इतका मोठा रंजक काळ ललित आणि बुद्धीनिष्ठतेने आता तरी सकारावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महाष्ट्रातील ज्ञानोबा, तुकोबा, विनोबा हे सर्वकालिक महान साहित्यिक घडले. साहित्यिकांसाठी आनंदी, देहू आणि वर्धा हे साहित्य पंढरी व्हावे, अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. संचालन प्रा. अभय दांडेकर यांनी केले तर आभार रंजना दाते यांनी मानले.

# नांदेड विद्यापीठाच्या 'सिनेट' निवडीत शिंदे गटाला ठेंगा

## सर्वच्या सर्व निवडीवर भाजपचे वर्चस्व; जाणूनबुजून की आणखी काही ?

आधुनिक केसरी न्यूज

**शिवाजी निरमनाळे**

**लातूर :** नांदेड विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापन परिषद, अधिसभा सदस्य निवडणुका पार पडल्यानंतर मा.राज्यपाल महोदयांना एक व्यवस्थापन परिषद आणि दहा अधिसभा सदस्य निवडण्याचा अधिकार असतो. मात्र, राज्यपालांनी कुलगुरू महोदयाना पाठविलेल्या यादीत एकही व्यक्ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचा नाही यामुळे कार्यकर्त्यांत प्रचंड असंतोष निर्माण झाल्याचे दिसत आहे. हा प्रकार जाणूनबुजून करण्यात आला की आणखी काय? हे मात्र लवकरच स्पष्ट होईल. दरम्यान, ऐनवेळी अर्थात व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीच्या दिवशी दोन नाव राज्यपालांनी नामनिर्देशित केली, त्यातही भाजप आणि संघ विचारसरणीच्याच व्यक्तींना संधी दिल्याने शिंदे गटाला धक्का बसला. ऑगस्ट 2022 मध्ये नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद आणि इतर प्राधिकरण यांच्या सदस्यांचा कार्यकाळ संपला. त्यानंतर नोव्हेंबर 2022 मध्ये निवडणुका पार पडल्या. निवडणुकीतही मतदार यादी आणि इतर गोष्टीत बराच सावळा गोंधळ पाहायला मिळाला. निवडणुका पार पडल्यानंतरही निवडणूक आणि मतमोजणीमध्ये अंतर (गॅप) ठेवल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्यामुळे अनेकांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा विद्यापीठाचे कुलसचिव यांच्यावर ठपका ठेवला. मात्र, त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. या निवडणुकीनंतर एक व्यवस्थापन परिषद सदस्य आणि एकूण दहा अधिसभा सदस्य नेमण्याचा अधिकारी कुलपती म्हणून राज्यपाल महोदयांना असतो. राज्यपाल महोदयांच्या कोट्यातून सदस्यांची नावे जाहीर करण्यासाठी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी नावांची शिफारस करावी लागते. सध्याच्या सरकारमध्ये उच्च आणि तंत्रशिक्षण खाते भाजपकडे आहे. त्यामुळे भाजपने एक व्यवस्थापन परिषद आणि दहा सिनेट सदस्य यांची नाव आपल्या मर्जीतील लोकांची पाठविली आहेत. मा.राज्यपाल यांनीही या नावांना पुढे सारून या निवडी केल्या आहेत. 11 सदस्यांत एकही नाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नाही, हे आश्चर्य वाटणारे आहे. दरम्यान, केवळ नांदेड विद्यापीठातच असा प्रकार झालाय असे नाही तर सर्वच विद्यापीठात आमच्या गटाला बाजूला सारण्यात आल्याचे शिंदे गटाचे कार्यकर्ते बोलत आहेत.

**उद्धव ठाकरेंना नाव ठेवता, शिंदे साहेब तुम्ही काय करता ? :** भाजपने आपल्या पाठीत खंजीर खुपसला असे सांगून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षांसोबत महाविकास आघाडी स्थापन करून नवे समीकरण महाराष्ट्र राज्यात आणले . त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस आपल्याला डावलत आपल्या कार्यकर्त्यांना बळ देत आहे, असा आरोप करून एकनाथ शिंदे यांनी बंड केला आणि भारतीय जनता पक्ष हा आपला नैसर्गिक मित्र असल्याचे सांगून सत्ता स्थापन केली . मात्र, आता उघड उघड भारतीय जनता पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री असलेल्या शिंदे गटाला डावलले जात असताना शिंदे साहेब काय भूमिका घेणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे .

# ज्ञानेश्वराच्या डॉक्टरकीचा अवघ्या वसतीला आनंद

## परिस्थितीशी झगडून मुलाला डॉक्टर बनविणाऱ्या आईची कहाणी

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** परिस्थितीला दोष देत जिंकण्याच्या




स्पर्धेतून माघार घेणारी माणसं आज पावलोपावली भेटतात. पण परिस्थितीशी झगडणाऱ्या कुटुंबाला यशाचा पांडुरंग कधी ना कधी पावतोच याची प्रचितीच आमच्या लेकराने आमच्या पदरात टाकली आहे. उदनिर्वाहापासुन ते लेकरांच्या शिक्षणापर्यंत अनेक कठीण परीक्षा या परिस्थितीने घेतल्या. पण आम्ही कधी हात टेकले नाहित. उलट परस्थितीलाच नमतं घ्यावं लागलं. ज्ञानेश्वरच्या जिद्दीपुढे परस्थितीतच हतबल बनून राहिली आहे. ज्ञानेश्वरच्या डॉक्टर होण्यानं परिस्थिती हारली आणि आमची लेकरं जिंकली. याचा आम्हाला आणि आमच्या गावकऱ्यांना खुपच अभिमान आहे. असेच उदगार डॉ. ज्ञानेश्वरची आई सुनिता गायकवाड यांनी काढले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळै येथील ज्ञानेश्वर रमेश गायकवाड या तरूणाने परिस्थितीशी झगडा देत डॉक्टर या पदाला गवसणी घातली. याबाबत त्याची आई सुनिता रमेश गायवाकड या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या कि, परिस्थिती गरीब असल्याने मुलांच्या शिक्षणामध्ये अनेक अडचणी आल्या. पण त्या परिस्थितीलाही तोंड देत ज्ञानेश्वर शिकत आहे. कारण त्याला आई वडीलांच्या कष्टाची जाणीव होती. पुढं खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने स्वतः हुशार असतानाहि मोठ्या मुलगा विकासने शिक्षण थांबवून ज्ञानेश्वरला शिक्षणासाठी प्रेरणा दिली. वेळोवेळी नातेवाईकांसह अनेकांनी मदत केली. मार्गदर्शन केलं. त्यामुळेच आजचा हा आनंदाचा क्षण पहावयास मिळत आहे. गरीब परिस्थितीला तोंड देत असताना त्याचा कधीही बाऊ न करता जिद्दीने डॉक्टर झालेला ज्ञानेश्वर आणि भावासाठी आपल्या शिक्षणाचा त्याग देणारा विकास अशा लेकरांचा अभिमान वाटवा तेवढा थोडाच आहे. तर ज्यांनी मार्गदर्शन केले, सहकार्य केले अशा नातेवाईकांचे ऋण शब्दाने तर फिटणारच नाहीत, असे ज्ञानेश्वरच्या आई सुनिता गायकवाड यांनी भावुक होवून सांगितले. यावेळी डॉ. ज्ञानेश्वरचे वडील रमेश गायकवाड यांनीही मुलांचे यशाबाबत कौतुक केले. डॉ. ज्ञानेश्वर गायकवाड यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण रोपळे येथेच झाले. त्यानंतर त्याने आर.ए. पोतदार मेडिकल कॉलेज, पुणे तेथे बीएएमएस केले आहे. तर सध्या तो सीएआरसी मेडिकल कॉलेज पुणे येथे एमडीचे शिक्षण घेत आहेत. डॉ. ज्ञानेश्वर यांचे हे यश परिस्थितीशी झगडून यशस्वी होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या अनेक तरूणांसाठी यातून प्रेरणाच मिळणार आहे.

**त्यागी भावंड आणि मदतगार गावकरी**

आजच्या जमान्यात भावंडांमध्ये अनेक कारणांवरून कलह पहावयास मिळतो . परंतु डॉ . ज्ञानेश्वरचे कुटूंब त्याला अपवाद ठरले असून ज्ञानेश्वरच्या शिक्षणसाठी मोठा भाऊ विकासने आपल्या शिक्षणाचा त्याग केला अशी त्यागी भावंड आज अपवादानेच पहावयास मिळतात . तर नातेवाईक व ग्रामस्थांनी त्याला मदत करून एक सामाजिक संदेशच दिला आहे . यामुळे मदत करणारे नातेवाईक, त्यागी भावंडे यांचे कौतुक होत आहे .



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

शिकवणं किंवा शिकणं हे कसं असतं ते सांगताना प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर त्यांच्या शिक्षकांचं उदाहरण दिलं होतं . त्यांची शाळा साधी मराठी माध्यमाची होती. पण त्यांना जे विज्ञानाचे शिक्षक, भूगोलाचे शिक्षक मिळाले होते, त्या शिक्षकांनी त्यांना केवळ वर्गाच्या चार भिंतीत शिकवलं नाही. भूगोलाचे शिक्षक त्यांना पर्यावरण, समुद्र इ शिकवताना सहलीला म्हणून बाहेर घेऊन जात. तेथे पर्यावरणाच्या, समुद्राच्या निरीक्षणातून त्यांचे शिक्षण घडत होते.

भूगोल शिकता शिकता पक्षी जगत, वनस्पती इ बद्दल सुद्धा शिकायला मिळत असे. खरा शिक्षक तोच असतो जो विषयांची एकमेकात सांगड घालतो. मी फक्त भूगोलाचा शिक्षक आहे असे म्हणून त्याला चालणार नाही. त्यांचे विज्ञानाचे शिक्षक त्यांना साबण बनवण्याची प्रक्रिया समजावून देताना साबणाच्या कारखान्यात घेऊन गेले. तिथे मुलांनी ती सगळी प्रक्रिया आपल्या डोळ्यांनी अनुभवली. बहिर्गोल भिंगातून प्रकाशकिरण एकत्र केले की त्यांची शक्ती वाढते. ते एकवटले की कागद सुद्धा जाळू शकतात. हे त्यांच्या शिक्षकांनी त्यांना वर्गाच्या बाहेर नेऊन सांगितले. मुलांना तो प्रयोग करून दाखवला. त्यांनाही अनुभव घ्यायला लावला. दुसऱ्या एखाद्या शिक्षकाने या गोष्टी वर्गातही शिकवल्या असत्या. पण मग ती झाली असती केवळ माहिती. मुलांनी घेतला तो प्रत्यक्ष अनुभव. आणि जे ज्ञान अनुभवातून येते, ते जणू वज्रलेप होते. मग परीक्षेची भीती बाळगण्याची गरज नसते. शिकणं ही प्रक्रिया आहे. कोणतीही प्रक्रिया म्हटलं की त्याला अनुसरून काही गोष्टी येतातच. तसं शिकणं ही प्रक्रिया जेव्हा घडते तेव्हा जो शिकतो आहे त्याला काही तरी अनुभव देणं किंवा त्याला स्वतःला काही अनुभव येणं, त्यामधून त्याला जी काही जाणीव प्राप्त होते, ती म्हणजे ज्ञान किंवा शिकण्याची प्रक्रिया म्हणता येईल. खरं तर शिकणं म्हणजे अनुभवातून शहाणं होत जाणं. हे अनुभवांती शिकणं वेगळं आणि शाळा कॉलेजात जाऊन जे आपण शिकतो ते वेगळं. **क्रमशः**



## आनंदी पहाट

## सामाजिक बांधिलकीचे भान आवश्यक

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. एक प्रकारे आपल्या बांधिलकीमुळे सामाजिक कुटुंबाचीच, नवीन नात्यांचीच निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व सामाजिक कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो. आपल्या भागाचे, वाट्याचे, नावचे, कर्तव्याचे भान ठेवून सहजीवनात सहभागी होणे महत्वाचे असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते.

## माणूस खरंच माणूस राहिला का ??

आधुनिक केसरी

होय राहिला!!! कारण अजूनही त्याला दोन पाय, दोन डोळे, वाणी, बुद्धी आहेत शिल्लक. निदान काही ठिकाणी तरी माणसातली माणुसकी शिल्लक आहे. त्यांच्या माणुसकीवरच हे जग धावते. एखाद्या कठीण प्रसंगात जर आपल्याला कोणी मदत केली तर आपण सहज म्हणतो अजूनही जगात माणुसकी शिल्लक आहे. माणुसकी टिकावी म्हणून कुठेतरी आपण आपला थोडासा वेळ संत सज्जनांच्या

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-60

सहवासात घालवला पाहिजे. निदान चांगले सुविचार तरी रोज वाचावेत. जेणेकरून आपल्या विचारात आणि आचारात थोडा बदल होईल. माणूसकी आपल्याजवळ राहील .आजकालची मुलं कशी वागतात? असं सर्वांनाच आपण दोष देणार नाही. पण काही तरुण मुलं कसे वागतात ?लहानशा गोष्टीसाठी खून ,मारामाऱ्या, भांडण... हे काय?? जीवन इतकं सहज मिळतं का ?घनाघाती घाव घालून खून करतात. झाडं कापावी तसं माणसं कापतात. सख्या आई-वडिलांना भावा बहिणीचा मुला-मुलींचा सुद्धा खून करतात. अरे काय हे??? माणसं आहात की पिशाच्च! काय होतंय हे सगळं? कुठेतरी आई-वडिलांचे संस्कार कमी पडतात का? असं वाटायला लागते. घरात रोज चांगल्याच विषयावर चर्चा व्हावी. जेवताना आपण इतरांचे स्फोटक विषय काढून घास घेऊ नये. आपल्या अन्नावर त्याचा परिणाम होऊन कदाचित आपल्यातील माणुसकी लोप पावेल. आपली संगतही चांगली असावी .मुलांची पण.. आपणही तिकडे लक्ष द्यावे. मुलं लहान असतात. त्यांना अनुभव कमी असतो. चार गोष्टी हळुवारपणे त्यांना समजावून सांगाव्यात. संगतीचा परिणाम सुद्धा खूप महत्त्वाचा असतो. केळीच्या झाडा शेजारी बाभळीचे झाड असेल तर ते केळीचे पान फाडतात .पण केवड्याचे झाड असेल तर त्याचा सुगंध सर्वदूर पसरतो. माणुसकी जपून या...

## एक गरुड आणि एक घुबड

आधुनिक केसरी

एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले.घुबड गरुडास म्हणाले, 'गडया ! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल, तर ती दुसऱ्या एखादया पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील, अशी मला भीति वाटते,' गरुड म्हणाला, 'खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.'
घुबड म्हणाले, 'ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.' पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांजकडे पाहून तो म्हणाला, 'किती घाणेरडी, कंडाळवाणी आणि कुरूप पिल्ले ही ! आपली पिल्ले फार सुंदर असतात, म्हणून घुबडाने सांगितले आहे. तेव्हा, ही घुबडाची पिल्ले खास नव्हते. यास मारून खाण्यास काही हरकत नाही.' असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला! आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, 'गडया ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.' गरुड म्हणाला, 'मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे. तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखादया पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?'तात्पर्य – स्वतःसंबंधाची खरी हकीकत लपवून ठेवून, भलतीच हकीकत सांगणारा मनुष्य शेवटी आपणास संकटात पाडून घेतो.

## निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**अनंत फंदींचे म्हणणे ऐका- वर्म काढून शर्मायाला लावू नका. तुमच्या कुटिल बोलण्याने तुम्ही तुमचे शत्रू वाढवित आहात, हे विसरू नका.**

**स्पर्धेत जिंकायचे असेल तर स्पर्धकास कमी लेखू नका. तुमच्या क्षमता वाढवा. स्पर्धकावर टीका करून त्याला त्याच्या उणीवा दाखवू नका.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**माया जग स्थूल है, सो सब बाहर देख ।**
**सुक्षम माया मनहिं है, अन्तर घट में पेख**
**।।२६।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
आपण जे बाहेर पाहातो, ते सगळे जग ही स्थूल माया आहे. सूक्ष्म माया मन आहे , तीला आपल्या शरीरात पाहावे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

या समासात समर्थांनी सांगितले आहे की वेदाने पूर्व पक्ष मांडला. त्यांच्या अंगी ब्रम्हज्ञान करून देऊन जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्याला कोणीही विचारणार नाही. जीवाला मुक्त करण्याचे



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सामर्थ्य वेदांच्या ठिकाणी आहे यांत शंकाच नाही. महापुण्य पदरी असेल तरचं वेदांचा अभ्यास होईल असे 30व्या ओवीत प्रत्यक्ष समर्थ आपल्याला सांगतात. पूढे असेही म्हणले आहे की एक पूर्ण श्लोक किंवा अर्धा श्लोक किंवा त्यातील एक भाग किंवा नुसता एक शब्द जरी मनापासून श्रवण केला तर अनेक दोष नाहींसे होतील. वेद,पुराण,शास्त्र यांचा श्रवणभक्तिने सुध्दख माणुस पवित्र बनून जातो. व्यासांनी भागवत ग्रंथात हेही सांगितले आहे. मुक्त व ज्ञानी पुरूष देहाने जगात वावरत असताना आपली ब्रम्हाकारता ढळूं देत नाहीत.आपण आता बद्धमुक्तनिरूपण समासाच्या शेवटाकडे आलो आहोत. स्वस्वरूपानुभव हे ज्ञानी पुरूषाचे प्रधान लक्षण आहे. पण नुसत्या देहावरून असे अनुमान काढणे योग्य होणार नाही. मानवी मनात अहंकार हा फार मोठा शत्रु आहे. हा अहंकार माणसाला स्वस्थता मिळू देत नाही. अहंकारावर विजय मिळवण्यासाठी परमार्थ साधना आवश्यक असते.

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥**
**तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥३॥**
**त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥**
**मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥**
**तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥३॥**
**न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥१॥**
**मानेल त्या तुम्ही अइका स्वभावें । मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥२॥**
**तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गती जाली आतां ॥३॥**
**न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । म्हणउनी लाज सांडियेली ॥१॥**

## काळजीचे मूळ कर्तेपणात आहे

आधुनिक केसरी

आनंद पहायला आपल्याला दुसरे कुठे जावे लागते का ? नाही. जो स्वतःच आनंदरूप आहे त्याने आपण होऊन ' मी दुःखी आहे ' असे मानून घेतले आहे. एक जण आपले तोंड आरशात पहायला गेला, पण त्याला ते दिसले नाही. त्यावर दुसरा एकजण म्हणाला, ' मी दाखवितो.' असे म्हणून आरशावर मळ बसला होता तो पुसून, त्याने आत पहायला सांगितले, तेव्हां तोंड स्वच्छ दिसले. त्याचप्रमाणे साधू लोक करीत असतात. ते आपल्याला सांगत असतात की तूच ब्रह्मस्वरूप आहेस; म्हणजे तू स्वतःसिद्ध आणि आनंदरूप आहेस. परंतु आपण काय करतो की हा प्रपंच माझा आहे असे समजतो. आणि त्यामुळे त्यातले सर्व सुखदुःख आपण आपल्यावर लादून घेतो. ज्याने तो उत्पन्न केला त्याला तो रक्षण करण्याची शक्ति असते आणि तो ते आपल्या इच्छेप्रमाणे करीतही असतो; पण तिथे आपल्यावर कर्तेपणा ओढून घेऊन आपण सर्व काळजी करीत बसतो. वास्तविक आपल्या हाती काय आहे ? परमात्म्याला काय करायचे ते तो करीत असतो, आपण मात्र काळजी करून शीण करून घेत असतो. म्हणूनच काळजी सोडून देऊन आपण भगवंताला शरण होऊन राहावे. आपण त्याचे होऊन राहिले म्हणजे आपल्याला सुखदुःख होत नाही, आणि मग आपल्याला त्या आनंदाचा लाभ मिळतो.



काळजी ही मोठी विलक्षण असते. एका माणसाला आपल्या मुलाला चांगली नोकरी लागावी ही काळजी होती. पुढे त्याच्या मनाप्रमाणे नोकरी लागल्यावर, त्या मुलाच्या लग्नाची काळजी सुरू झाली. काही दिवसांनी लग्न झाले; मग पुढे सून चांगली वागत नाही म्हणून काळजी लागली. नंतर तिला मूल होईना म्हणून काळजी लागली. काही दिवसांनी तिला मूल झाले; त्या मुलाला फिट येऊ लागली म्हणून त्याला काळजी लागली. शेवटी आणखी काही दिवसांनी मुलाची फिट बरी झाली. पण त्या म्हातार्‍यालाच फिट्स येऊ लागल्या. आणि अखेर काळजी करीत करीतच तो मरून गेला. काळजी ही आपल्याला भगवंतापासून खरेच काळाच्या स्वाधीन करते. आपण काळाच्या स्वाधीन झालो की आपली बुद्धी भ्रष्ट होते. खरे म्हणजे काळजीचे मूळ माझेपणात आणि कर्तेपणात आहे, आणि खुद्द कर्तेपणाचे मूळ भगवंताच्या विस्मरणात आहे. व्यवहारी माणसे मोठी हुशार असतात; भगवंताला साक्षी ठेवून काळजी करतात ! हा तर त्याच्याहिपेक्षा मोठा गुन्हा आहे. 'काळजी लागणे स्वाभाविक आहे ही कल्पनाच आधी मनातून काढून टाकली पाहिजे. आपली काळजी का सुटत नाही ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. काळजीने आपल्याला धरण्याऐवजी आपणच काळजीला घट्ट धरून ठेवतो, तर मग ती सुटणार कशी ? ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजीचे कारण उरत नाही. **आजचे बोधवचन आहे - संकट आले तर काळजी करू नये. भगवंत करतो ते आपल्या हिताचे करतो ही दृष्टी ठेवावी.**



आसारामबापूची उलटी पावले
पान ५

आधुनिक केसरी




प्रकाशजी सत्तेच्या तडजोडीचं गणित चुकलं पान ६

रविवार, ५ फेब्रुवारी २०२३



# लोकांच्या प्रेमामुळे इतर पदांचा मोह गळून पडतो

## पंकजा मुंडे : मीराबाई संस्थानच्या रौप्य महोत्सवी सप्ताहाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मीराबाई संस्थानच्या मठाधिपती राधाताई महाराज यांच्या पंचवीस वर्षांची साधना आणि कष्टातून हा गड महिलांची पंढरी झाला आहे. महंत महिला असल्याने त्यांच्या बद्दलचा वेगळा विश्वास आहे. अन्यथा गडाबद्दलचा माझा अनुभव काही चांगला नाही. लोकांचे प्रेम मिळाले की इतर पदांचा मोह गळून पडतो असे मत भाजपच्या सचिव पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले. तर धर्मसत्ता व राजसत्ता एकत्र राहिल्यासच समाजाचा विकास होतो असे स्पष्टीकरण देत मीराबाईचा गड कायम पंकजा यांच्यासोबत राहील अशी ग्वाही महंत राधाताई महाराज यांनी दिली. रौप्य महोत्सवानिमित्त धार्मिक सप्ताहात राजकीय काला ही रंगला.

बीड जिल्ह्यातील महासांगवी (ता.पाटोदा) येथील संत मीराबाई गडावरील रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सात दिवस केवळ महिलांसाठीच्या अनोख्या सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. 3 फेब्रुवारी रोजी झाली. देशातील एकमेव महिला मठाधिपती राधाताई सानप महाराज यांनी आठ दिवस महिला शक्तीचा जागरच घातला. कीर्तनकारापासून पखवाज वादक, गायक, भजनी, टाळकरी सर्व महिलाच असल्याने या एकमेव सप्ताहाची विशेष नोंद झाली. महंत राधाताई महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर भाजपच्या सचिव पंकजा मुंडे यांना या वर्षीचा कर्मयोगिनी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश



धस, बाळासाहेब आजबे, भीमराव धोंडे, ह.भ.प.रंधवे बापू यांच्यासह सर्वपक्षीय आजी-माजी पदाधिकारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना महंत राधाताई महाराज यांनी मीराबाई संस्थानच्या पंचवीस वर्षातील कठीण प्रवास सांगत धर्मसत्तेबरोबर राजसत्ता असेल तरच समाजाचा विकास होतो हे स्पष्ट केले.

पंकजा मुंडे यांनी सत्तेच्या काळात मदतीचा हात दिला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी मोठे योगदान दिले. त्यांचे राजकीय भविष्य उज्ज्वल असुन मीराबाईचा गड कायम त्यांची पाठराखण करील अशी ग्वाही त्यांनी दिली. तर पंकजा मुंडे यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले आणि मीराबाई संस्थान स्थापन करुन धार्मिक क्षेत्रातही महिलांना स्थान दिले. अत्यंत कमी वयात राधाताई यांच्यावर संस्थानची गादी चालवण्याची जबाबदारी आली. परिश्रम आणि कष्टातून त्यांनी संस्थानाचा विकास करुन स्त्री शक्तीचा जागर केला आहे. महिला असताना कमी वयात धार्मिक गादीचा वारसा चालवणे हे सोपे काम नाही. राजकारणातही वारसा चालवताना वाट तशी काटेरीच आहे. सत्तेच्या काळात सर्वच धार्मिक गडांना मदत करता आली. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर आठ वर्षे लोटली तरी लोकांचे जाईल तिथे अलोट प्रेम मिळतं. त्यामुळे लोकांचे प्रेम मिळाल्यानंतर इतर कोणत्यायही पदांचा मोह गळून पडतो. गडाबद्दल माझा अनुभव चांगला नाही अशी खंत व्यक्त करत मीराबाई संस्थानच्या महंत महिला असल्यामुळे त्यांच्याबद्दल वेगळा विश्वास असल्याचे मत ही त्यांनी व्यक्त केले. तर आमदार सुरेश धस यांनी संस्थानाच्या विकास कामांसाठी सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली. आमदार बाळासाहेब आजबे यांनी सभामंडपाच्या कामासाठी मंजुर झालेला पन्नास लक्ष रुपयांचा निधी लवकरच मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्तविकात माजी सभापती महेंद्र गर्जे यांनी मीराबाई संस्थान हे महिलांचे शक्तीपीठ म्हणून नावारुपाला आले आहे. त्यासाठी राधाताई महाराज यांनी राज्यभर फिरुन कीर्तनाच्या माध्यमातून या संस्थानाला सर्वदूर पोहोचविले आहे. त्यांच्या कष्टातुनच हे महिलांचे वैभव उभे राहिल्याचे स्पष्ट केले. यावेळी हजारोंच्या संख्येने महिला, भाविक उपस्थित होत्या.

**आष्टीतून निवडणूक लढवण्यास पाठींबा–आ. सुरेश धस**

देशात इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी आणि गोपीनाथ मुंडे यांनाही दुर्दैवाने निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला होता. एका पराभवाने काही होत नाही. कार्यकर्त्यांने 2024 ला पंकजा यांनी आष्टी मतदारसंघातून निवडणूक लढवण्याबाबत व्यक्त केलेल्या भूमिकेला आपले समर्थन आहे. मात्र तशी वेळच येणार नाही. परळी मतदारसंघात आता परिस्थिती पूर्णपणे बदलले आहे असे मतही आमदार धस यांनी व्यक्त केले. सप्ताहाला सर्वच राजकीय पक्षाचे परस्पर विरोधक व्यासपीठावर एकत्र आल्याने धार्मिक सप्ताहात राजकीय काला ही रंगला.

# विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनी कार्यकारणी जाहीर

## जिल्हा संयोजिका पदी उन्नती टिपले यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** जिल्ह्यात विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनीतर्फे कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, जिल्हा समन्वयकपदी उन्नती टिपले, जिल्हा संपर्कप्रमुख जानवी बावणे, नगर महाविद्यालयाच्या प्रमुख खुशी दांडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच आष्टी प्रखंड, समन्वयक, गौरी शर्मा, शहर समन्वयक, रेणुका वारस्कर , शहर समन्वयक. रचना शर्मा , महाविद्यालय प्रखंड दामिनी सालपेकर, सत्संग प्रखंड गुंजन चन्ने, आर्वी प्रखंड दहेगाव समन्वयक आरती उंबरकर, सहसमन्वयक अश्विनी दुर्वे, खरांगणा नगर समन्वयक.. अनिता चदने, हिंगणघाट प्रखंड संयोजिका पुष्पा ठाकूर, सत्संग नगर कविता बैस यांची नियुक्ती करण्यात आली. विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनीच्या वतीने बाल




लैंगिक अत्याचार, महिला अत्याचार, लव्ह जिहाद यासारख्या घटना समाजात घडत असल्याने अशा घटनांवर अंकुश लावण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या दुर्गा वाहिनी आता समोर आली आहे. अशा घटना आळा घालण्याच्या उद्देशाने वाहिनीची स्थापना करण्यात आली आहे.. ही नियुक्ती विश्व हिंदू परिषदेचे प्रांत उपाध्यक्ष हेमंत जांभेकर, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत धर्मप्रसार अटल पांडे, जिल्हा मंत्री विश्व हिंदू परिषदेचे बाळूराज पुरोहित यांनी केली आहे.

# भाजपला लोकांनी त्यांची जागा दाखवली

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लोकांनी भाजपला त्यांची जागा दाखवली. आपल्या महाराष्ट्राची ही परंपरा, वैचारिक बांधिलकी आपल्याला कायम ठेवायची आहे. त्यासाठी आपण सगळ्यांनी एकजुटीने काम करायला हवे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी सांगली - वाळवा येथे केले. 'एक तास राष्ट्रवादीसाठी, आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी' या संकल्पनेतून वाळवा तालुक्यातील साखराळे येथे आयोजित बैठकीमध्ये जयंत पाटील यांनी आज कार्यकर्त्यांशी संवाद साधला. २०१६ साली अर्थसंकल्प मांडत असताना मोदीसरकारने २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होणार



अशी घोषणा केली. मात्र शेतकऱ्यांचे उत्पन्न तीन पटीने घटले आहे ही वस्तुस्थिती आहे असेही जयंत पाटील म्हणाले. कर्नाटक राज्यातील दुष्काळी भागाला मदत करण्याची घोषणा केली याचा आम्हाला आनंदच आहे. मात्र हे निर्णय तेथील निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच घेतलेले आहेत. येथील भाजपला उभारणी देण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे, हे जनता जाणते असेही जयंत पाटील यांनी सांगितले. अनेक आर्थिक संकट देशासमोर आ वासून उभी आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. बेरोजगारीचा आलेख वेगाने वर चढतो आहे. सर्वांना घरे देण्याची घोषणा मात्र स्वप्नवत राहिली आहे असा टोलाही पाटील यांनी लगावला.

# सामाजिक दायित्व जपणारा अवलीया माणूस...!

## जाधव दांम्पत्याचा अनोखा उपक्रम : शैक्षणिक संकुलाची उभारणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सामाजिक बांधिलकी जोपासत इतरांच्या भल्यासाठी झटणारे फार कमी लोक आहेत... समर्पणाच्या वाटेवर अर्धि ओंजळ रिती कशाला म्हणुन परमार्थ जिवन समृध्द करीत विधायक कामाला झोकून दिल आहे...आदिवासी भागातील मूलासाठी शैक्षणिक संकूल उभारुन शिक्षणाची दारे खुले केली. सामाजिक दायित्व जपणारे जाधव दांम्पत्य आता आधारवड बनू पाहते आहे...याच कारणामुळे त्याचा वेगळा ठसा उमटविला आहे.

नागेश संभाजी जाधव हे मुळचे पिंपळढव (ता. भोकर) येथील रहिवासी असून घरीची परिस्थिती हलाकीची होती.पसाभर जमीनीवर घराचा डोलारा चालायचा.नागेशला लहानपणापासून शिक्षणाची ओढ होती. आपण स्वताह पायावर उभे राहून कौटुंबिक जीवन सूखी करण्याची ऊर्मी अंगी बाळगुन प्राथमिक शिक्षण पिंपळढव,मातुळ,कीनी, तर माध्यमिक शिक्षण धर्माबाद आणि परभणी येथे कृषी महाविद्यालयात एमएस्सी पुर्ण केल्यानंतर कृषी विभागात पैठण येथे कृषी सेवक पदिनिवड झाली.

त्यानंतर १९८७ मूंबई येथे पोलीस उपनिरीक्षक पदाची सूत्रे हाती घेतली. मायानगरीत खडतर प्रवास करीत ऊत्कृष्ट सेवा केल्याने पोलीस आयुक्त पदापर्यंत मजल मारली आणि त्यांच्या कुटुंबीयांचा पांग फिटला. आता सेवानिवृत्त झाल्याने फावल्या वेळात सामाजिक,




**नागेश संभाजी जाधव, सौ. मीना नागेश जाधव**

राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, क्षेत्रात काम करून जनतेची सेवा करण्याचा वसा घेतला नव्हे तर प्रत्येक्ष कामाला सुरुवात केली आहे.

**जन्मभुमीचा विसर पडुन दिला नाही :** नागेश नी मुंबईत चांगलाच जम बसविला असला तरी गावाकडील जिव्हाळा मात्र तुसभरहि कमी होऊ दिला नाही .पंचक्रोशीतील सर्व जातीधर्माच्या लोकांच्या अडीअडचणीत मोलाची साथ दिली त्यामुळे ते लोकप्रिय आहेत .गावातील सरपंचपद नातेवाईकांना मिळाल्याने त्यामाध्यमातून ग्रामस्थांची सेवा केली .हळूहळु राजकीय प्रवास सूरू करून परिसरातील राहिलेल्या समस्याचा निपटारा करून जनतेची सेवा करण्याचा त्यांचा मानस आहे .

**विधायक कामाना प्राधान्य :** सेवा मुक्ती नंतर घरात स्वस्त बसण्याऐवजी त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत विधायक कार्याला प्राधान्य दिले आहे . या कामात त्यांच्या पत्नी मीना जाधव ही त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत .गावालगत असलेल्या आध्यात्म गूरूकूल जामदरी टेकडी ( ता .भोकर )येथे नूकतेच या दांम्पत्यानी मोफत भोजन दान दिले असून भविष्यात हि अशीच सेवा करण्याचा संकल्प केला आहे .मूंबईतील बोरपाडा येथील आदिवास परिसरात शिक्षणाची सोय करण्यासाठी "नमिता एज्युकेशन अँन्ड वेल्फेअर सोसायटीची स्थापना करून महाविद्यालयीन शिक्षण आणि बदलापूर येथे आदिवासी मूलाकरीता शिकवणी वर्ग सुरू केले आहे . भविष्यात हि अशीच लोकोपयोगी कामे करण्यासाठी आम्ही झटत राहणार अशी मनाशी खुणगाठ बांधल्याचे आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे .



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# बहुजनांचे राजकारण

आधुनिक केसरी


**बहुजन हिताय-बहुजन सुखाय किंवा बहुजनांचे कैवारी अशी वाक्ये आपण सतत ऐकतो, वाचतो. तरीही यातील बहुजन म्हणजे नेमके कोण याचा अर्थबोध काही आपणास होत नाही आणि समजून घेण्याची आपली तसदीही नसते. बहुजन म्हणजे नेमका असा वर्ग जो त्रिकोणी समाजरचनेत सर्वात खालच्या स्तरावर आहे आणि जो संख्येने जास्त आहे. केवळ त्याच्याकडे संख्या आहे. बाकी काही देण्यासारखे असलेच तर मतदानाचा अधिकार तेवढा आहे. आणि यामुळेच तो कोणाच्या ना कोणाच्या गच्छंती लागतो. त्रिकोणाच्या वरच्या टोकाकडे जाण्याचा त्याचा चंग त्याला लोकशाहीत राजकारणाच्या रूपाने पूर्ण होईल असे प्रामाणिकपणे वाटते. यात प्रामाणिकता किती व भाबडेपणा किती हा चर्चेचा मुद्दा होईल.**

देश, काळ आणि समाजरचना कोणतीही असली तरी त्यात बहुजनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. हा वर्ग संख्येने

जास्त असल्यामुळे प्रश्नांची संख्या जास्त असणे साहजिक आहे. आपल्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी त्याचे सावज होणे अपेक्षित नसले तरी ते होते, हे निश्चित. बहुजनांचे राजकारण त्यांच्या आंदोलन, मोर्चे आणि लाँग मार्चच्या रूपाने आपल्यासमोर येताना दिसते. अगदी मूलभूत गोष्टीसाठी त्याला प्रचंड संघर्ष करावा लागत असल्यामुळे नवनिर्मितीकडे त्याचे हेतूतः दूर्लक्ष होणे साहजिक आहे. त्यामुळे जगण्याच्या पातळीवरील संघर्षातच त्याचा वेळ निघून जात असतो. बदलत्या जीवन जाणिवेनुसार आपली मुले आपल्यासारखे जीवन जगू नये, त्यांनी त्यांचे आयुष्य चांगल्या प्रकारे व्यतीत करावे यासाठी त्यांची धडपड असते. परंतु सभोवतालच्या वातावरणीय दाबामुळे बहुजनातील फार कमी मुले यातून बाहेर पडण्यात यशस्वी होतात. हे यश म्हटले तर वैयक्तिक असते आणि म्हटले तर सामूहिक असते. बहुदा व्यक्तिगत पातळीवर हे यश वैयक्तिक समजून प्रस्थापितांच्या साह्याने आपली

व्यक्तिगत जीवन पातळी उंचावण्याकडे त्याचा असलेला कल त्याची बहुजन नामक नाळ तोडण्यास यशस्वी होते. राजकारण करायचे ते स्वार्थकेंद्रित ही विचारधारा इतकी पक्की होते की, आपले आणि आपल्या समुदायाचे काही संबंध आहेत, हेच विसरायला होते. यातील प्रामाणिक नेतृत्वाला अगदी वाळीत टाकल्यासारखे किंवा त्याला काही कळत नाही इथपर्यंत बोलले जाते. बहुजनातील स्तरीकरणामुळे वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात वेगवेगळे मतप्रवाह दिसून येतात. त्यामुळे समाजात एकाच प्रश्नांविषयी वेगवेगळी आंदोलने आपणास पहावयास मिळतात. आपले केवळ प्रश्नच एक नाहीत तर त्या त्रिकोणी शंकूत आपले स्थान देखील सारखेच आहे, हा साक्षात्कारच त्याला मोठ्या

प्रवाहाशी जोडेल. केवळ आपले अस्तित्व दाखविण्याच्या हट्टापायी हरेक समाजगटाचे आंदोलन न काढता ही सर्व आंदोलने किंवा मोर्चे एकदिलाने आणि एकजुटीने काढले तर काही फलनिष्पत्ती हाती लागेल. उदा. महाराष्ट्रात निघालेले मराठा क्रांती मोर्चे आणि त्यास तोडीस तोड म्हणून निघालेले प्रतिमोर्चे हा भाग बहुजनांचे एकीकरण होऊ नये, यासाठी प्रस्थापित व्यवस्थेने रचलेले षडयंत्र होते, हे अद्याप आम्ही समजून घेत नाही. मुळात त्रिकोणाच्या भल्यामोठ्या खालच्या स्तरावर नेहमी काहीतरी खदखदत ठेवणे, हे वरच्यांसाठी नेहमीच फलदायी ठरणारे असल्यामुळे आपण त्याबरहुकूम नेहमीच खदखदत असतो. अगदी व्यक्तिगत पातळीवर सुद्धा बहुजनातील तरुणांमध्ये हे पहावयास मिळते आणि यातूनच पुढे त्याला गुन्हेगारीचे स्वरूप प्राप्त होते. ही मनातील आग किंवा घुसमट योग्य मार्गाने प्रवाहित करण्यात आपण यशस्वी झालो तर निश्चितच सकारात्मक बदल घडवून आणू शकतो. अन्यतः तुम्ही रस्त्यावर कितीही आकांडतांडव केला तरी आपल्या परिस्थितीत फार काही फरक पडणार नाही. बहुजनांच्या राजकारणाचे अध्वर्यू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या केवळ लेखणीतूनच नव्हे तर आपल्या प्रत्येक कृतीतून राजकारणाची दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. बहुजन म्हणवून घेणाऱ्या प्रत्येकाने बाबासाहेबांचे किमान हे विचार आत्मसात करावेत आणि आपला मार्ग निवडावा. बाबासाहेब एके ठिकाणी म्हणतात, प्रत्येक मनुष्याच्या अंगी



## क्षितिजापल्याड

कोणत्यातरी एका गोष्टीत दुसऱ्यास मागे टाकण्याची शक्ती स्वाभाविकच असते असा

स्वाभाविकपणे नियमच आहे असे म्हटले तरी चालेल. जर त्याला पद्धतवार शिक्षण मिळेल तर तो कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टीत दुसऱ्यास मागे टाकीलच टाकील. हे बाबासाहेबांचे विचार आज सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या बहुजनांच्या राजकीय नेतृत्वाने समजून घेतले पाहिजे. राजकारण करायचे म्हणजे आपण केवळ  निवडणुकीचे राजकारण डोळ्यापुढे न ठेवता ज्यायोगे आपल्या संबंधित लोकांची उपेक्षा थांबवून त्यांचा जीवनस्तर उंचावत नाही, तोपर्यंत आपले राजकारण यशस्वी होऊ शकणार नाही. व्यक्तिगत साधन संपन्नता ही काही मोठी गोष्ट नव्हे तसे असते तर बाबासाहेब या भारतातले अतिशय गर्भश्रीमंत व्यक्ती होऊ शकले असते. साम्राज्यशाहीशी हातमिळवणी करून जे हवे ते साध्य करणे हे त्यांच्यासाठी काही मोठी गोष्ट नव्हती. आपण बोध घेतला पाहिजे. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपण भांबावून जाऊ असे वातावरण भरगच्चपणे सभोवती आहे. अगदी खेळापासून ते सौंदर्यस्पर्धेपर्यंत आणि सवंग सिनेमापासून ते चमत्कारी बाबांपर्यंत आपल्यात दुफळी कशी माजेल, याची सर्व व्यवस्था नियमितपणे होत असते. यातील कोणत्याही प्रश्नांशी आपल्या जगण्यामरणाचे प्रश्न निगडित आहेत का? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःस विचारावा आणि मगच प्रतिक्रियावादी बनावे. आपल्या प्रतिक्रिया आपल्या विभाजनाची रूपरेषा निश्चित करत असतात. त्यामुळे ज्यांना बहुजनांचे राजकारण करायचे त्यांनी अधिक सजगपणे सर्व गोष्टींकडे पाहिले पाहिजे. आपण स्वतःला निश्चित कंपूत अडकवून न घेता अखिल समाजविषयक धोरण मुक्रर केल्याशिवाय आपली दखल कोणी घेणार नाही. फार तर अमक्या तमक्यांचे गल्लीतील राष्ट्रीय नेते होऊ. सर्वव्यापी

आणि सर्वसमावेशक भूमिकाच समाजाला न्याय मिळवून देऊ शकते. राजकारणातील दुहीच्या शापाचे धनी न होता सर्व समाजाला एकत्र आणण्यासाठी सतत प्रयत्नशील असणे आणि आपणांस काही लोकोत्तर कार्य करायचे हे भान सदोदित बाळगणे यातच बहुजनांच्या राजकारणाचे सौख्य सामावले आहे.



प्रा. डॉ. सखाराम वाघमारे
संपर्क क्र. ९६२३२२८५७५

# मानवतावादी थोर क्रांतिकारक : संत  रविदास


आधुनिक केसरी

**आज दिनांक ०५ फेब्रुवारी. समतावादी, क्रांतिकारक, थोर साहित्यिक, कवी, राष्ट्रीय संत - रविदास महाराज यांची जयंती, त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकणारा हा  खास लेख आपल्यासाठी.   महान संत रविदास महाराज यांच्या जन्म व मृत्युसी संबंधित कोणतीही ठोस तारीख उपलब्ध नसली तरी पुरावे व  वस्तुस्थितीच्या आधारे थोर संत रविदास महाराज यांचा जन्म माघ पौर्णिमेच्या सुमारास इ.स.१३९८  (तर काही तज्ञांच्या मते १४३३) मध्ये झाला असावा असे मानले जाते.**

जन्म-मृत्यु, तारीख व वर्ष याबाबतीत तज्ञांमध्ये एकवाक्यता आढळत नसली तरी त्यांच्या कार्य कर्तुत्वा संदर्भात मात्र कोणतेच दुमत नाही.
काही अभ्यासक संत रविदासांचा जन्म वाराणसी जवळ गोवर्धनपूर येथे तर काही जण मांडूर येथे झाला असावा असे मानतात. संतोखदास ( रघु ) व कारसा ( कालसा ) देवी या दांपत्याच्या पोटी रविदास नावाचे पुत्ररत्न जन्माला आले. ते सूर्याप्रमाणे तेजस्वी असल्याने त्यांचे नाव रविदास ठेवण्यात आले होते. पुढे हाच तेजस्वी पुत्र संपूर्ण भारतात संत रविदास या सुवर्ण अक्षरांनी ओळखला जाऊ लागला. संत रविदास हे भारतातील एकमेव असे संत आहेत की, ज्यांना संपूर्ण भारतात रूईदास, रूयदास, रैदास, रविदास, रोहिदास या सारख्या विविध सोळा नावांनी ओळखले जातात. त्यांची स्मारके, पुतळे, त्यांच्या नावाच्या धर्मशाळा देशभर पसरल्या आहेत.

पुरातन दंत कथेनुसर भूतलावर ज्या - ज्या वेळी अन्याय-अत्याचार, दुर्बुद्धी, अधर्म, दुराचार यासारख्या गोष्टीत वाढ होते, तेंव्हा त्याचा नाश करण्यासाठी भगवंत जन्माला येतात. त्याप्रमाणे हा विश्वास सार्थ ठरवत महाभारतात श्रीकृष्ण, रामायणात प्रभु रामचंद्र यांनी अवतार घेतला तर पुढे हेच काम संत तुकाराम, संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत रविदास यासारख्या संतांनी नवा अवतार घेत समताधिष्ठीत समाज रचनेचे कार्य चालू ठेवले. आकाश जसे असंख्य ताऱ्यांनी उजळुन निघते तसा अवघा देश संत रविदासांच्या विचार व कार्याने तत्कालीन परिस्थितीत उजळून निघाला होता. म्हणून संत रविदासांचे कार्य महान आहे.

स्वामी रामानंदांना संत रविदासांनी गुरु मानले होते. संत रविदासांच्या काळात जातिभेद शिगेला पोहोचला होता. म्हणून रविदासांनी भारतभर फिरून स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचे धडे देत भारताला अध्यात्मिक, सामाजिक व नैतिक उंचीवर नेण्याचे महान कार्य केले होते. तत्कालीन समाजव्यवस्थेतील शूद्र मानल्या जाणाऱ्या समाजाचा



प्रत्येक घटक सुखी व्हावा, यासाठी मानवी मनातील काम, क्रोध, द्वेष, मत्सर,आणि लोभ काढून प्रत्येक माणसात एकमेकांप्रती आदरभाव निर्माण व्हावा, सामाजिक आणि जातीय सलोखा निर्माण व्हावा यासाठी रविदासांनी आपल्या विचारांचा संपूर्ण भारतभर प्रचार आणि प्रसार केला. संत सेना, गुरू नानकजी, गुरू गोरखनाथ, संत नामदेव इ.महान संत गुरू रविदासांचे समकालिन होते. समकालिन संत कबीर रविदासांचे गुरुबंधू होते. सत् मार्गावरून चालण्यासाठी रविदासांनी केलेला उपदेश आजही अंगीकारण्यासारखा आहे. भक्तिमार्गातून आलेले त्यांचे साहित्य आजही लोकांना मोठ्या प्रमाणावर प्रभावित करते. ज्यावेळी मुस्लिम आक्रमक भारतात शिरले त्यावेळी त्यांनी लादलेला जिझीया कर, बळजबरीने धर्मांतर, मुल्ला-काझी, भट-पुरोहीत यांचे पुराणातील कर्मकांड, विषमता, शिक्षण बंदी, अंदाधुंद, बेबंदशाही व पारतंत्र्या विषयी आणि देशात अगोदरच असलेल्या जाती - पाती व अंधश्रद्धे बाबत रोखठोक बोलतांना
'हील मिल चलो जगत मे, फुट पडो दो नही,
फुट पडी माची तो, देश नष्ट हो जाई' असे विचार मांडले.

यावरून संत रविदासांनी एकजूट आणि देश प्रेमाबाबत राष्ट्रहिताला किती महत्व दिले होते, हे यावरून लक्षात येते. गुरु रविदासांच्या विचारधारेत मानव हाच धर्माचा केंद्र बिंदु असल्याने मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून मूर्ती पूजेच्या कर्मकांडावर कडाडून प्रहार केला होता. केवळ अन्नाची समस्या मिटली म्हणजे समानता आली असे होत नाही तर लहान-थोर, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य यांच्यात समानता येण्यासाठी रविदासांनी मानवतावादाचा जीवनभर प्रचार व प्रसार केला.

स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची बीजे रोवत मानवी कल्याणासाठी समजवादाची तुतारी फुंकणारे संत रविदास 'मन चंगा तो कठौती में गंगा' असे म्हणत चांगले कर्म करणाऱ्यांना घाबरण्याची काही गरज नाही. घाबरलात तर संपलात, गुलामी केलीत तर तुमच्यावर कोणी प्रेम करणार नाही. तेंव्हा सामाजिक सलोखा राखून,एकोप्याने राहून विकास साधायला हवा अशी शिकवण त्यांनी दिली. बहुतेक विद्वानांच्या मते शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देव यांच्याशी संत रविदास यांची भेट झाली असावी असे मानले जाते.  रविदासांच्या 41 कवितांचा (दोहे) समावेश सिखांचा धर्म ग्रंथ 'गुरुग्रंथसाहिब' यात आहे. संत रविदास हे जातीव्यवस्थेचे सर्वात मोठे विरोधक होते. हे त्यानी पुढे मांडलेल्या विचारातून सिद्ध होते.

संत रविदास म्हणतात, 'जाती जाती मे जाती है, जो केतन के पात' |
'रैदास मनुष ना जुड सके, जब तक जाती न जात' |

या विचार धारेतून संत रविदासांचा असा विश्वास होता की, मानवाने निर्माण केलेल्या जाती-पाती मुळेच माणूस माणसापासून दुरावला जात आहे. त्यामुळे माणसात फूट पडून देशाचे मोठे नुकसान होते. तत्कालिन परिस्थितित जातीभेद व वर्णभेदाच्या विरोधी लढाई लढत मानवी कल्याणासाठी आपली काया झिजविणाऱ्या या थोर समाज सुधारक, संत रविदासांचा मृत्यू 1527 ( तर काही तज्ञांच्या मते 1540) मध्ये राजस्थानातील उदयपूर जवळील चित्तोडगड येथे झाला. त्यांना विजयदास नावाचा एक पुत्र असल्याचे ही सांगितले जाते. त्याबाबत अधिक माहीती उपलब्ध नसली तरी, संत रविदासांच्या मानवी कल्याणाच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यावेळचे बावण राजे संत रविदासांचे शिष्य झाले होते. उच्चकुलीन महान हिंदू संत मीराबाई ह्याही त्यापैकीच एक रविदासांच्या शिष्या झाल्या होत्या तर डॉं.बाबासाहेब आंबेडकर संत रविदासांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी आपला 'द अनटचेबल' हा गं्थ रविदासांच्या चरणी अर्पण केला होता. यारून आपणास  संत रविदासांच्या कार्याची कल्पना येते. संत दासूगन महाराज, महीपती, संत तुकाराम, संत एकनाथ, संत मीराबाई, संत कबीर, नाभादास, गरीबदासजी अशा या महान थोर संत समाज सुधारक विद्वानांनी रविदासांच्या कार्यावर प्रभावित होऊन विविध गौरवौदगार काढले आहेत. अशा या थोर समाज सुधारक,संत रविदासांना त्यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने विनम्र कोटी कोटी अभिवादन...

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आसारामबापूची उलटी पावले



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


आधुनिक केसरी

**सनातन हिंदु धर्मात संत म्हंटले की,भोळी भाबडी माणसे लगेच त्यांच्या चरणाला स्पर्श करतात, त्यांचा आशिर्वाद घेतात. संताला देव मानतात. पण तथाकथित संत आसारामबापूला बलात्कार प्रकरणी शिक्षा झाली आहे. ही जरी वैयक्तीत बाब वाटत असली तरी, हा प्रकार हिंदु संस्कृतीला कलंक लावणारा आहे. याची हिंदु भाविकांना याची लाज वाटत आहे. यातून घाणेरड्या कृत्यामुळे भाविकांच्या व शिष्यांचा विश्वासाला तडा गेला आहे. या घटनेने हिंदू विरोधी शक्तीच्या हातात आयते कोलित दिले गेले. सनातन हिंदु धर्मात भविष्यात अश्या भोंदू बाबांकडून घटना घडू नयेत, यासाठी हिंदू धर्म परिषदने पाऊले उचणार गरज आहे. अश्या कृत्याचा संत,महात्मांनी समर्थन न करता निंदा केली पाहिजे.तरच खऱ्या अर्थाने धर्माचे शुध्दीकरण होईल.**

जगात सनातन हिंदु धर्माची शिकवण,संस्कृती आदर्श मानली जाते. भारतात संताची परंपरा पुरातन काळापासून चालत आलेली आहे.यात संत, महाराजांना मानणारा वर्ग मोठा आहे. या संताना देवाचा दर्जा दिला आहे. संत तुकाराम, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत रविदास, संत तुकोडीजी महाराज, संत गाडगे महाराज आदी संताची महिमा मोठी आहे.या संतानी भरकटलेल्या समाजाला उपदेश व दिशा देण्याचे कार्य केले. इतकेच नव्हे,समाजातील रूढी, परपंरा, अंधश्रध्दा, चमत्कारावर प्रहार केले आहेत. त्यांचेवर कधी जातीचा ठपका बसला नाही. ते धनाचे लोभी नव्हते. परंतु दुर्देव की,आज संत जाती-पातीत विभागले गेले आहे. संत कोणाला म्हणावे? ज्याच्या अंगी क्षमा,व दया वसतात, तोच संत, अशी सुटसुटीत व्याख्या आहे. संताच्या अनेक अंभगात सांगितले आहे. ताटीच्या अभंगात, 'संत तोची जगी। क्षमा त्यांचे अंगी॥ लोभ अंहता नये मना।जगी विरक्त तोचि जाणा॥ इह,परलोकी सुखी। शुध्द ज्याचे मुखी॥' तसेच संत तुकाराम महाराज म्हणतात,'जे का रंजले गांजले । त्याची म्हणे जो आपुले ॥ तोची साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा'तर संत ज्ञानेश्वर महाराजांचे म्हणणे, योग याग विधी। येणे नोव्हे सिध्दी॥ वायाची उपाधी दंभधर्म॥ म्हणजे किती योग साधना, होम, हवन, तपश्चर्या केल्याने कोणाला सिध्दी प्राप्त होत नाही. तेंव्हा कोणीच चमत्कार करू शकत नाही. हे सगळ दंभधर्म आहे.आपण संताच्या विचार महत्व देत नाही. पण आजकाल लोक चमत्कारित बाबांच्या मागे लागले आहोत. संताने म्हंटले आहे,नवसे पूत्र होती। तर का लागे पती॥ तेंव्हा चमत्काराने पूत्र, सुख, समृध्दी व संपत्ती प्राप्त होते हा समज चुकीचा आहे.बागेश्ववरी महाराजाच्या कथा वाचनाला विरोध नाही, पण त्यांच्या चमत्काराला विरोध आहे.माणसाने नीत्य नामस्मरण करणे, चांगले कर्म, आचारण, श्रम केले तर आयुष्यात कधीच कमी पडत नाही. पण जेथे चमत्कार केला जातो तेथे नमस्कार केला जातोय! आजकाल आपणाला सिध्दी प्राप्त झाल्याचे सांगून चमत्कार करणारे बाबा प्रगट होत आहेत.देशात धर्मवीर संत आसारामबापू नावलौकिक होता.भाविक त्यांना देवाचा अवतार मानत असत.देशात त्यांचे कोट्यावधी शिष्य आहेत.पण धार्मिक प्रवचन, ज्ञान, उपदेश देणाऱ्या संत आसारामबापूंची पाऊले उलटी कशी काय पडली? त्यांना संत म्हणायचे का ? एकीकडे सनातन धर्मावर प्रहार होत असतानातथाकथित संताची घृणास्पद घटना समोर आली आहे.यात आसारामांना त्यांचे कृत्याचे फळ मिळाले असले,हे खरे ! पण या घटनेने तमाम हिंदु समाज अपमानीत झाला आहे. त्याचे काय? हिंदु धर्म विरोधी मंडळीची मुकाबला करणे सोपे आहे,पण 'घरका भेदी लंका ढाए' सनातन धर्मात अश्या विकृत मानसिकतेचे ढोंगी बाबांचे प्रस्थ वाढत चालले आहे. त्यांचा प्रतिबंध कसा करावयाचा? अश्या तथाकथित बाबांकडून हिंदू धर्माची बदनामी थांबविणार कशी ? त्याला प्रतिबंध कोण घालणार ? कोणताही धर्म, फसवणूक, लैगिंक अत्याचार करण्याची शिकवण देत नाही. पण भोंदू बाबाचा घटना केवळ हिंदु धर्मातच घडता असेही नाही. इस्माम, ख्रिश्चन धर्मातही घडतात.अनेक मौलवी व पादरींनी लैगिंक अत्याचार व बलात्कार प्रकरणी अटक व शिक्षा झाल्याच्या घटना आहेत. पुणे दत्तवाडी पोलिसांनी २०१८ मध्ये मौलवीला बलात्कार प्रकरणी अटक केली होती. बिहारमधील सीतामढी येथील मौलवीला अटक झाली. राजस्थान कोटा येथील २०२२ मध्ये अब्दुल रहीम या मौलवीला मृत्यूपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली.देशातील २०२२ मधील इस्लाम धर्माच्या नावावर भडक वक्तव्य देणारा इटावा येथील धर्मगुरू मौहम्मद तरजिस याने तर धमकी देवून एका मुलीचे लैगिंक शोषण केले. नंतर त्याला अटक होताच खळबळ उडाली होती. त्याला वाराणसी न्यायालयाने दहा वर्षाची शिक्षा सुनावली आहे. केरळमधील कोटीयुरम येथे २०१९ मध्ये पादरीला लैगिंक अत्याचार प्रकरणी वीस वर्षाची शिक्षा झाली. केरळ येथील कोची व जालधंर पादरीला अश्याच आरोपाखाली अटक झाली होती. हिंदू धर्मातही अनेक भोंदू बाबा,आहेत ते लोकांची फसवणूक लुबाडणूक करत आहेत, अशा आधुनिक बाबांवर कारवाई होत आहे.

देशात धर्माचा प्रसार, प्रचार करण्यास विरोध नाही. सनातन हिंदू धर्मात संत, महाराज कीर्तन, प्रवचनाव्दारे, कथा वाचनाव्दारे समाज प्रबोधनाचे उत्तम काम करतात.त्याच्या या अध्यात्मिक, धार्मिक कार्यक्रमाला विरोध नाही.मुस्लिम समाजात दर दोन वर्षांनी' इज्तेमा' (अरबी शब्द असून याचा अर्थ एकत्रित प्रार्थना करणे ) हा धार्मिक प्रचारासाठी मोठा सोहळा आयोजित केला जातो. त्यात लाखो मुस्लिम सहभागी होतात. सर्वच संत, महाराज असे वाईट प्रवृत्तीचे असतात, असे माननेही चूक आहे.प्रत्येक क्षेत्रात चांगली व वाईट प्रवृत्तींची माणसे असतात. हिंदु धर्मात अनेक आधुनिक बाबा अवतार घेत आहेत. त्यांनी धर्माच्या नावावर व्यवसाय सुरु केला आहे.या बाबांचे अनेक मोठ-मोठ्या शहरात आश्रम आहेत. त्यांची करोडांची संपत्ती आहे. कांही बाबा,महाराज तर प्रवर्चन व कथा-वाचनासाठी लाखो रूपये घेतात.त्यांचा कार्यक्रमाची ॲडव्हास बुकींग करावी लागते.काहीचे तीन ते चार वर्षे कार्यक्रम मिळत नाहीत. इतके ते व्यस्त असतात. या बाबांच्या धार्मिक कार्यक्रमाचे प्रायोजक आता राजकीय नेते स्विकारत आहेत.या धार्मिक प्रवचनाच्या निमित्ताने लाखो भाविक येतात.काही जण तर धार्मिकस्थळांच्या सहलीचे आयोजन करत आहेत.तेंव्हा ते धर्मावर,बाबांवर श्रध्दा म्हणून धार्मिक सोहळा आयोजित करत नाहीत! त्यांचा तेथे येणाऱ्या भाविकांच्या मतावर डोळा असतो. नांदेडात अध्यात्मिक गुरू श्री.श्री. रवीशंकर यांचा महासत्संग सोहळा घेण्यात आला.पण आयोजकाला काँग्रेस व भाजपा या राजकीय पक्षाची कुबडी घेण्याची गरज का भासली? राजकीय नेत्याच्या सहकार्याशिवाय सत्संगाचे कार्यक्रम होऊ शकत नाहीत काय? खर तर! संत, महाराजांनी राजकारणापासून दूर राहिले पाहिजे.मराठवाड्यातील एक उदाहरण आहे,मुंबईतील एक व्यक्ती करोडोची कमाई करून मराठवाड्यात आला. त्याने एका मोठ्या स्वरूपात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले, यावेळी सात दिवस लाखो भाविकांच्या जेवणाची व्यवस्था केली,यातून त्याचे नाव झाले,प्रसिध्दी मिळाली. पुढे तो निवडणुकीत उभे राहिला अन आमदार झाला.आता राजकीय नेते राजकारणासाठी धर्माचा आधार घेत आहेत.काही बाबांचे तर लाखो रूपायांचे पॅकेज आहे.ते एकटे येत नाहीत. ते ऑक्रेस्ट्राप्रमाणे वाद्यसंच सोबत येतात.दुसरीकडे बिचारे!पण वारकरी सांप्रदायातील कीर्तकार महाराजांना असा भपकेबाजपणा, डामडौलपणा जमत नाही.त्यांना कीर्तन, प्रवचन सोहळ्याचे मार्केटींग करता येत नाही. पण कांही मंडळी अश्या कीर्तनकार महाराजांच्या मानधनावर जे बोट ठेवले जाते,लक्ष्य केले जाते. याचे आश्चर्य वाटते.

संत आसाराम बापू यांना कुंडली पहा! त्यांचे कुटुंब मुळचे पाकिस्तानाचे. सिंध प्रांतातील बेरानी गावचे. आसामाचे खरे नाव आसुमल थारूमल सिरूमलानी असे आहे.त्यांचा जन्म १७ एप्रिल १९४१ मध्ये झाला. १९४७ मध्ये देशाच्या विभाजनानंतर




आसारामचे वडील हे भारतातील बॉम्बे स्टेटमधील अहमदाबाद येथे स्थायिक झाले.वडीलाचा लाकडाचे व कोळश्याचा व्यवसाय होता.वडिलांच्या मृत्यूनंतर आसारामने हाच व्यवसाय केला,त्यांने दारू,चहा विकणे,सायकल दुरूस्तीचे काम केले, असे सांगितले जाते.त्यांचा वयाच्या पंधराव्या वर्षी विवाह झाला. पण घरातून पळून गेले.ते गांधीनगर येथील आश्रमात राहू लागले.त्याच वेळी त्याच्या आईने दुसरा विवाह करण्यास भाग पाडले.ते त्यांनी आश्रमात राहून त्यांनी कथावाचन व प्रवचनाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी १९६४ मध्ये स्वतः आसाराम असे नाव धारण केले.१९७१ मध्ये मोटरा येथे छोटीशी झोपडी उभारली व ते कथा वाचन करत असताना एका गरिब कुंटुंबाना त्यांना आपली व्यथा सांगितली,ती दूर झाली.यातून त्याची ख्याती वाढत गेली. त्यांनी भाविकांसाठी जेवणाची व्यवस्था सुरु केली.त्यांची वाणी गोड, प्रभावित करणारी असल्याने भाविकांची संख्या दिवसें-दिवस वाढत गेली.यात लाखो लोकांनी त्यांनी गुरू मानले.त्यांनी धार्मिक साहित्य,वस्तु,आदीच्या खरेदीतून ७.५० कोटीची कमाई केली. २०१३ मध्ये त्यांनी देशात शंभर व अठरा देशात आश्रमाचे जाळे आहे. २००८ च्या मुल्याकंनानुसार १० हजार कोटीची मालमत्ता आहे.त्यांना एक मुलगा नारायण साई व मुलगी आहे. नारायण साई आसारामबापू बरोबर धार्मिक कार्यक्रमात साथ देत असत.आसारामाबापूंचे प्रस्थ एवढे वाढले की,त्यांना भगवान म्हंटले जाऊ लागले.आसारामबापूंच्या दरबारात अटलबिहारी वाजपेयी,लालकृष्ण आडवाणी, दिग्विजयसिंह, तसेच गुजरातचे तत्कालिन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी आदी नेत्यांनी आश्रमात जाऊन त्यांची भेट घेवून आशीर्वाद घेतले!गुजरातचे तत्कालिन मुख्यमंत्री मोदी सरकारने आसारामबापुंना राजाश्राय दिला.पण साधूच्या रूपात सैतान येत असतो,याची कल्पना नेत्यांना आली नाही. आसारामाची कोट्यवधीची कमाई व लाखो शिष्य असलेल्याने त्यांचे विरोधात लिहिणे व बोलण्याची धाडस पत्रकार करत नसत.वृत्तपत्र मालक विरोधी वृत्ताला व लेख नाकारत असत. कारण या बापूंनी तर बड्या वृत्त मालकाला हातीशी धरले होते.या आसारामबापूच्या आश्रमात शिक्षण घेणाऱ्या २००८ दोन बालकाचा संशयास्पद मृत्यू पावल्याची घटना घडली होती. यात प्रकरणी गुजरात चौकशी समिती नियुक्त केली गेली होती.या समितीने आसाराम व नारायण साई यांना क्लिनचीट देण्यात आली. बापूच्या आश्रमात भूतबाधा दूरव्हावी व समस्या निवारणासाठी अनेक मुली आश्रमात राहण्यासाठी आलेल्या होत्या.तेंव्हा आसाराम व त्यांचा मुलगा नारायण साई २००१ ते २००९ यांनी मुलींना शिकार बनवले. त्यांचेवर वारंवार लैंगिक अत्याचार व बलात्कार केले.जेंव्हा पीडीत मुली तक्रार पुढे आल्या त्यांना संतप्त शिष्यांचा सामना करावा लागला. तेंव्हा आश्रमात गेलेल्या पत्रकार व शिष्यात झडप झाली होती. या प्रकरणी पोलिसावर दवाब वाढत गेला. त्यानंतर २०१३मध्ये या प्रकरणी गुन्हा दाखल केला गेला.शेवटी पोलिसांनी तपासानंतर आसारामबापू व नारायण साई यांना इतराना अटक करावी लागली.त्यावेळी विश्व हिदू परिषदेचे आशोक सिंघल,प्रविण तोगडीया, हिंदू जागृती मंच आदींनी आसाराम बापूंच्या अटकेचा विरोध केला. यात सनातन धर्माला बदनाम कारस्थान केले जात आहे,असा त्यांचा बचाव केला होता.आजही शिष्यांना आसारामबापू हे दोषी आहेत, असे वाटत नाही! ते निर्दोषच आहेत,असे वाटतात. आसारामाबापूंनी तेंव्हा आपणाला काँग्रेसचे नेते सोनिया गांधी यांचे आदेशावरून कटकास्थान गेले केले,असा आरोप केला होता.परंतु न्यायालयाने बलात्काराच्या आरोपात आसारामबापू, नारायणसाई या दोघांना दोषी ठरविले. आरामबापूना दोन प्रकरणात २०१८ व २०२३ मध्ये जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली आहे. तर २०१९ त्यांचे पूत्र नारायणसाई याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली. आसारामबापूवर केलेले राजकीय आरोप खोटे असू शकतात. पण आता न्यायालयाने त्यांना दोषी ठरविले आहे, त्यामुळे निर्दोष आहेत,असे म्हणे, चुकीचे ठरेल. त्यांनाअपीलात जाण्याचे कायदेशीर मार्ग अजून आहे. पण एकदा माणसाच्या चारित्र्यावर डाग लागला तर तो कधीच निघत नाही व समाजाचा अश्या व्यक्तीवर विश्वास ठेवत नाही. आसारामबापू हे २००९ मध्ये नांदेडात कथावाचनाचा कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते.त्यांच्या सभामंडप बाहेर धार्मिक साहित्य,वस्तू आदीचे स्टॉल लागलेले होते!तेंव्हा त्यांची १ कोटीची कमाई झाल्याचे सांगितले गेले. इतकेच नव्हे बापूंना धनाड्य लोकांच्या निवासस्थानी पाद्यपूजा व दर्शनासाठी ४० हजार रूपये स्विकारल्याशिवाय गेले नाहीत.संत आसारामबापू हे बलात्कारासारखे घाणेरडे कृत्य करतील,अशी अपेक्षा नव्हती. पिंजरा चित्रपटातील संवादाची आठवण होते. यात चारित्र्यसंपन्न मास्तरला ( श्रीराम लागू ) तमाशातील नर्तकीतुम्ही खरे नाव सांगा,अशी विनवणी करते.पण मास्तर नाव सांगण्यास नकार देतात,म्हणतात.मी फाशावर गेलो तरी चालेल पण आदर्श जीवंत राहिला पाहिजे.मग जर खरे नाव सांगितले तर भविष्यात कोणी आदर्शावर विश्वास ठेवणार नाही. संत आसारामबापूंनी व नारायण साई या पिता पूत्रांनी भोळ्याभाबड्या लाखो भाविकांच्या श्रध्देची हत्या केली आहे.

# न्यायाधीशांनी कान टोचले, फार बरे झाले !




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**साहित्य संमेलन,वर्धाचे अध्यक्ष न्या चपळगावकर(नाना), यांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे.त्यांनी सरकारला त्यांच्या उपस्थितीतच खडे बोल सुनावले.त्यांनी पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे उदाहरण दिले.जे पचायला तसे कठीणच होते.नेहरू अशाच एका साहित्य संमेलनात म्हणाले होते की साहित्यिकांनी सरकारच्या चुका दाखवल्या पाहिजेत.त्यांना खरे खोटे समजावले पाहिजे.काहीच दिवसांपूर्वी सरकारी खर्चाने विश्व साहित्य संमेलन झाले.त्याचा संदर्भ देत ते म्हणाले, साहित्य संमेलन आयोजन करणे हे सरकारचे काम नाही. ते साहित्य संस्थांचे काम आहे.**

असा विचार, प्रयत्न यापूर्वी झाला आहे.त्यावेळी निधी गोळा करायला सुरुवात झाली होती. या निधीचे पुढे काय झाले,तो कुठे गेला ,कल्पना नाही. पण साहित्य संमेलन आयोजकांना भपकेबाज संमेलनाची सवय झाली आहे गेल्या काही वर्षात. लाखोंचे बजेट आता करोडो वर गेले आहे. पूर्वीचे ५० लाखाचे सरकारी अनुदान आता २ करोडवर गेले.याशिवाय प्रायोजक,सभासद शुल्क,जाहिराती, स्टालस् यांचे उत्पन्न वेगळे. काही वर्षापूर्वी एका धनाढ्य शिक्षण संस्थेने करोडोचे दान देऊन संमेलन हायज्याक केले होते.लेखकांना लाखोच्या खिरापती वाटल्या.आता स्टेज वर साहित्यिक कमी अन् राजकारणी पुढारी जास्त , साहित्य बाह्य मंडळी जास्त असेच चित्र गेली काही वर्षे बघायला मिळते. त्या गर्दीत अध्यक्षाचे भाषण देखील दुय्यम ठरते. म्हणूनच नानांनी आपले भाषण दुपारी स्वतंत्र सत्रात करण्याचं ठरवलं.उद्घाटनासाठी मंत्र्या ऐवजी कुणी ज्येष्ठ,श्रेष्ठ साहित्यिक आयोजकांना मिळाला नाही का? तसे असेल तर साहित्य विश्वात वैचारिक दारिद्र्य आले की काय अशी शंका येते.

विश्व साहित्य संमेलनात विश्व कुठून आले? जागतिक,विश्व, ही विशेषणे वापरून आपण स्वतःचे हे करून घेतो हे आयोजकांना कसे कळत नाही? आजकाल कॉलेजेस अगदी खेडेगावी सुध्दा आंतर राष्ट्रीय परिषदा आयोजित करतात. त्यात आजूबाजूची मंडळी शोध निबंध( ?)सादर करून आपल्या बायोडेटात भर घालतात तसाच काहीसा हा विश्व संमेलनाचा प्रकार.कोणत्याही संमेलनाचे ,प्रयोगाचे,प्रकल्पाचे काहीतरी उद्दिष्ट असावे लागते.ते पूर्ण होते की नाही, झाले की नाही याचा आढावा घ्यावा लागतो. ती आपल्याकडे सवयच नाही.संमेलनासाठी मिळणाऱ्या लाखो करोडो रुपयांचा हिशेब कोण ठेवतो? हा जमाखर्च कुठे सबमिट केला जातो? ती जबाबदारी कुणाची? नाशिक,उदगीर या गेल्या संमेलनाचे हिशेब सबमिट झालेत का? आयोजकांचे इन्कम टॅक्स विभागा कडे,सरकार कडे जमा झालेत का? एरवी दिलेल्या अनुदानाचा पाठ पुरावा करणारे सरकारी विभाग संमेलनाच्या आयोजकांना वेळेत हिशेब जमा करण्याचे आदेश देतात का? त्याचा पाठपुरावा करतात का? या जमा पैशातून प्रवास भत्ते,मानधन,जेवणावळी ,सजावट यावरच अधिकांश खर्च होतात. साहित्य चळवळी साठी काय केले जाते? चांगली मासिके,प्रकाशने,एकेक करून बंद पडली.त्या साठी संमेलनाने काय केले? अनेक उत्तम मासिकं आपली वाचनाची,सांस्कृतिक भूक भागवीत असत.मौज,सत्यकथा,किर्लोस्कर,मनोहर,अनुराधा,सत्यकथा, अंतर्नाद अशी अनेक दर्जेदार मासिकं एका पाठोपाठ एक बंद



पडलीत. ती वैयक्तिक हानी नव्हती. तर सामाजिक सांस्कृतिक हानी होती.यावर संमेलनात कधी चर्चा झाली? त्यांना वाचविण्यासाठी आता करोडोचे अनुदान देणारे सरकार , त्यांचा सांस्कृतिक विभाग काय करीत होते? सरकारची सगळी गणितं ही मत,मतदार, राजकीय लाभ या भवतीच फिरत असतात हे कटू सत्य आहे.

एकूणच साहित्य विश्वात गेल्या काही वर्षात मरगळ निर्माण झाली आहे.वाचन कमी झाले.ग्रंथालयात कुणी जात येत नाही.सरकारी वाचनालयांना वेळेवर अनुदान मिळत नाही. ठराविक,नामांकित लेखकांची पुस्तकं प्रकाशित होतात. नवोदिताना निराशा पदरी पडते.त्यांना स्वतःचे पदरचे पैसे खर्च करावे लागतात.कशा बशा मोजक्या प्रती काढल्या जातात. वितरण बाजारात मंदी आलीय.ठराविक साहित्य प्रकाराला मार्केट आहे.काव्य,नाटक यांची पुस्तकं प्रकाशित होत नाहीत आधी सारखी. लेखकांना मानधन मिळत नाही.लेखी करार होत नाहीत.फसवणूक वाढली आहे. हे साहित्य विषय संमेलनाला चर्चे साठी योग्य वाटत नाहीत का? मिळालेल्या अनुदानातून काही वाटा हे गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी का वापरला जात नाही? साहित्य संस्थांचे हेच तर खरे काम आहे,असायला हवे. आपले किती चांगले साहित्य इतर भाषांतून गेल्या एक दोन दशकांत अनुवादित झाले? इतर भाषांतील किती साहित्य मराठीत आले? खरे तर अशा देवघेविनेच साहित्य समृद्ध होते.

नाना साहित्य,विचार स्वातंत्र्य,भाषा,समीक्षा,या विषयावर विस्ताराने बोलले.गेल्या ७५ वर्षाचा, स्वातंत्र्योत्तर काळाचाच नव्हे तर त्यापूर्वीच्या परिस्थितीचा त्यांनी गांभीर्याने आढावा घेतला.गेल्या काही वर्षात इतके व्यासंगीपूर्ण ,अभ्यासू,चिकित्सक अध्यक्षीय भाषण ऐकण्यात आले नाही, असे विधान केले तर अतिशयोक्ती होणार नाही.

अनेक जण फक्त समस्या सांगतात.त्यावर उपाय सांगण्याचे टाळतात.यंदाचे अध्यक्षीय भाषण या दृष्टीने परिपूर्ण होते असेच म्हटलं पाहिजे.हे भाषण ऐकून विसरून जाण्यासारखे नाही.ते पुनः पुनः वाचून,त्यावर गांभीर्याने विचार करण्यासारखे आहे. विषय सेन्सरशिपचा असो,सरकारच्या लुडबुडीचा असो,अनुदानाचा असो,भाषा टिकविण्याचा,समृद्ध करण्याचा असो,हे अध्यक्षीय भाषण साहित्याच्या सर्वांगाला वरवर नव्हे तर खोलवर स्पर्शून जाणारे होते.एरवी मान,आब राखण्यासाठी गुडी गुडी बोलण्याची प्रथा असते.पण नानांनी सर्वांना खडे बोल सुनावले.ते त्याच्या समृद्ध अनुभवाला ,ज्येष्ठ वयाला शोभूनही दिसले.न्यायधिशानीच कान टोचले हे फार बरे झाले!

# ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांकडून अवैध मतदान



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राज्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांसाठी नुकतेच मतदान पार पडले. यामध्ये नाशिक व अमरावती विभाग पदवीधर तर औरंगाबाद, नागपूर व कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी मतदान झाले. निवडणुकांचा निकाल जाहीर झाला आहे. या विवडणुकित विजयी उमेदवारांची चर्चा होत असतानाच शिक्षकांनी दिलेल्या अवैध मतांची किंवा बाद होणाऱ्या मतांची चर्चा लक्ष वेधून घेत आहे.या निवडणुकीत हजारो मते अवैध ठरली आहेत.एकवेळ कमी शिकलेल्या मतदारांकडून असा गोंधळ किंवा चुका अपेक्षित असतात. इतकंच काय तर एखाद दुसऱ्या शिक्षकांकडून अशा चुका होऊ शकतात असंही मान्य करता येईल. परंतु ज्ञानदानाचं काम करणारे, पुढची पिढी घडवणाऱ्या शिक्षकांकडूनच मतदानाच्या वेळी झालेल्या चुका आणि त्यामुळे अवैध ठरलेली मतं यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. सोबतच अनेक प्रश्न देखील उपस्थित होत आहे.**


एकीकडे निकालाची लगबग सुरू असताना बाद किंवा रद्द केलेल्या मतांची संख्याही मोठी दिसून आली आहे. शिक्षक-पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकांसाठी मतदान प्रक्रिया पसंतीक्रमानुसार असते. मात्र मतदान हे शिक्षक आणि ज्यांच्याकडे विद्यापीठाची पदवी आहे, असे सुशिक्षित उमेदवार मतदान करतात. तेव्हा अशा मतदारांकडून मतदान प्रक्रियेत कसूर राहणे, अपेक्षित नसते. मात्र पदवीधर असूनही निवडणुकीत अनेक पदवीधर मतदान करताना चुकले आहेत. मतदानात त्यांच्याकडून कसूर झाले आहे.

सर्वाधिक मते बाद नाशिक पदवीधर मतदारसंघात झालेले दिसून येत आहे. दुसऱ्या फेरीअखेर सत्यजीत तांबे यांना ३१ हजार ००९ मते तर शुभांगी पाटील यांना १६ हजार ३१६ मते मिळाली आहेत. तर तब्बल ५४४५ मते बाद ठरवण्यात आली आहेत. या निवडणुकीत ५३,२५७ शिक्षकांनी मतदान केले होते, त्यापैकी २४८५ मते बाद झाली आहेत. तर ५०,७७१ मते वैध ठरले आहेत. अमरावती पदवीधर निवडणुकीत ७३ टपाली मतपत्रिका मतमोजणीत बाद झाल्या. या कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकेसोबत घोषणापत्र न दिल्याने ही मते बाद ठरली आहेत. तर नागपूर शिक्षक पदरसंघात १०९९ मते बाद ठरली आहेत. निवडणुक प्रचार करताना मतदान कसे करावे याची माहिती शिक्षकांना देवून देखील हजारो मते शिक्षकांनी चुकीच्या पद्धतीने टाकली आहेत यामुळे पदवीधर आणि शिक्षक ही अर्हता धारण करून ही मतदान करता येत नाही का? हा मुद्दा उपस्थित होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पदवीधरांचे मते बाद ठरत असतील तर, हा काळजीचा विषय आहे. मत नोंदविण्यासाठी आपण निवडलेल्या पहिल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावापुढील 'पसंतीक्रम नोंदवा'यचा असतो. या रकान्यात '१' हा अंक लिहून मत नोंदवायचे असते एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून द्यायचे असले तरी '१' हा क्रमांक एकाच उमेदवाराच्या नावापुढे नोंदवावे लागत असते. निवडून देण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या कितीही असली तरी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येइतके पसंती क्रमांक आपणास उपलब्ध असतात. उरलेल्या उमेदवारांकरिता



आपल्या पसंतीक्रमानुसार पुढील पसंती क्रमांक अनुक्रमे २, ३, ४, इ. नोंदवायचे असते. कोणत्याही उमेदवाराच्या नावापुढे केवळ एकच अंक नोंदवायचा असतो. एकच अंक एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या Lनावापुढे नोंदवू नये. पसंतीक्रम केवळ अंकांमध्येच नोंदवावेत, जसे की १, २, ३, इ. पसंतीक्रम एक, दोन, तीन, इ. असे अक्षरी नोंदवू नका.अंकांच्या आंतरराष्ट्रीय लिपीमध्ये, जसे की १, २, ३, इ. किंवा रोमन लिपीमध्ये, जसे की I, II, III, इ. किंवा भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये मान्यता दिलेल्या कोणत्याही भारतीय भाषेच्या लिपीमध्ये पसंतीक्रमांक नोंदविता येतील. (अंक कोणत्याही एकाच लिपीत नोंदवावा) मतपत्रिकेवर स्वाक्षरी करू नका, आद्याक्षरे लिहू नका, आपले नाव लिहू नका किंवा कोणताही शब्द लिहू नका. मतपत्रिकेवर अंगठ्याचा ठसा उमटवू नये,असे केल्याने आपले मत अवैध ठरतात.

पसंतीक्रम दर्शविण्यासाठी '' किंवा '' अशा खुणा करू नये. अशा खुणा केलेल्या मतपत्रिका अवैध होतात. तुमची मतपत्रिका वैध ठरण्याकरिता तुमचा पहिला पसंतीक्रम कोणत्याही एका उमेदवाराच्या नावापुढे '१' हा अंक नमूद करून नोंदविणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम नोंदविणे केवळ ऐच्छिक आहे, बंधनकारक नाही. मतदान प्रक्रियेबाबत पदवीधर आणि शिक्षक निरक्षरविधान परिषद निवडणुकीमध्ये मतदार असणाऱ्या पदवीधर आणि शिक्षकांना मतदान प्रक्रिया समजावून सांगणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत जागृती करण्याची प्रमुख जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे; परंतु तसे न झाल्याने त्याचबरोबर प्रभावी पद्धतीने माहिती न मिळाल्याने हजारो मते अवैध ठरली. पदवीधर आणि शिक्षक यांनी इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान करताना चुका केल्यामुळे त्यांच्या मतदानाबाबतच्या निरक्षरतेबाबत मोठी चर्चा राज्यात सुरू आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत मतदान अवैध झाले असेल, तर नक्कीच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. शिक्षक आणि पदवीधरांकडून अशा चुका झाल्या असतील, तर त्या गंभीर आहेत. याबाबतचा वेगळा संदेश समाजात जातोय, याचाही विचार होणे आवश्यक आहे. आणि जर जाणीवपूर्वक एखाद्या उमेदवारावर रोष व्यक्त करण्यासाठी मत बाद करण्याच्या हेतूने मतदान केले असेल, तर ही गोष्टसुद्धा गांभीर्याने घेण्याची गरज आहे.



# पाय हवेत जमिनीवर

आधुनिक केसरी

माणूस असा प्राणी आहे जो यशाने हुरळून तर अपयशाने खचून जातो.माणसाने यशाचा आनंद घ्यावा परंतु उन्माद करु नये. यशाची हवा डोक्यात गेली तर अहंपणा वाढतो. इतरांना कमी समजण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. मलाच सगळे कळते असे समजत असाल तर तुम्ही अधोगतीच्या दिशेने जात आहात. विद्या ही विनयने शोभते असे सुंदर सुभाषित आपल्याकडे आहे. माणूस कितीही मोठ्या पदावर गेला तरी तो किती विनयशील असतो याचे सुंदर उदाहरण म्हणजे आपले माजी राष्ट्रपती डॉ .ए.पी.जे.अब्दुल कलाम होय. डॉ कलाम सर हे एक बुद्धिमान वैज्ञानिक होते.परंतु माणूस म्हणून ते महान होते. राष्ट्रपती म्हणून वावरताना कधीही त्यांनी मोठेपणाचा आव आणला नाही.त्यांचा साधेपणा व विनम्रता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अलंकार होता. त्यामुळे त्यांनी लोकांच्या हदयात
आपलेपणाचे घर केले.

मुलांनो तुम्हीही शालेय जीवनात अनेक स्पर्धा परीक्षा, उपक्रम यात भाग घेता.तुमच्या मेहनतीच्या जोरावर तुम्ही यशस्वी होता.त्याचा अभिमान जरुर बाळगा. परंतु गर्व करु नका. जीवनात तुम्हाला खूप मोठे व्हायचे असेल तर अंगी संयम हवा. ज्यांनी तुम्हाला आयुष्यात उभे राहण्यासाठी हात दिला आहे त्यांना कधीही विसरु नका. त्यांच्याबद्दल कृतज्ञता ठेवा.जीवनात अनेक चढउतार येत असतात. अशा वेळी माणसाची परीक्षा असते. तुमच्या यशात इतरांचा वाटा आहे याची जाणीव ठेवा. अपयशाची जबाबदारी स्वतः कडे घ्या. तुम्हाला जे मिळाले आहे त्याची कधीही घमेंड बाळगू नका. सत्ता, संपत्ती आणि सौंदर्य हे कायम एकाच ठिकाणी नांदत नाही याची हे लक्षात असू द्या. इतरांना समजून घ्या. त्यांच्या अडचणी सोडवा.नेहमी सहकार्याची भावना ठेवा. दुसऱ्याच्या भावना आणि विचार यांची कदर करा.ज्यावेळी तुम्ही स्वतः चा विचार करण्यापेक्षा इतरांचाही विचार करता त्यावेळी तुम्ही एक चांगला माणूस बनण्याच्या दृष्टीने पुढे जात असता. आयुष्य म्हणजे एक खूप मोठा आनंददायी प्रवास आहे. या प्रवासात यशस्वीपणे वाटचाल करण्यासाठी तुम्हाला माणसांची सोबत हवी आहे. म्हणून जीवापाड प्रेम करणारी आणि जीवाला जीव देणारी माणसे जोडा आणि त्यांना जपा. कितीही मोठे यश मिळाले, पैसा मिळाला, ऐश्वर्य मिळाले, खूप मोठे पद मिळाले तरी जमिनीवर रहायला शिका. माणूस म्हणून तुम्ही मोठे व्हाल.

© लक्ष्मण जगताप

# प्रकाशजी सत्तेच्या तडजोडीचं गणित चुकलं



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**एका जुन्या गाण्याच्या ओळी आठवल्या त्या अश्या, "दो दिवाने दिल के चले है देखो मिल के" गाण्याच्या शब्दात तर दिवाने आणि मिलके असा उल्लेख आहे पण मला असे वाटते की, परस्पर विरोधी मत असणारे दिवाने लोग मिलके कसे चालतील? बहुतांश काळ सत्ते पासून दूर राहिलेले माणसे या गाण्याच्या अर्थावरून नक्कीच जनतेची करमणूक करत असल्याचे दिसते. मागच्या आठवड्याभरापासून सर्वच मीडिया वर, " शिवशक्ती व भीमशक्तीच्या ऐक्याचा जोरदार गाजावाजा होत आहे .**

अश्या दोन्ही विचारांच्या जनते सह इतर हि जनता मात्र संभ्रमात असून कैक काळ पासून परस्पर वैचारिक विरोध करणारी हि मंडळी थोरामोठ्यांची नावे लावून एकत्र कशी बरे आली? असो परस्परातील पूर्व वैमनस्याला विसरून हे दोघे एकत्र येऊन पुन्हा नव्याने संसार थाटणे हि तशी सर्वासाठी आनंदाची बाब आहे. पण नेहमीच वैचारिक पातळीवर विळ्या भोपळ्या सारखे एकत्र राहून यांच्यात सौख्य बरे कसे राहणार हा मात्र आम जनतेला नक्कीच प्रश्न पडला आहे. जुना काही काळ सोडला तर याच मंडळींनी परस्पर विरोधी राहून जातीयता व हिंदुत्वाला खत पाणी घालून आपआपल्या वेग वेगळ्या चुली मांडल्या याचा आम जनतेला अजून विसर पडलेला नाही. अश्या मंडळी ला सत्ते शिवाय अजिबात करमत नसल्या मुळे व अशा जनाधार गमावलेल्या मंडळींनी असा प्रयत्न करणे म्हणजे YES AND B किंवा YES AND VBA युतीच्या नावा खाली जनतेची फसवणूक होत असल्यासारखे तर नव्हे ना असं यांच्या अनुयायांना वाटत आहे. मुळात वंचित हा शब्दच अडचणीचा वाटतो कारण स्वताहून स्वतःला वंचित मानणे व खऱ्या वंचितासाठी प्रश्नार्थक वाटतो. एखाद्या विशिष्ठ जात समूहाचे नेतृत्व करणे हे अपेक्षित उपेक्षिता साठी फारसे समाधानकारक नाहि. याचाच मतितार्थ असाही निघू शकतो की काही राजकीय पुढाऱ्यांनी आपले बुडत असलेले राजकीय अस्तित्व शाबूत ठेवण्या साठी घडवून आणलेला हा नवा वैचारिक प्रपंचच म्हणाव लागेल. भारतीय लोकशाहीत व संस्कृतीत अश्या लोकांनीच जाती धर्माला खत पाणी घालून जात पात व धर्माचा नवा वाद निर्माण केला. भारतीय जनसंख्येत विविध जाती धर्म व पंथाचे अनेक लोक अपेक्षत उपेक्षित आहे यांचा सर्वार्थाने सर्वांगीण विकास होऊन त्यांना मुख्य जन प्रवाहात आणून सर्वर्थाने सक्षम करावे असे सर्वानाच अपेक्षित आहे परंतु काही विशिष्ठ जाती धर्माच्या राजकीय पुढाऱ्यांनी अश्या उपेक्षितांना कायम मृगजळ दाखवून त्यांची एक वेगळी फळी निर्माण केली. जात पात व धर्माच्या नावावर आजपर्यंतच्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी गोर गरीब जनते ला एकत्र करून फसवणूक केल्या सारखे नव्हे काय? अश्या अप प्रवृत्ती व विचारांमुळे देशात वर्तमानात जात पात व धर्मवाद मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे जो राष्ट्र उन्नती व एकात्मतेला फार मोठा धोका संभवतो

भारतीय घटनेने सर्वांनाच अधिकारांसह कर्तव्यहि प्रदान केली असल्या मुळे धर्म व जाती पाती ला राष्ट्र ऐक्या साठी कुठेहि थारा दिलेला नाही. संपूर्ण जगात आजही भारतीय लोकशाही हा कौतुकाचा विषय असून परकीयांना असे वाटते की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपल्या देशात विविध जाती धर्माचे लोक राहून ते एकोप्याने कसे राहतात याचा अभ्यास जागतिक पातळीवर तज्ञा मार्फत नेहमीच होत असतो पण आपल्याच देशातील राजकीय पुढारी मात्र देशात विविध जाती धर्मात तेढ व वादविवाद निर्माण करून आपणास कसे उपेक्षित ठेवून आपणच वंचितांचे कसे खरे कैवारी म्हणून मिरवतात हि हास्यास्पद बाब आहे. अश्या कारणामुळे घटनाकारांनी घालून दिलेल्या कायदे व नियमांची पायमल्ली होत असल्या सारखेच नव्हे काय? जात व धर्म वेग वेगळे असले तरी संपूर्ण भारतीयांच्या रक्ताचा रंग लालच असून प्रथम ते भारतीय आहेत याचा नेमका विसर मात्र भारतातील सर्वच पक्षाचा राजकीय पुढाऱ्यांना पडतो. म्हणूनच जात पात आणि धर्माधिष्टीत राजकारण करून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न सर्वच राजकीय पुढाऱ्यात जोराने चालू आहे त्यात गरीब बिचारी जनता मात्र नाहक भरडल्या जाते. वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणात तीन वर्षांपूर्वी राज्यातील विविध छोट्या प्रादेशिक पक्षांनी एकत्र येऊन सत्ता हव्यासापोटी महाविकास आघाडी जन्माला घातली. जी अल्पावधीतच बिघाडी होऊन त्यांना पायउतार व्हावे लागले. थोडक्यात असे लुळे पांगले बालक जन्माला आल्या सारखेच झाल. महाविकास आघाडी जन्माचा एकमेव हेतू म्हणजे भाजप ला विरोध, त्यातल्या त्यात भरीस भर म्हणून कैक काळ सत्ते पासून वंचित राहिलेल्या प्रकाश आंबेडकरांनी आपले




स्वत्व व तत्व खुंटी ला टांगून तिसऱ्यात चौथा म्हणून शिवशक्ती व भीम शक्तीचा नवा राजकीय ट्रेंड पुन्हा जन्माला घातला. ऐन केन प्रकारे राज्य व केंद्रात अश्या आघाड्यांच्या माध्यमातून भाजप ला विरोध करून सत्ता हस्तगत करणे हा एकमेव अजेंडा दिसतो. शिवसेने शी दोन पिढ्याचे वैर विसरून महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना आणि वंचितांचा FORMULA हाती घेतला. प्रकाश आंबेडकर तसे बुद्धी वादी पण राजकीय चाणाक्ष नव्हे कारण जसे दलितांना इतर दलित नेत्यांनी कायम सत्ताप्राप्ती साठी आप आपल्या वेग वेगळ्या चुली मांडून वेळो वेळी सत्ते च्या स्वार्थ साठी त्या विझवून टाकून राष्ट्रीय पक्ष्यांच्या आश्रयास गेल्यामुळे राज्यासह देशाच्या राजकारणातील दलित व पिछडा समाज दलबदलू व स्वार्थी नेतृत्व मुळे उपेक्षित राहिला असून याला अश्या पिछड्या वर्गाचे नेतेच जवाबदार आहेत.

महाविकास आघाडीतील काही स्तुती पाठक नेत्यांनी अश्या युती बाबत आपआपली मर्यादित प्रतिक्रिया देऊन YES AND V युती चे नावालाच समर्थन दर्शवून बाकी भाष्य करण्याबद्दल आपले हात मात्र नक्कीच वर केले. बहुतअंशी सर्व प्रकारचा मीडिया, सामान्य वंचित व हिंदुत्ववादी जनते सह सर्व सामान्याला हा असा युती चा प्रकार फारसा आवडलेला नाही कारण राज्य व केंद्रात दोन हजार चोवीसच्या निवडणुकीसाठी सुद्धा देश व राज्यात सध्या तरी भाजप शिवाय दुसरे कुठलेही सक्षम पर्यायी नेतृत्व नाही म्हणूनच तर अश्या छोट्या छोट्या घटक पक्षाचे नेते स्वार्था साठी वेगवेगळ्या युक्त्या व क्लुप्त्या काढून भाजप ला पर्याय म्हणून आघाड्यांना जन्म घालत आहेत पण अश्या आघाड्यांच्या नेतृत्वा मध्ये जमीन आस्माना सारखी वैचारिक मतभिन्नता असून हा त्याला पर्याय होऊ शकत नाही वर्तमान राजकीय परिस्थितीत सर्वच घटक पक्षांच्या आघाडीतील नेते मंडळी आपआपसात टिंगल टवाळी करून जनतेची करमणूक मात्र करत आहे. या पूर्वी राज्य व केंद्रात सत्ताधारी राजकीय पक्षाला पर्याय म्हणून वेगवेगळ्या आघाड्यांना जन्म घातला पण यांची सरकारे हि कायम कुपोषिता सारखी अल्पजीवी ठरली. वर्तमानातील मतदार जागरूक असल्या मुळे सर्वच भले बुरे, चांगले वाईट चांगल्या प्रकारे ओळखून त्यांना जे हवे असते तेच करतात. अश्या राजकीय आघाड्यांमुळे २०२४ च्या येऊ घातलेल्या लोकसभा व राज्यातील निवडणुकींवर वर फारसा विपरीत परिणाम होणार नाही असे सर्व सामान्य मतदारांच्या सर्वेक्षण वरून दिसते. जाता जाता प्रकाश रावजी आपणास एक प्रामाणिक व आपुलकीचा सल्ला असा की, दीर्घकालीन सत्तेच्या तडजोडीत आपण बुद्धिवंतांनी अश्या बिघडणाऱ्या आघाड्या निर्माण करून वंचितांना अधिकच वंचित करून आपणहि सत्ते साठी वंचितच राहाल असे मला वाटते म्हणून तिसर्यात चौथा हे गणित चुकले, " बुंद से गयी वो हौद से वापस नही आती"

**जयहिंद / लालसलाम / इन्कलाब जिंदाबाद**

# भारताचे वैद्यकीय, आरोग्य व संशोधन क्षेत्रातील नेतृत्वासाठी 'जी-२०' ही सुवर्णसंधी



डॉ. अजित गोपछडे

आधुनिक केसरी

**भारताचे लोकप्रिय पंतप्रधान मा.नरेंद्र जी मोदी यांच्या नेतृत्वात आपण G20 चे अध्यक्षपद भुषवित आहोत ही संपूर्ण भारतीयांसाठी गर्वाची गोष्ट आहे. यात विविध क्षेत्रांचे आपले ज्ञान,वारसा,वैभव व नेतृत्व जगाला दाखविण्याची एक उत्तम संधी या निमीत्ताने मोदीजींनी सर्वांना उपलब्ध करुन दिली आहे यात आर्थिक, बांधकाम क्षेत्र, पर्यावरणातील बदल, ग्लोबल,वॉर्मिंग, आरोग्य, रिसर्च आणि इनोव्हेशन आणि विशेषकरुन भारताचे वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान,संशोधन व उपचार पद्धती जगासमोर आणण्यासाठी सुवर्ण संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. G20 मध्ये डॉ.अजित गोपछडे यांना व त्यांच्या टीमला आरोग्य,वैद्यकिय शिक्षण व संशोधन क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेपर्यंत जाऊन प्रबोधन,लोकसहभाग आणि जनजागरणाची जबाबदारी देण्यात आली आहे. भारत हा प्राचीन देश असून या देशाची समृध्द अशी संस्कृती आहे. भारताचे वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान व कौशल्य हे प्राचीन काळापासून सर्वमान्य आहे आणि नुकत्याच आलेल्या कोरोना काळात हे संपूर्ण जगाने अनुभवले आहे.**

यावेळी होणाऱ्या G20 संम्मेलनात भारत अध्यक्षपद भूषवित असल्याने S 20 मध्ये भारताच्या आयुर्वेद, योगोपचार, पारंपरिक उपचार पध्दती, पंचगव्य चिकित्सा, पंचकर्म चिकित्सा,नाडी परिक्षण, निसर्गोपचार, होमिओपॅथी आणि इतर आरोग्य व वैद्यकिय क्षेत्रातील संशोधनात्मक विषयावर भारताचे ज्ञान जगात कसे सर्वश्रेष्ठ आहे याची ओळख करून देण्याबाबत खूप मोठी संधी आपणास प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत जग हे बऱ्याचश्या अडचणींना सामोरे जात आहे. ज्यात आर्थिक, पर्यावरण असमतोल, आतंकवाद, जैवविवीधतेचा होणारा ऱ्हास व कोविड साथीसारख्या जगाला हादरवून टाकणाऱ्या घटनांमुळे संपूर्ण जग दडपणात आहे. या स्थितीला सांभाळण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे संपूर्ण जगाने एकत्रित येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठीच भारताचे अध्यक्षपद हे "वसुधैव कुटुम्बकम्" या संकल्पनेव्दारे राबविले जात आहे.

ONE EARTH,ONE FAMILY,ONE FUTURE आणि पर्यावरण पुरक जीवनशैली (LIFE STYLE FOR ENVIRONMENT) या मुळ विचारप्रणालीवर आधारित ONE HEALTH हे ब्रीद महाराष्ट्रात प्रसारित करण्याचे कार्य G20 मेडीकल विंग मार्फत करण्यात येणार आहे,असे मत डॉ.अजित गोपछडे यांनी व्यक्त केले.

यासंदर्भात बोलतांना डॉ.अजित गोपछडे पुढे म्हणाले,G 20 सम्मेलनाचे अध्यक्षपद आणि अमृतकाळ असा योग भारताला मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात कार्य करण्यासाठी मिळाला आहे, हे भारतीयांसाठी गौरवाची बाब आहे. या अनुषंगानेच 'G20' आरोग्य क्षेत्राच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सर्व आरोग्य विज्ञान विद्यापीठातील सर्व वैद्यकिय महाविद्यालये व विश्वविद्यालये यातील डॉक्टर्स, पॅरामेडिकल, डेण्टिस्ट, नर्सेस,टेक्निशियन, रेडिओग्राफर - आरोग्यसेवक व वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या आरोग्य संशोधन व स्वास्थ्य विषयातील मोहिमेत सहभागी करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. याची सुरुवात म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक व महाराष्ट्रातील सर्व DEEMED UNIVERSITY या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रबोधन कार्य सुरु करण्यात येणार आहे. जगभरात भारतातील कोव्हिड-19 ची यशस्वीरित्या हाताळणी व सोबतच जगातील सर्वात मोठी लसीकरणाची मोहिम अभूतपूर्वरित्या चालविणे या बाबी पाहिल्या आहेत. आता या अमृतकाळात जगाला भारताच्या इतर विविध वैद्यकिय उपचार प्रणालींचे महत्व पटवून देण्याची योग्य वेळ आणि गरज आहे. G20 संम्मेलनाच्या अनुषंगाने संपुर्ण जगाच्या आरोग्याची जबाबदारी पेलण्यास भारत समर्थ आहे हे दाखविण्याची ही योग्य वेळ आहे.

आजार व त्यांची कारणे विविध प्रकारची असतात आणि त्यामुळेच त्याच्या उपचारांमध्येसुध्दा विविध उपचार पध्दतीचा समावेश असणे गरजेचे आहे. वैद्यकीय क्षेत्रातील आद्यगुरु धन्वंतरींपासून तर आजतागायत अनेक वर्षांपर्यंत उपचार प्रणाली भारताच्या संस्कृतीत रुजलेल्या आहेत. भारताच्या वैद्यकिय क्षेत्रातील विविधतेचा भाग म्हणून योगाभ्यास, उपचार, मेडिटेशन,कोव्हीडची हाताळणी व संपूर्ण जगाला लस पुरवण्याची कार्यतत्परता जगाने अनुभवलेली आहे. इतिहासाला जवळून बघितल्यास सुश्रुत हे जगातील पहिले सर्जन व चरक हे सर्वात प्राचीन वैद्य भारतात होउन गेले आहे, इतकेच काय तर अवसादात गेलेल्या अर्जुनाला काउन्सिलिंगच्या माध्यमातून प्रोत्साहित करणारे जगातील पहिले काउंन्सिलर हे भगवान श्रीकृष्ण होते आणि या संभाषणाचा अंतर्भाव असलेल्या भगवद्गीतेला आज संपूर्ण जगात मान्यता आहे. अशीच एक अद्भुत उपचार पध्दती म्हणून आज ज्या गर्भसंस्काराला मान्यता मिळाली त्याची पहिली प्रचिती ही महाभारतात अभिमन्युच्या चक्रव्यूव्हाच्या कथेव्दारे भारतीय संस्कृतीत रुजलेली आहे. आपल्या संस्कृतीतील वेदांमध्ये लिखित स्वरुपातील ग्रंथ अथर्व वेद हे सर्वात प्राचीन आरोग्य ग्रंथ म्हणून मानले जाते.

आयुर्वेदातील वात, पित्त, कफ यापध्दतीव्दारे व्यक्तिमत्वावर उपचार करणे. याकडे आजही जग कुतुहलाच्या दृष्टीने पहात आहे. केरळ व हिमालयातील आरोग्य केंद्र असो वा इगतपुरीतील जागतिक विपश्यना केंद्र असो किंवा उत्तराखंड ते काश्मिर पर्यंत असलेले योग उपचार केंद्र असो या सगळयांकडे जग आरोग्याच्या पर्यायी पद्धती म्हणून मोठया आशेने पाहत आहे. सोबतच जगातील दुसरी सर्वात जास्त वापरल्या जाणारी आरोग्य पद्धती, होमिओपॅथीची वास्तविक प्रगती ही भारतातच प्रकर्षाने दिसून येत आहे. असाध्य आजारांना समूळ नष्ट करण्यासाठी होमिओपॅथीतील प्रगतीशील रिसर्चसुध्दा जगाला दिलासा देणारा




आहे. GENETICS व EPIGENETICS या जगातील अतिप्रगत पध्दतीबद्दल भारतातच एडव्हांस्ड हेल्थ मध्ये होत असलेला रिसर्च जगाला आरोग्याचा एक नविन पर्याय देणारा आहे. या सर्व उत्साहवर्धक निकाल देणाऱ्या आरोग्यपध्दतीमुळे भारत आज जगाच्या नकाशावर मेडिकल टुरिझमसाठी प्रसिद्ध होत आहे. अश्या विविध उपचार पध्दतींनी सजलेली भारताची अतिप्राचीन व अतिविकसित वैद्यकिय उपचार पध्दतींचा समागम हा फक्त भारतातच बघावयास मिळतो, हे G20 मार्फत पूर्णसत्य जगासमोर आणल्या जाईल, असा विश्वास डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला आहे. G20 सम्मेलनाचे 200 कार्यक्रम भारताच्या 50 शहरांमध्ये होणार आहेत. यात महाराष्ट्राच्या 4 शहरांमध्ये एकूण 14 कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे यात मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर या शहरांमध्ये होणार आहे. मा. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री व मा.प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनानुसार G20 मेडिकल रिसर्च टिम व्दारे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील 100 वैद्यकिय तज्ञांना सहभागी करवून 13 कोटी जनतेपर्यंत जाऊन सुदृढ आरोग्यविषयक प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातील G20 आरोग्यविषयक व वैद्यकीय क्षेत्रातील विविध कार्यक्रमांची संपूर्ण धुरा डॉ. अजित गोपछडे यांच्याकडे असेल अशी माहिती नागपूरचे होमियोपॅथी तज्ञ व G20 समिती आरोग्य विज्ञान संशोधन समन्वयक डॉ. रवि वैरागडे यांनी सांगितले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.अजित गोपछडे, डॉ.रवि वैरागडे,डॉ.स्वप्निल मंत्री, डॉ. भालचंद्र ठाकरे, डॉ. संगिता अंभोरे, डॉ. उज्वला दहीफळे, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. अनुप मरार, डॉ. विंकी रुघवाणी, डॉ. संजीव चौधरी, डॉ. बालासाहेब हरपळे, डॉ. उज्वला हाके, डॉ प्रिती मानमोडे, डॉ. चंचल साबळे, डॉ. कल्पना गोडबोले, डॉ. मेघना चौगुले, डॉ. सुनिल चव्हाण, डॉ. रुपाली धर्माधिकारी, डॉ. माधवी गायकवाड, डॉ. सचिन उमरेकर, डॉ. गोविंद भताने, डॉ. रश्मी शुक्ला इत्यादी अथक परिश्रम करीत आहेत. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी 'G20' अध्यक्ष या नात्याने त्यांच्या संपूर्ण जगाच्या महाकुटुंबाला "वसुधैव कुटुंबकम्" या संकल्पनेव्दारे सर्वांगीण व संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रातील उपचार पध्दतीची प्रचिती आणून देण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येक नागरिकांची आहे, आणि या सर्वांचा सहभाग आरोग्यपूरक व सुदृढ वातावरणाची निर्मिती करणे गरजेचे आहे.

# हिंदुराष्ट्र म्हणजे नेमकं काय रे भाऊ ?




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा धर्मनिरपेक्ष लोकशाही असलेला व जगातील सर्वात मोठी लोकशाही देश आहे. भारतामध्ये हजारो जाती, अनेक धर्म बंधुभावाने संविधानामुळे वागत आहेत. भारतामध्ये हजारो जाती निर्माण का झाल्या? त्या कोणी आणि कशासाठी निर्माण केल्या हा स्वतंत्र विषय होऊ शकतो. परंतु हजारो जाती, अनेक धर्म, पंथ येथे बंधुभावाने नांदावे अशी सोय भारतीय संविधानाने करून दिली आहे.**

संविधानापुर्वी जातीभेद, विषमता, स्पृश्य अस्पृश्यता अस्तित्वात होती माणसाचा माणसाला विटाळ होत होता. परंतु संविधानाची अंमलबजावणी नंतर सर्व काही बदलले. चुकीच्या गोष्टीला, अन्याय, अत्याचार, अंधविश्वास, पाखंड या गोष्टींना जात धर्म नसतो. परंतु काही लोक अंधविश्वास, पाखंड, विषमता, अन्याय, अत्याचाराचे समर्थन यालाच धर्म मानुन बसतात आणि बौद्धिक कमकुवतपणा दाखवून देतात. संविधाना नंतर देशात समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य मिळाले. देशात कोणत्याही धर्माला अवास्तव महत्त्व देऊन किंवा कोणत्याही धर्माला कमी लेखून कोणत्याही प्रकारचा भेद न करता धर्म संखेने लहान असो वा मोठा हा कायद्या समोर सारखाच आहे. संविधाना नुसार धर्माला महत्त्व न देता माणसाला महत्त्व दिले जाते. परंतु प्रत्येक धर्माला आपापल्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचा अधिकारही संविधानाने दिलेला आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाही मध्ये शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माचे समर्थन किंवा कोणत्याही धर्माला विरोध करता येत नाही. परंतु आज राजकीय क्षेत्रात धर्म घुसला आणि लोक विकास, शिकक्ष, रोजगार, महागाई, आरोग्य बाजूला राहुन धर्मावर बोलुन माणसाला मात्र विकासापासून दुर ठेवले जाते. जनकल्याणावर न बोलता धर्माला अवास्तव महत्त्व देऊन लोकशाही व संविधानाचे उल्लंघन केले जाते. हिंदु राष्ट्राच्या नावाखाली अज्ञान, अंधविश्वास पसरवून इतिहासाची मोडतोड करण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि राजसत्ता व धर्मसत्तेच्या माध्यमातून लाखों करोंडो रुपयांची माया एकाच वर्णाकडे साठवली जात आहे. शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक कर्जबाजारी झालेले असताना अडाणी लाखों करोडो कमवतो व घोटाळाही करतो. आणि सर्वसामान्य माणसांना हिंदू राष्ट्र हिंदू राष्ट्र भोवती फिरवून राष्ट्राचा मलीदा खाणारे लोक वेगळेचे आहेत. बुद्धी धर्माला आणि तर्क नेत्यांच्या दावनीला गहान ठेवलेले काही लोक म्हणतात आम्हाला काही कमी नाही आम्ही संपन्न आहोत. अशा भक्तांनी विचार करावा अंबानीच्या मुलाच्या साखरपुड्यामध्ये शुट वर लावलेला चित्ता दिड करोड रुपयाचा होता. आणि आपण चड्डी बनीयन दोनशे रुपयाचे घ्यायचे तर विचार करावा लागतो. बर आपण हिंदु राष्ट्र बनवू या काही अडचण नाही परंतु हिंदू राष्ट्र बनवले तर नेमका सर्व सामान्य लोकांना काय फायदा होणार? धर्मनिरपेक्ष राष्ट्रामध्ये काय कमतरता आहे. प्रत्येकाला समान वागणूक आहे, प्रत्येकाला शिक्षण, आरोग्य, रोजगार मिळविण्यासाठी समान संधी आहे. बोलण्याचा, मतव्यक्त करण्याचा, देशात कुठेही फिरण्याचा, कोणताही व्यवसाय कोणालाही करण्याचा, देशाच्या सरकार मध्ये प्रत्यक्ष भाग घेण्याचा अधिकार हा लोकशाही मध्ये आहे आणि कोणत्याही धर्माचे वर्चस्व देशात राहणार नाही असे नियम आहेत. मग यापेक्षा वेगळे हिंदुराष्ट्रामध्ये काय आहे. संविधान लागु होण्यापूर्वी जे काही हक्क अधिकार माणसाला मिळत नव्हते ते हक्क अधिकार लोकशाही मध्ये संविधानाने दिलेले आहेत. विशेष म्हणजे देशासमोर, सरकारसमोर कोणताही धर्म हा मोठा वा लहान नसला तरीही सर्व धर्मांना आपल्याला धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचा अधिकार संविधानानेच बहाल केला आहे. यामध्ये मानवहीताची कोणती गोष्ट नाही? जर नसेल तर ती आपण समाविष्ट ही करु शकतो. परंतु अस्तित्वात असलेले भारतीय संविधान बदलून हिंदुराष्ट्राची मागणी होत असेल तर याचा स्पष्ट अर्थ आहे तो विषमता, अन्याय, अत्याचार आणि अंधविश्वास यावर आधारित असेल. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. विषमता कशी तर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, संत तुकाराम महाराज, महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा लिखाण, वक्तव्य करून अवमान केला जातो. परंतु हिंदुराष्ट्राची ओरड करणारे लोक राष्ट्रातील महापुरुषांच्या आणि संताच्या अवमानाच्या वेळी गप्प बसतात व हे एक वेळ दोन वेळ नाही तर अवमानाची मालीका देशात सुरू असते आणि हिंदुराष्ट्र हिंदुराष्ट्र म्हणणारे लोक वरिल महापुरुषांचा अवमान होताना गप्प बसतात परंतु सावरकरांबद्दल एकही शब्द बोलले तर महाराष्ट्र च नाही देशात



धुमाकूळ घालतात. याला हिंदू राष्ट्र म्हणायचे का? कोणत्याही महापुरुषांच्या कार्याचा गौरव अतिशयोक्ती करून मुळीच करू नाही परंतु सत्य इतिहासाने जर पोटात कळ येत असेल तर याचा अर्थ आपली नैतिकता योग्य नाही. जर इतिहातील थोर योध्यांचे कर्म जात बघुन सांगणे हे हिंदु राष्ट्र आहे का? आदिवासी आणि मागासवर्गीय लोकांवर अन्याय अत्याचार झाले तर सावरकारांचे समर्थक न्याया साठी रस्त्यावर दिसत नाहीत. उलट आदीवासी, दलितांनावर अन्याय म्हणून बातमी येते नंतर प्रकरण बंद होते. पण तेव्हा कोणाचीच हिंमत होत नाही हिंदुच हिंदुवर अन्याय करतात. वरील गोष्टी करणारा जातीवादी की वरिल गोष्टींवर लिहणारा, बोलणारा जातीवादी असा प्रश्न केला तर लिहणारा बोलणारा जातीवादी होतो. ओबिसींची जाती निहाय जनगणना होऊ नये म्हणून विरोध करणारे आणि त्यांना समर्थन करणारे लोक नेमके हिंदु राष्ट्रात काय अपेक्षा करत असतील? शेतकऱ्यांच्या आंदोलनावर थंडीमध्ये थंडगार पाण्याचा पाऊस पाडून शेतकऱ्यांचे आंदोलन दाबण्यात आले तेव्हा कोणालाच हिंदु धोक्यात असल्याची जाणीव झाली नाही. थोडक्यात काय हिंदुराष्ट्र म्हणजे नेमके काय हे युवा पिढीने लक्षात घ्यावे. हिंदु राष्ट्राच्या भोवती फिरताना देश विकल्या जाणार नाही, रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा बंद होऊन महागाई वाढणार तर नाही याचा डोळस वृत्तीने विचार करुन राष्ट्रहीताच्या बाजूने उभे राहणे आवश्यक आहे. अनेक लोक हिंदू राष्ट्र बनवण्याचा प्रसार आणि प्रसार करत आहेत. हिंदू धोक्यात आहे म्हणून हिंदु राष्ट्र बनवले तर लोकांना न्याय मिळेल अशा वल्गना केल्या जातात. तर्क व बुद्धीचा वापर केला तर असे लक्षात येते येथे कोणताही धर्म धोक्यात नाही. प्रत्येकाला आपआपल्या धर्मानुसार आचरण, उपासना करण्याचा अधिकार आहे.

परंतु सध्या संकटात आहे तो माणूस आणि देश. महागाईने माणूस होरपळत आहे वरून रोजगार निर्मिती बंद आहे. स्पर्धा परिक्षाचेचा अभ्यास, सैन्यासाठी मैदानी तयारी करून हातात नैराश्य आलेले लाखो करोंडो तरुण आज बेरोजगार आहेत. त्यांना आज रोजगाराची गरज आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही, शेतीसाठी पुरेशी विज नाही असेल तर रात्रीची विज, जिव धोक्यात घालून देश जगवणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती बघितली तर डोळ्यात पाणी येते. शेतकऱ्यांना घालायला चांगले कपडे मिळत नाहीत. शेती पिकवायला दरवर्षी कर्ज घ्यावे लागते ते घेताना दहा चकरा माराव्या लागतात तरीही मनाप्रमाणे कर्ज भेटत नाही. आजूबाजूच्या बँकाचे नाहरकत पत्र देऊनही कर्ज वेळेवर व पुरेसे मिळत नाही परंतु अनेक बँकांचे लाखों करोडोचे कर्ज असणाऱ्या उद्योगपतींना अजून जास्त कर्ज करून देशाची तिजोरी खाली केली जाते. कर्जबाजारी उद्योगपती देशाला कंगाल बनवून फरार होतो तेव्हा हिंदुधर्म धोक्यात आहे असे वाटत नाही. असे एक नाही अनेक उदाहरणे आहेत जेथे हिंदु राष्ट्राचे समर्थक काहीच बोलत नाहीत. बर हिंदू संकटात आहे तरी कसा? देशात कायदा सुव्यवस्था आणि लोकशाही टीकवण्यासाठी, लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी चार घटक महत्वाचे आहेत. सभागृह, कार्यपालिका, न्यायपालीका आणि मिडिया. या चारही ठिकाणी हिंदुचे लोक आहेत, जास्त प्रमाणात आहेत. सभागृह अर्थात लोकसभा, राज्य सभा, राज्याच्या विधानसभा विधान परिषद येथे बहुसंख्य हिंदू आहेत. म्हणजे ते समाजाच्या बाजु मांडू शकतात. कार्यपालिका अर्थात प्रशासकीय नागरी अधिकारी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहशीलदार बहुसंख्य हिंदू आहेत, न्यायालयामध्ये बहुसंख्य वकील न्यायधिश हिंदू आहेत जे बाजु ऐकुन न्याय देतात. आणि चौथा म्हणजे मिडिया, मिडिया सुद्धां हिंदुचाच आहे. काय दाखवायचे आणि काय नाही दाखवायचे, मुळ मुद्यावरून लोकांना कसे दुर्लक्षित करायचे हे काम इलेक्ट्रॉनिक्स मिडिया खुप छान पद्धतीने करत आहे. देशातील जे काही मंदीर आहेत त्या मंदीरामध्ये लाखो करोडो रूपयांची संपत्ती हिंदू कडेच आहे. थोडक्यात काय तर धर्मसत्ता, अर्थसत्ता मिडिया हिंदुच्याच हाती आहे मग सर्वसामान्य लोक शेतकरी, विद्यार्थी, रोजगार, हमीभाव, आरोग्य महागाई साठी संघर्ष करत आहेत. म्हणून त्यांच्या डोक्यामध्ये प्रश्न येतो हिंदु राष्ट्रम्हणजे नेमके काय रे भाऊ?

# मानवी मनातील चिरंतन जिज्ञासेची कविता 'ब्लाटेंटिया'

आधुनिक केसरी

**नुकताच डॉ.श्री.बाळासाहेब लबडे सरांचा ब्लाटेंटिया हा काव्यसंग्रह वाचनात आला. डॉ.लबडे सर आपल्या समूहाचे सदस्य आणि खरे-ढेरे महाविद्यालय गुहागर इथे प्राध्यापक आहेत हे सर्वजण जाणताताच!सरांनी आजवर एकूण १६पुस्तकांची निर्मिती केली असून त्यात काव्यसंग्रह,गझलसंग्रह, कादंबरी,समीक्षा,संपादन,लघुकथा,शोधनिबंध,संबोधित कथा अशा सर्व प्रकारांमध्ये त्यांनी संचार केला आहे.त्यांच्या काही रचना महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट असून सरांनी चित्रपट गीतांचंही लेखन केलं आहे.वृत्तपत्रांमध्ये लेखन त्यांनी केलं असून अनेक साहित्यिक सन्मानांचे ते मानकरी ठरलेले आहेत.**

तसं पहायला गेलं तर ब्लाटेंटिया हे नाव पाहिल्यावर आत नक्की कोणत्या प्रकारच्या कविता असतील याची कल्पना येऊ शकत नाही.त्यासाठी आपल्याला सहाय्यकर्ती ठरते ती डॉ.प्रकाश सपकाळे यांची प्रदीर्घ प्रस्तावना!

प्रस्तावनेत ह्या काव्यसंग्रहातल्या कवितांनी जन्म घेण्यापूर्वीची पार्श्वभूमी, अशा प्रकारच्या काव्याची परंपरा आदींचा उहापोह सुरुवातीला आढळतो. नेहमीच्या पठडीहून वेगळं नाव असलेल्या या संग्रहात आदिम मन ते कृत्रिम बुद्धिमत्ता असा लाखो वर्षांचा प्रवास करत आलेल्या भारताच्या मानसिक आणि सामाजिक वास्तवाला कवेत घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या कवितांचं समावेश आहे हे प्रत्यही जाणवत राहतं.

प्रस्तावनेत या पुस्तकाच्या निर्मितीसाठी घेतलेले बौद्धिक श्रम विशद केलेले दिसतात. ब्लाटेंटिया ही नेहमीहून वेगळी अशी थीम पोएट्री आहे. ब्लाटेंटिया हा इंग्रजी शब्द ब्लाटा या लॅटिन शब्दापासून तयार झाला असून जर्मन भाषेत तो ब्लाटा असाच आलेला आहे आणि त्याचा अर्थ आहे झुरळ.

आद्यकवी मुकुंदराजांच्या कवितेपासून ते आजच्या नवकवींच्या काव्यातली जीवनविषयक तत्वज्ञान मांडण्याची परंपरा सांगत त्यासाठी उपयोगात आणलेल्या विविध प्रतिमा आणि प्रतीकांचा मागोवा घेत प्रस्तावनाकार या संग्रहातील लबडे सरांच्या कवितेबद्दलचं विवेचन करतात.

माणसाचा अस्तित्वासाठी,जीवनार्थ सततचा संघर्ष आणि टिकून राहण्याची वृत्ती आणि जोडीने त्याच्यापाशी असलेला अढळ असा आशावाद यांवर आधारलेल्या या संग्रहातल्या कविता झुरळाच्या प्रतिकाच्या माध्यमातून जीवनविषयक वैश्विक सत्याचं दर्शन घडवतात. जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, वैश्विक पर्यावरण आणि त्याचा होत चाललेला ऱ्हास , विस्कळित अन्नसाखळी, विविध जागतिक समस्या, महायुद्ध अशा अनेक कारणांमुळे मानव्याला निर्माण झालेला धोका या सगळ्यावर मात करून टिकून राहिलेलं वंशसातत्य यातून मानव अमर आहे हे झुरळाच्या प्रतिमेतून या संग्रहातल्या कविता अधोरेखित करतात.

या सगळ्या कवितांमध्ये माणसांची जीवनमूल्य हीच वाङ्मय मूल्य ठरली असून जीवनविषयक अनेक प्रकारच्या तत्वज्ञानाला कवीने स्पर्श केला आहे. बहुतेक कविता मुक्तछंदातच लिहिलेल्या असून काही रचना लिहिताना अभंग,साडेतीन चरण,षडाक्षरी या छंदांचेही प्रकार हाताळलेले आहेत. वर्तमानाच्या चांदण्या,तत्वज्ञानाची जडीबुटी,आशेचं गाठोडं,अंधाराची लाली,आठवणींच्या घारी अशी असंख्य रूपकं, प्रतिमा, प्रतीकं कवीने आपल्या कवितांमध्ये सढळ हस्ते वापरली असून त्यामुळे तात्विक बैठक असलेल्या या कविता सुगम,सुबोध वाटतात, त्यातलं लालित्य टिकून राहतं.अस्वस्थता हा या कवितांचा केंद्रबिंदू आहे तरीही त्या जन्ममृत्यू, जीवनप्रवासातल्या, संस्कृतीच्या जडणघडणीतल्या अनेक पैलूंचं दर्शन घडवतात.जीवनातली सकारात्मकता आणि त्याहून अधिक प्रमाणात असलेली नकारात्मकता , स्वातंत्र्यासोबत वाढलेला बेछूटपणा, टिपेला पोचलेली विषमता अशा अनेक अंगांना लबडे सरांची कविता सहजपणे स्पर्श करून जाते. लबडे सरांच्या या संग्रहातील सर्वच कविता चिंतनीय आहेत, नेहमीच्या धाटणीहून वेगळ्या आहेत. त्यातल्या मला भावलेल्या काही कवितांमध्ये मला जे भावलं ते मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

**१. हे विश्व एक कोडे आहे**

**हे विश्व एक कोडे आहे विचार करू थोडे आहे!**

खरंच अनादिकाळापासून माणूस या विश्वात राहतोय.युगानुयुगे लोटली,अनेक राजसत्ता आल्या आणि नामशेष झाल्या,पिढयानपिढ्या जन्मल्या,जगल्या आणि संपल्या.विश्वनिर्मितीनंतर त्यात वेगवेगळी स्थित्यंतरं झाली तरीही अजून कुणाला हे विश्व पूर्णपणे कळलेलं नाही,ते एखाद्या अनाकलनीय कोड्यासारखं अगम्य,अतर्क्यच राहिलेलं आहे.क्षणोक्षणी विरोधाभास आणि विपरीत परिस्थितीशी सामना करण्यात माणसांची हयात खर्ची पडते तरी हे जग आपल्यासाठी कोडंच होऊन राहिलं आहे.

**फुलणे नी परत झडणे**
**त्याचे नाव झाडे आहे**

या पृथ्वीतलावर नानाविध वनस्पती उगवतात,वाढतात,कालांतराने झडून जातात. अव्याहतपणे हे चक्र सुरू आहे.मला वाटतं इथे कवीला झाडाचा संदर्भ माणसाशी जोडायचा आहे.माणसाचं तरी याहून वेगळं काय आहे ? हे जीवन सुंदर आहे असं म्हणत इथे वर्षं घटवायची आणि एक दिवस या जगाचा निरोप घ्यायचा..पुनरपि जननं पुनरपि मरणं हे चक्र सुरूच आहे!जन्म आणि मृत्यू ही दोन्हीसुद्धा जणू कोडीच!

२. मी आपला लिहितोय कविता सुईच्या टोकानं
जिथं काळ आणि वेळ थांबली,
तिथे माझे शब्द आत्म्याला उधळून देणारे,
पुतळा होऊन उभा माझ्याच मौनाचा,
हा अंधार कुणाला गिळतोय ?
ही जगण्याची वळवळ तुटपुंजी
प्रकाशाच्या पलिकडं अंधार फक्त
हा नादही नाही, निनादही नाही प्रकाशाच्या वेगापेक्षा अंधाराच्या वेगानं पसरतो आहे,दूरदूर माझ्यातला मी! कवी आपल्या कवितेच्या माध्यमातून नानाविध विषयांमधलं सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न करत असतो पण जगात अशा काही अनाकलनीय गोष्टी क्षणोक्षणी घडत असतात की तिथे आपल्या जाणिवाही बोथट होऊन जातात. कितीही कल्पनेतलं जग उभारण्याचा प्रयत्न आपले शब्द करू पाहत असले तरी वास्तवाच्या झळा लागताच त्या सगळ्या कल्पना फोल वाटू लागतात,कल्पना आणि वास्तव यांमधली दरी आपण भरून काढू शकत नाही ही खंत कवीच्या मनाला अस्वस्थ करत राहते...

तू म्हणालास देव नाही, स्वर्ग नाही, नरक नाही,
मृत्यूनंतर माणसाला




गती नाही,
हे ब्रम्हांड फक्त वाढत
चाललं आहे!

अशा पार्श्वभूमीवर कवीला आपल्या कवितेचं नेमकं स्थान कुठलं हे क्षणभर सुचेनासं होतं!

३. डीएनए ही कवितासुद्धा अशीच विचारप्रवण कविता...माणूस स्वतःला फार बुद्धिवान समजतो पण अजून तो आपला डीएनए जपण्यात पूर्ण यशस्वी झालेला नाही;किंबहुना अन्य सजीवच यात अधिक तरबेज झालेले दिसतात..

आपल्या डीएनए जपण्याची कला कोणत्याही वातावरणात

**माणसापेक्षा झुरळाला जास्त अवगत**
**हा कोणता नेणिवेचा अमिबा आहे**
**जो वळवळत असतो माझ्यामध्ये**
**दहा पिढ्यांची स्वप्नं रंगवत राहतो**
**भल्याबुऱ्या वीर्याची चिकित्सा करत..**

या कवितेतल्या ओळी बुद्धीचातुर्याचा डंका मिरवणाऱ्या माणसाची हतबलता अधोरेखित करतात!

४. कापले गळे सत्तेनं ही कविता तर राजकारणाच्या बाजाराची कथा सांगणारी आहे.अनेक राजेरजवाडे आले आणि गेले,आपापल्या परीने नाणी,नोटा,होन अशी चलनं निर्माण करत गेले पण..

कितीक चिल्लर आली गेली,नोटा आल्या गेल्या काळाच्या पटलावर, चलनं नव्हतीच ,नुसती चलनं हा तर जिताजागता इतिहास जगाचा, आम्ही पहात राहिलो स्वप्नं झुरळं होऊन रित्या खिशानं, स्वप्नं दाखवून कापले गळे सत्तेनं हेच अंतिम सत्य ठरतं असं कवी उद्वेगाने नोंदवतो!

५. अनलिमिटेड एन्जॉय ही कविता तर जगात काहीही उलथापालथ होवो,मजा करणारे मजाच करत राहतात त्याचं वर्णन करते.

६. चिंचा गाभुळाव्या या कवितेत आभासी जगातल्या धुमाकुळाची वास्तविकता जगासमोर मांडली आहे.

आभासी गुगल वर्किंग करत नाही तरीही बोटं चाळत जातोय माणूस, डिजिटल सूर्य रोजच उगवतो,
पण मावळायचं नाव घेत नाही संवेदना हरवल्यावर
ह्या ओळी मीडियाच्या गुंत्यात फसलेल्या माणसांची मानसिकता दर्शवतात.

७. उत्पादन पद्धतीतील अंडी या कवितेत उद्योगजगताच्या तथाकथित विकासाच्या कल्पना आणि सामान्य माणसांची चाललेली ससेहोलपट यांमधील दरी दाखवून देतात.

८. बाई झुरळ झिंगलं ही कविता सगळ्या अनाचार आणि अनागोंदीने कंटाळलेल्या माणसांची वेदना मांडते...

**नाही दिसला उजेड,तरी काळोखी रंगलं**
**सारा काळोख पिऊन,बाई झुरळ झिंगलं**
**रीत बदलला काळ, गेलं वाटून आम्हास**
**मंत्र शोषणाचे नवे,नव्या रीतीनं तरास**

असं म्हणत झुरळाच्या रूपातला माणूस आपली असहायता आणि अगतिकता पोटतिडकीने जगासमोर ठेवतो.

९. विश्वाचा पाळणा हलतो या कवितेत माणसाच्या आत आणि बाहेर चहूकडे पसरलेल्या भीतीच्या छायेचं वर्णन असून

**मोजमाप मोजमाप**
**डोक्याला एकच ताप**
**चिमटी चिमटीत धरतो**
**कुठून कुठून पुरतो**
**काही उरतो काही सरतो**
**एक खेळ भीतीचा**
**एक खेळ नीतीचा**
**चक्कर चक्कर मतीचा**
**विश्वाचा पाळणा हलतो**
**सरळ नाही तिरपा चालतो**

असं म्हणत कवी जगाच्या तिरपागड्या रीतीचा आणि नीतीचा मागोवा घेतो!ही कविता वाचताना मला दुनियेच्या अंधेरनगरिचा न्यायच सारा उलटा हे नाट्यपद राहून राहून आठवतं.

१०. ब्लॅक होलचा शाप ही संग्रहातली शेवटची कविता
आम्हीच कारणीभूत आहोत या साऱ्याला
चन्द्र सूर्य तारे ग्रह आहेत तिथंच आहेत
नव्या वस्तीच्या शोधात साऱ्या कल्पना
रंगबिरंगी कातड्यांनी माणसं न्याहाळत राहतात
नव्या जगाच्या शोधात एलिनसारखा माणूस शोधत राहील. मकडिणीच्या गोष्टीसारखा वृत्तीप्रवृत्तींची कोळिष्टकं कोनाड्यातून झुरळांवर फवारे मारून आम्ही निश्चिन्त अधःपतितांच्या भूमीला शाप आहे ब्लॅक होलचा

असं म्हणत दिवसेंदिवस होत चाललेल्या माणसाच्या अधःपतनावर कवी भाष्य करतात! मानवी मनातील जिज्ञासा वाढविणारा हा संग्रह आहे. ही जिज्ञासा चिरंतन आहे. मी स्वतः शब्दांच्या जगात थोडीफार वावरत असले तरी या पुस्तकातल्या कवितेची बैठक पूर्णपणे वेगळी आहे,त्यातून मुक्त छंदात मी तसं काहीच लिहिलेलं नाही पण एक अभ्यास म्हणून हे पुस्तक वाचायला मिळालं आणि त्यात मला जे गवसलं ते माझ्या कुवतीनुसार मांडायचा प्रयत्न केलाय.

हे पुस्तक घेऊन जरूर वाचावं असंच आहे!

**परीक्षक© अर्चना देवधर, रत्नागिरी**
**कवी : डॉ.श्री. बाळासाहेब लबडे***
**प्रकाशक : न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस, शनिवार पेठ पुणे, मोबाईल-8798202020**
**पृष्ठे: १५०**
**किंमत: २००**

# जातीभेद विरोधी संघर्षाची ठिणगी !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**संतशिरोमणी रोहिदास उर्फ गुरु रविदास महाराज हे इ.स.१५ ते १६व्या शतकादरम्यान भक्ती चळवळीचे भारतीय रहस्यंवादी कवी होते. त्यांच्या भक्तिगीतांचा भक्तिचळवळीवर पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या प्रदेशात गुरू- शिक्षक म्हणून कायमचा प्रभाव पडला आहे. ते कवी-संत, समाजसुधारक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होते. गुरुग्रंथ साहिब या शीख धर्मग्रंथांमध्ये सद्गुरू रविदासजींच्या भक्तिगीतांचा समावेश आहे. हिंदू धर्मातील दादूपंथी परंपरेच्या पंचवाणी मजकुरामध्ये त्यांच्या असंख्य कवितांचा समावेश आहे. संतश्रेष्ठ रविदासजींनी जाती आणि लिंग यांच्यामधील सामाजिक भेदभाव हटविण्यास आणि वैयक्तिक आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एकतेला प्रोत्साहन दिले.**

**"ऐसा चाहूँ राज मैं जहाँ मिलै सबन को अन्न।**
**छोट बड़ो सब सम बसै, रैदास रहै प्रसन्न।।"**

संत रोहिदास यांचा जन्म सुमारे इ.स. १४५०मध्ये झाला असावा असे म्हणतात. भारतवर्षात त्यांची जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेस मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. त्यांचा जन्म वाराणसीजवळील सीर गोवरधनपूर गावात झाला आहे. त्यांचे जन्मस्थान श्री सद्‌गुरू रविदास जन्मस्थान म्हणून ओळखले जाते. त्यांची आई घुरबिनिया आणि त्यांचे वडील रघुराम होत. त्यांचे पालक चर्मकार होते; ते चामड्याच्या वस्तू तयार करीत. त्यांनी त्यांचे बहुतांश आयुष्य गंगा नदीच्या काठावर आध्यात्मिक अनुयायांमध्ये- सूफी संत, साधू व तपस्वी यांच्या सहवासात घालविले. भारतभर फिरून त्यांनी महान कार्य केल्यामुळे ते जाणले जातात. ते समाजसुधारक संतांमध्ये अग्रणी होते. ते कुलभूषण संतकवी होते. तसेच तत्कालीन प्रचलित सामाजिक विद्वान होते. त्यांनी लक्षणीय योगदान दिले. त्यांच्या गुरुग्रंथ साहिबमध्ये असलेल्या भक्तिरचना आजही लोकप्रिय आहेत-

**"कृस्न, करीम, राम, हरि, राघव, जब लग एक न पेखा| वेद कतेब कुरान, पुराणन, सहज एक नहिं देखा||"**

संतशिरोमणी रोहिदास उर्फ गुरु रविदास महाराज हे इ.स.१५ ते १६व्या शतकादरम्यान भक्ती चळवळीचे भारतीय रहस्यंवादी कवी होते. त्यांच्या भक्तिगीतांचा भक्तिचळवळीवर पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या प्रदेशात गुरू- शिक्षक म्हणून कायमचा प्रभाव पडला आहे. ते कवी-संत, समाजसुधारक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होते. गुरुग्रंथ साहिब या शीख धर्मग्रंथांमध्ये सद्‌गुरू रविदासजींच्या भक्तिगीतांचा समावेश आहे. हिंदू धर्मातील दादूपंथी परंपरेच्या पंचवाणी मजकुरामध्ये त्यांच्या असंख्य कवितांचा समावेश आहे. संतश्रेष्ठ रविदासजींनी जाती आणि लिंग यांच्यामधील सामाजिक भेदभाव हटविण्यास आणि वैयक्तिक आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एकतेला प्रोत्साहन दिले-

**"जाति-जाति में जाति हैं, जो केतन के पात।**
**रैदास मनुष ना जुड़ सके जब तक जाति न जात।।"**

विविध भक्ती चळवळीतील कवयित्रींच्या प्राचीन जीवनांपैकी एक असलेला अनंतदास परचाईचा हा मजकूर सद्‌गुरु रविदासजींच्या जन्माची ओळख करून देतो- "बनारस शहरामध्ये, कोणत्याही वाईट गोष्टी कधीही पुरुषांना भेट देत नाहीत. जो कोणी मरण पावला तो नरकात जात नाही, स्वतः शंकर राम या नावाने येतो. जेथे श्रुती आणि स्मृती यांचा अधिकार आहे, तेथे रोहिदासांचा पुनर्जन्म झाला."

**"रविदास जन्म के कारनै, होत न कोउ नीच|**
**नर कूँ नीच करि डारि है, ओछे करम की कीच||"**

आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि हिमालयातील हिंदू तीर्थक्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या. त्याने परमात्म्याचे सगुण- गुणधर्म, प्रतिमेसह असलेले स्वरुप सोडून दिले आणि निर्गुण- गुणधर्मांशिवाय, अमूर्त असलेल्या परमात्म्यांच्या स्वरुपावर लक्ष केंद्रित केले. बहुतेक विद्वानांचा असा विश्वास आहे, की संतशिरोमणी रोहिदास हे शीखधर्माचे संस्थापक श्रीगुरु नानकदेवजी यांना भेटले. त्यांचा शीख धर्मग्रंथात आदर आहे आणि सद्‌गुरू रविदासांच्या ४१ कवितांचा आदि ग्रंथात समावेश आहे. या कविता त्यांच्या कल्पना आणि साहित्यिक कामांचे सर्वात जुने प्रमाणित स्त्रोत आहेत. रविदासांच्या जीवनाबद्दल आख्यायिका आणि कथांचा आणखी



एक महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे शीख परंपरेतील प्रेमलेखन म्हणजे प्रेमबोध होय. सन १६९३मध्ये संतश्रेष्ठ रविदास यांच्या मृत्यूनंतर १५० वर्षांहून अधिक काळ रचलेल्या या मजकुरामध्ये भारतीय धार्मिक परंपरेतील सतरा संतांपैकी एक म्हणून त्यांचा समावेश आहे. संत रवीदासांच्या जीवनाविषयी इतर बहुतेक लेखी स्त्रोत, शीख परंपरा आणि हिंदू दादुपंथी परंपरेचे ग्रंथ हे २०व्या शतकाच्या सुरूवातीस किंवा सुमारे चारशे वर्षांनंतर तयार केले गेले होते.

**"रैदास कनक और कंगन माहि जिमि अंतर कछु नाहिं।**
**तैसे ही अंतर नहीं हिन्दुअन तुरकन माहि।।"**

विन्नंद कॉलवेर्टने नमूद केले आहे, की गुरुदेव रविदासांवर अनंतदास यांच्या संतचरित्राची चाळीस हस्तलिखिते भारताच्या विविध भागात सापडली आहेत. शिख बांधवांचा आदिग्रंथ- गुरुग्रंथ साहिब आणि हिंदू योद्धा-तपस्वी गटाचे पंचवाणी दादूपंथी हे गुरू रविदासांच्या साहित्यकृतींचे दोन प्राचीन साक्षात स्त्रोत आहेत. त्यांच्या कवितेत द्वितीय किंवा तृतीय श्रेणी असमान नागरिक, वैराग्याची आवश्यकता आणि खरा योगी अशा विषयांचा समावेश आहे. पीटर फ्राईड लँडर असे म्हणतात, की संत रविदासजींच्या मृत्यूनंतरही त्यांचे लिखाण भारतीय समाजात संघर्षाचे आहे. त्यांचे जीवन विविध प्रकारच्या सामाजिक आणि आध्यात्मिक विषयांना अभिव्यक्त करण्याचे साधन ठरत आहे. कारण-

"हिंदू तुरक नहीं कछु भेदा सभी मह एक रक्त और मासा|
दोऊ एकऊ दूजा नाहीं, पेख्यो सोइ रैदासा||"

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या समाजोद्धाराच्या क्रांतिकारी कार्यांना विनम्र अभिवादन !!

तुकारामनीती
भाग -४३

# तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**कोणत्याही लेखनाचा उद्देश काय असावा? हा मुलभूत प्रश्न नित्य उपस्थित होत असतो आणि त्या प्रश्नाची अनेक उत्तरे चिंतकासमोर सहजतेने येतात. त्यातील विविध उद्देशांपैकी एक म्हणजे उपदेश किंवा लोकजागृती हा एक उद्देश नक्कीच असणे अपेक्षित आहे. शुक्र नीती, चाणक्य नीती, विदुर नीती, भृतहारी नीती, आणि फ्रीजीया देशातील इसाप नावाच्या बुद्धिचातुर गुलामाने सांगितलेल्या अनेक कथा ज्या इसाप नीती म्हणून प्रसिद्ध आहेत. या सर्वच नीतीच्या तोडीची आणि समाजात नित्य नित्य सर्वोच्च मुल्ये प्रस्थापित करणारी तुकोबांच्या अभंगातून प्रतीत होणारी ही 'तुकाराम नीती!' नीती विषद करणारी वरील बहुतांश व्यक्तिमत्वे ही कठीण परिस्थितीतून आली असून त्यांनी प्रतिपादन केलेली अजरामर नितीतत्वे म्हणजे कोणत्याही काळी, कुणालाही पथदर्शी ठरणारी मुल्ये म्हणजेच त्या त्या व्यक्तीच्या नावाने असलेली नीती होय. याच न्यायाने तुकाराम नीती ही अलीकडच्या काळातील सर्वोच्च नीती असून त्यातून तूकोबांनी तमाम मनावजातीला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. राजा भृतहरी यांनी नीतिशतक, कौटिल्य अर्थात चाणक्याने राज्यकारभार व दैनंदिन मानवी जगणे, महात्मा विदुराने तशीच जगण्या-वागण्याची नितीतत्वे सांगून आपल्या समकालीन लोकांना आपल्या तत्सम जीवनसंबंधाने जागृत केले.**

या सर्वच महापुरुषांच्या नीती जरी त्यांच्या समोरील आलेल्या प्रसंग आणि परिस्थितीच्या निर्मितीतून आल्या असल्या तरी यांनी आपले सार्वकालिक मुल्ये-विचार समाजाला देऊन विवेकवादी दिशानिर्देश केले आहेत. यातील बहुतांश त्यांचे अनुभवाचे बोल असून त्यांनी सोसले-भोगलेले त्यांच्या लेखणीतून बाहेर आले आहे. ही सगळीच तत्वे जगद्गुरू तुकोबाराय यांच्या अभंग नीती म्हणजेच तुकाराम नीतीला चपखलपणे लागू होतात.

तूकोबांनी स्वतःच्या जीवनात आयुषभर अखंड अपमान-अवहेलना-प्रतारणा झेलूनसुद्धा आपले भजन-कीर्तन आणि अभंग लेखन थांबवले नाही. ज्यांनी उसांनी मारले, त्याच उसाचा रस करून मारणाऱ्याला पाजणारे महात्मा तुकोबाराय म्हणजे सामान्यातून उगम पावलेला असामान्य माणूस! तुकोबांचे कुणासीही वैर अथवा फारसे सख्यही नव्हते. व्यवहारात तोटा येत असल्यामुळे पत्नी नित्य किरकिर करणारी. 'बाईल कर्कशा' असे खुद्द तुकोबांनीच लिहिले आहे. त्याशिवाय आई-वडील निवर्तले, गावचा पाटील कोपलेला, भजन-कीर्तन-लेखन करायला गेले कि; धर्ममार्तंड मारायला उठायचे. अशी भयंकर परिस्थिती असतांना देखील तुकोबा समाजाचे सर्वकाळ उत्थान व्हावे, समाजातील सर्वच माणसं सुखी व्हावेत, सर्वच सन्मार्गी लागावे ही अपेक्षा मनात ठेवून आपले भजन-कीर्तन-अभंग कार्य नित्य नित्य चालूच ठेवतात. संत तुकोबाराय आपल्या अभंगातून खळाची लक्षणे सांगून सज्जन माणसांना आणि सर्वच समाजाने सद्वर्तनी वागावे यासाठी उपदेश करतात.

**रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसातेजी शामकर्ण ॥१॥**
**तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥२॥**
**सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचे विष जाऊ नेणें ॥३॥**
**तुका ह्मणे श्वाना क्षीरीचे भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥४॥ (शा.अ.गाथा अ.क्र. ८१५)**

"तेंवी खळा काय केल्या उपदेश" असे लिहितात कारण माणसाचे मानस म्हणजे मानसिकताच जर शुद्ध-बुद्ध नसेल तर त्याला केलेला उपदेश म्हणजे वांझ झाडाला दगड मारून फळाची अपेक्षा करण्यासारखे होय. याच अनुषंगाने तुकोबाराय समाजात प्रचलित विविध उदाहरणे देऊन प्रबोधन करतात. उकिरड्यावर किंवा घाणीवर लोळणे एवढेच माहित असणाऱ्या एखादा गाढवाला एखाद्या तीर्थावर नेऊन किंवा महागड्या, सुवासिक साबणाने अंघोळ घातली म्हणजे तो सुंदर-देखणा-रुबाबदार शामकर्ण घोडा होईल का? अंघोळ घातलेला गाढव पुन्हा उकिरड्यावर किंवा घाणीवर जाऊन लोळणार! तो शामकर्ण घोड्याच्या रुबाबात राहुच शकत नाही. याचप्रमाणे एखाद्या नागाला साखर मिश्रित अमृत पाजले तरी त्याच्या शरीरातील म्हणजेच विषारी दातांतील विष अमृत केंव्हातरी



होईल काय? याचे उत्तर 'अजिबात नाही' असेच येईल! याच अभंगात शेवटी, एखाद्या कुत्र्याला खिरीचे-मिष्टान्नाचे भोजन दिले तरी; तो कुत्रा उलटी करून पुन्हा आपली उलटी म्हणजे घाण खायचे सोडणार नाही. याचप्रमाणे जे दुर्गुणी किंवा वाईट वागणारे लोक आहेत ते त्यांचा मूळ गुणधर्म सोडतील काय? असा सरळ-साधा प्रश्न तुकोबाराय इथे करतांना दिसतात.

तुकाराम नीतीच्या अनुषंगाने हा अभंग अत्यंत महत्वपूर्ण असून तुकाराम गाथ्यात याच अभंगाच्या मागेपुढे असे काही महत्वपूर्ण अभंग आलेले आहेत. जसे कि, "शुकराशी विष्टा माने सावकाश। मिष्टांनाची त्याशी काय गोडी॥"(८१४), "जेवी नवज्वरे तापले शरीर। लागे तया क्षीर विषतुल्य॥" (८१६). हे दोन अभंग आणि वरील अभंग हे खूपच महत्वाचे असून यातून तुकोबांना सज्जन लोकांना उपदेश करावयाचा आहे. समाजात काम करत असतांना अनेक अनुभव येतात. काही माणसांना कितीही उपदेश करण्याचा प्रयत्न केला तरी ती माणसे कुणाचेच ऐकायला तयार नसतात. ज्याप्रमाणे लिंबाच्या झाडाला साखरेचे आळे केले तरी लिंबोळी गोड होईल काय? त्याचप्रमाणे काही माणसे लाख प्रयत्न करूनही सत्संगती आणि सन्मार्गावर चालत नाहीत. त्यांना उपदेश करतांना तुकोबाराय झणझणीत भाषा वापरून त्यांना योग्य वाटेवर आणण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी तुकोबा मुद्दाम टोचेल अशी भाषा उपयोगात आणतात. दुर्जन लोकांना गाढव, विषारी साप, कुत्रा या उपमांनी अपमानित करतांना माणूस असूनही त्यांनी या रानटी पशुंचे दोष आपल्या जीवनात अंगिकारले असून ते त्यांच्या जीवनासाठी अत्यंत घातक आहेत. तुकोबा लिहितांना कुणाचाही मुलाहिजा बाळगत नाहीत. त्यांना तळागाळातील गाळ काढून तिथे स्वच्छ-निर्मळ तळ बनवायचा आहे जेणेकरून समाज पुन्हा अधोगतीला जाणार नाही. समाजाची अवनती होणार नाही यासाठी तुकाराम महाराजांचे नित्य प्रयत्न राहिले आहेत. माणसाचे मानस म्हणजेच चित्त किंवा अंतःकरण निर्मळ-शुद्ध असायला हवे, असे असेल तरच त्या व्यक्तीला उपदेश करणे योग्य राहते. तिचं माणसे सद्विचार ऐकून सद्वर्तनी होऊ शकतात.

तुकाराम नीती माणसाला शुद्ध करायला निघालेली सर्वोच्च नीती असून इतर नितीप्रमाणे इथे तुकोबाराय सुद्धा आपल्या विविध उदाहरणांनी जन सामान्यांना उपदेश करतांना दिसतात. माणसाने आपल्या जीवनात आपले इप्सित धेय्य साध्य करण्यासाठी सन्मार्गाने वर्तन करून स्वतःचे आणि आपल्या भोवतालचे जगणे-वागणे-बोलणे-चालणे इत्यादी व्यवहारसुद्धा शुद्ध-पवित्र करावेत. असे झाल्यास माणसामाणसामध्ये भेद राहणार नाही. ज्याप्रमाणे एखादा छोटासा काटा मोठ्या टायरला पंक्चर करतो त्याप्रमाणे एखादा दोष किंवा दुर्गुण चांगल्या माणसाला नामोहरम करतो. तो दोष त्याचे अस्तित्व शून्य करून टाकतो. त्यासाठी सर्वच नितीकारांनी माणूस केंद्रस्थानी मानून आपली तत्वे, कथा विषद केल्या आहेत. सांप्रतकाळी या सर्वच नीतीची नितांत आवश्यकता असून त्यातून आपले वर्तमान आनंदी होणे अपेक्षित आहे. माणसाने आपल्यातील दुर्गुण-दोष टाकून द्यावेत. माणूस ह इतर प्राणीमात्रांच्या तुलनेत श्रेष्ठ पाणी असून त्याने आपल्या बुद्धिचातुर्याच्या बळावर अशक्यप्राय गोष्टींवर प्रभुत्व-विजय संपादन केला आहे. याची जाण आणि भान माणसाने नित्य नित्य ठेवून आपले जीवन सुजलाम-सुफलाम करणे अपेक्षित आहे.

वर्तमान मोठा खडतर आहे. आज मानवासमोर अनंत आव्हाने आ वासून उभी आहेत. अनंत जीवघेण्या व्याधींनी माणसाला विळखा घातला आहे. त्याचबरोबर मोबाईलने उरलासुरला माणूस खल्लास केला आहे. अशा भीषण-भयावह परिस्थितीत तुकोबांची गाथा आपल्या सर्वांचीच पथदर्शी होत आहे. तुकोबांचे अभंग आणि त्यांचा एकेक शब्द सर्वांनाच सर्वकाळ पथदर्शी होतो आहे. आज सगळीकडे वाचन संस्कृती लोप पावत चाललेली आहे. तरुण-मध्यमवयीन-प्रौढ-वृद्ध कुणीच वाचन करायला तयार नाहीत. जो तो मोबाईल आणि चॅटिंग मध्ये व्यस्त आहे. सगळे वर्तमान आभासी गोष्टींनी व्यापले असून सत्यापासून माणूस दूर जातांना पाहून मन स्तंभित होत आहे. तरुणांना वाचनाची आणि आपल्या महान लोकांच्या साहित्याची ओळख व्हावी, त्यांच्या जीवनाचे अवलोकन व्हावे यासाठी जवळपास मागील एक वर्षापासून तुकाराम नीती हे सदर लिहित आहे. या लेखनाचे फलित काय झाले? याचे अवलोकन करणे मला शक्य नसले तरी अनेक वाचकांच्या मिडीयावरील, फोन करून, प्रत्यक्ष भेटून मिळालेल्या प्रतिक्रिया खूपच महत्वपूर्ण वाटतात. ज्याप्रमाणे तुकाराम दर्शन हे शीर्षक सर्वश्रुत झाले त्याचप्रमाणे आजघडीला तुकाराम नीती हे शीर्षकसुद्धा सर्वश्रुत होऊन निश्चितच त्यातून लोकांना वाचनाची ओढ निर्माण झाली असावी असा माफक आशावाद मनात आहे. ही या लेखनाची मिळालेली पावतीच म्हणायला हरकत नाही. आजघडीला दर रविवारी या सदरात आपण कोणता अभंग निवडावा आणि त्यातून आपल्याला काय सांगायचे आहे? हे माझे चिंतन मला सुद्धा बरेच उपदेश करून गेले. तुकाराम नीती या शीर्षकाविषयी काही तुकोबाप्रेमी मंडळींनी आक्षेप घेणे साहजिक आहे, मात्र कोणतेही शीर्षक संक्षिप्त असावे, त्यातून हवा तो बोध व्हावा हीच माफक अपेक्षा असते. त्यामागे अन्य कोणताही उद्देश नसतो, कारण जगद्गुरू तुकोबाराय माझे आणि तमाम महाराष्ट्रीय जणांचे श्वास, जीव कि प्राण आहेत! तेंव्हा चला जगद्गुरू तुकोबाराय वाचूया, नीट समजून घेऊन स्वतःसह आपला भोवताल आनंदी करूयात! जय तुकोबाराय!

# सत्य परिस्थितीची जाणीव करून देणारा लेखसंग्रह



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**सृष्टीमध्ये अनेक सजीव आहेत पण बोलण्याचे , व्यक्त होण्याचे वरदान मानवाला लाभले आहे. आपल्या मनात निर्माण होणाऱ्या अनेकांगी भावभावना मानव शब्दातून व्यक्त करत असतो. संवाद साधून आपले मत, विचार इतरांपर्यंत पोहचवत असतो आणि संवाद साधण्याचे महत्वाचे माध्यम म्हणजे भाषा. कलेला सुद्धा माध्यम असते. जसे लेखक,कवी आपल्या लेखणीद्वारे व्यक्त होतात, चित्रकार रंग- रेषांच्या माध्यमातून भूमिका मांडतो. प्रत्येकाचे माध्यम वेगळे असले तरी हेतू एकच व्यक्त होणे. मनात निर्माण होणाऱ्या भावनांचा योग्य निचरा होणे गरजेचे असते. त्या भावना बाहेर न येता आतच साचून राहिल्या तर उद्रेक होऊ शकतो.**

या पद्धतीने आपले मत, विचार मांडण्याचे महत्त्व जाणून स्तंभलेखक , पत्रकार अनंत बोरसे यांनी आपल्या लेखणीला पुस्तकरूप दिले आहे. 'अव्यक्त अनंत @ ६१ ' हे त्यांचे पहिलेवहिले पुस्तक. ह्या लेखसंग्रहातून लेखकाने जागरूक नागरिक या नात्याने आपल्या विचारांची मांडणी केली आहे. लेखक अनंत बोरसे यांनी ३२ वर्ष बँकेत नोकरी केली आणि सेवानिवृत्त झाले तरीही आपल्या लेखणीतून ते सातत्याने महत्वपूर्ण मुद्दे अधोरेखित करत असतात. महाविद्यालयीन काळापासून त्यांना लिखाणाची आवड आहे. विविध वर्तमानपत्रातून ते स्तंभलेखन करत असतात आणि आपले मत मांडत असतात. 'अव्यक्त अनंत @ ६१' ह्या लेखसंग्रहात एकूण १७ लेखांचा समावेश आहे. सामाजिक, राजकीय, नागरी सुविधा, लोकप्रतिनिधी, महागाई, निवडणुका, मतदार असे अनेक विषय त्यांनी लेखातून मांडले आहेत. लेखांची मांडणी मुद्देसुद आहे, सहज- सोपी निवेदनशैली, आटोपशीर रचना असल्याने वाचताना सहजपणा जाणवतो. लेखनात लेखकाचे प्रतिबिंब सहजपणे उतरत असते, त्यानुसार हे पुस्तक वाचताना लेखकाची जागरूक वृत्ती, विषय मांडण्याची हातोटी, तत्संबंधित विषयाचे ज्ञान , व्यावहारिक ज्ञान ह्या गुणांचे प्रतिबिंब झळकते. त्यांची लेखनशैली त्यांची ओळख आहे.

वर्तमानपत्रात मांडलेले मत, विचार हे प्रासंगिक असतात. त्यामुळे ठराविक कालावधीनंतर हे विचार विचाराधीन होतात. म्हणून ह्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांना पुस्तकरुपात मांडण्याची लेखकाची भूमिका अत्यंत योग्य आहे. आपल्या आजुबाजुला असे अनेक विषय आहेत, ज्याकडे माणसे पाहतात, त्यावर आपले मत व्यक्त करतात आणि पुन्हा आपल्या कामाला लागतात. म्हणजे बोलाचा भात आणि बोलाची कढ़ी. प्रत्येक जण आपले काम आणि आपण या वर्तुळात वावरत असतो. आपली भूमिका ठामपणे मांडत नाहीत. ही दुनियादारी मी का करू ? या संकुचित विचारसरणीमुळे चुकीच्या धोरणांना विरोध केला जात नाही. एका जागरूक नागरिकाची भूमिका , त्याची कर्तव्ये कोणती, याची जाणीव करून देणारे हे पुस्तक आहे. आपल्या आसपास, समाजात घडणाऱ्या घडामोडींवर आपली मते व्यक्त करण्याचा अधिकार आपण बजावला पाहिजे, ही व्यक्त होण्याची ऊर्जा लेखकाने याद्वारे दिली आहे. काही लेखातून लेखक सामाजिक, राजकीय प्रश्नांवर भाष्य करताना दिसतात तसेच ' एका ट्रिपची गोष्ट, सगळ्यांना एकत्र करून - तो एकटाच निघून गेला, बाप नावाचा बापमाणूस , या टोपीखाली दडलंय क़ाय? इत्यादी लेखातून लेखकाची भावनाशील, संवेदनशील बाजू दिसून येते. पोलिसांप्रति सामान्य जनतेच्या मनातील प्रतिमा, काही लोकांमुळे चांगल्या पोलिस अधिकाऱ्यांची प्रतिमा कशी मलीन होते, जनतेच्या मनात असणारी भीती या गोष्टी 'आमचा पोलीस दादा कुठे हरवला' या लेखातून विशद केल्या आहेत. महागाई, इंधन दरवाढ, बेरोजगारी ह्या समस्या जैसे थे आहेत. 'वाढता विद्वेष आणि वाढती कटुता' या लेखातून लेखकाने देशाची, राज्याची सत्यस्थिती कथन केली आहे. 'लोकशाहीच्या उत्सवाचा, राजा एक दिवसाचा' हा लेख डोळ्यात अंजन घालणारा आहे. फक्त मतदान करून आपले कर्तव्य पूर्ण होत नाही तर एक जागरूक नागरिक म्हणून प्रश्न उपस्थित करण्याची भूमिका ही हाती घेतली पाहिजे, अन्यायाला विरोध करण्याची धमक असायलाच हवी, तरच मतदार हा राजा होईल, हे महत्वपूर्ण विचार लेखातून व्यक्त केले आहेत.

या पुस्तकाद्वारे लेखक सामान्य जनतेच्या विचारांचे प्रतिनिधित्व करत आहेत. सर्वसामान्य जनतेच्या मनातील भावना , अस्वस्थता, अस्थिरता या लेखांतून व्यक्त झाल्या आहेत. एकूणच , कल्पनेत रममाण न होता वास्तवतेची जाणीव करून देणारा हा लेखसंग्रह आहे.

**( अव्यक्त अनंत @ ६१ / लेखक : अनंत बोरसे / प्रकाशक : शॉपिंजन / मूल्य : २२७ रुपये )**




# शेतीपूरक व्यवसायाकडे वळावे!

आधुनिक केसरी

आपला भारत देश कृषीप्रधान देश आहे. देशातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. आज काळ बदलला आहे सर्वत्र स्पर्धा वाढली आहे. तसेच शेती व्यवसायात देखील अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. शेतीमालाला योग्य बाजारभाव न मिळणे हे शोकांतिका आहे. त्यामुळे शेती बेभरोशाची झाली आहे.
आज शेतीला कष्टाशिवाय पर्याय नाही. शेतीत राबले तरच शेती व्यवसाय होत आहे.
आज काळाच्या ओघात शेतीचे तुकडे झाले, खाणारे तोंडे वाढली हाताला काम कमी पडले, त्यामुळे शेतकऱ्यांनी काळाचे पावले ओळखून शेती व्यवसायाकडे शेतीपूरक व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे.

शेतीसाठी लागणारे योग्य नियोजन, कष्ट करण्याची तयारी , व्यवसायात झोकून देण्याची तयारी यामुळे कोणताही व्यवसाय शेतीपूरक व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांच्या हाताला दाम मिळेल. कुक्कुट पालन ,दुग्ध पालन व्यवसाया कडे वळल्यास शेतकऱ्यांना चांगले सुगीचे दिवस येतील. आज दुग्ध व्यवसायात ग्राहकात जागरूकता वाढलेली आहे. गुणवत्ता तसेच दोन पैसे अधिक खर्च केल्यास शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायकडे पाहिले पाहिजे. आज दुग्ध व्यवसाय हा पूर्ण वेळ व्यवसाय म्हणून पाहिला जात आहे. या क्षेत्रात खूप मोठ्या संधी आहेत. गाई म्हशींचे आधुनिक पद्धतीने व्यवस्थापन तसेच यांत्रिकीकरणाद्वारे दर्जेदार दुधाची निर्मिती यामुळे दुग्ध व्यवसायात चांगली संधी आहे. शेतकऱ्यांनी अध्यायावत आधुनिक तंत्राने दुग्ध व्यवसायात पशुखाद्यावर होणारे खर्चाचे व्यवस्थापन, जनावरांचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन, कसे करता येईल याकडे पाहिले पाहिजे. दुग्ध व्यवसायातूनच शेणमुत्र, गोबर गॅस, गांडूळ खताची निर्मितीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कष्टाची तयारी ठेवून आत्मविश्वासाने शेती पूरक व्यवसायाकडे उतरायला हवे. उत्तम गुणवत्ता हाच ध्यास असला पाहिजे. व्यवसायात नाविन्यता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कल्पनाशक्ती दूरदृष्टी आणि नेतृत्व गुण या या गुणांच्या आधारे आपण शेतीपूरक व्यवसायाकडे वळले पाहिजे. **संतोष दत्तू शिंदे**

## प्रीत नाते

सख्या प्रेमाच्या पलीकडे
दोघांचे आपले प्रीत नाते
नव्हे त्याला नाव कोणते?
तुज संगतीत रे गीत गाते...

जीवन रथातले रे प्रवासी
होता वळणावर तुझी भेट
विचार आपलेच जुळताच
हृदयास भिडला तूच थेट.....

एकमेकांशिवाय हो जगणे
मृत्यू येई जसा श्वासाविना
दोन आत्म्यांचे होता मिलन
जीवना अर्थ नसे तुझ्याविना..

सामाजिक क्रांती करण्यास
हात हाती गुंफून चालू वाट
असो कितीही खडतर बिकट
तेव्हा सजेल जगण्याचा थाट...


नको मजला चंद्र अन् चंद्रिका
साथ हवी रे तुझी जगा वेगळी
ध्येय माझे जाणून दिली साथ
संगतीने दुःख विसरली सगळी.....

वरून भासे फणसासारखा
दुःख मजला होता येई पाणी
प्रेम नगरीतील आपण दोघेच
राजा राणी गावूया प्रीत गाणी....

विचारांची होताच मांदियाळी
प्रेमाची घालतो अलगद फुंकर
प्रीत झुल्यावर झुलतांना सख्या
फुटावा विचारांचा खास अंकुर....

- सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे

## वेल सुकता सुकता..



काळजाला पडते चीर
डोळ्यातून फुटतो पान्हा,
तरीही वात्सल्याच्या वेलीवर
ममतेचे फुल फुलते पुन्हा पुन्हा
तिरस्कारचा काटा हृदयी
रुतून रक्ताचा थेंब न थेंब
भळ भळतो जेंव्हा केंव्हा
तरीही भावनेचे ते कोमल
फुल फुलू पहाते पुन्हा पुन्हा
निर्माल्यतल फुल पायदळी
तुडवून मातीतल्या मातीतच
मिसळून जाते पुन्हा,
शांत झालेल्या मातीतल्या
त्या मातीला ही धरणी माय
दुभंगून कवेत घेते केव्हा केव्हा.
भावनेच्या भाव फुलांची
ओंजळ चरणांवर अर्पुनी
चरणांवर व्हावी की कधीतरी
रिती, पण एका एका कणाच्या
सिंचनातून फुललेली नाती
तिथेच कशी
आणि का जन्म घेते अनिती ?
-वैशाली चंद्रकांत महाडिक
मो.9767437923

## बस ( एस.टी.)

भेट व्हावी तुझी माझी म्हणून लगबग निघालो
उभी राहतेस नेहमी तिथेच उभा राहिलो
नजर पोहचते तिथपर्यंत तुलाच पाहत राहिलो
न येण्याने तुझ्या अधीर मनी झालो
उभ्या शेजारील प्रवाशांशी बोलत राहिलो
निमित्ताने तुझ्या का होईना त्यांशी बोललो
एकमेकांच्या आम्ही भूतभविष्यात गेलो
वर्तमानात येथेच आहोत विसरून गेलो
बोलता बोलता दिसू लागली येताना
चेहरा बघून तुझा मनी आनंद मावेना
नेते आणते सुरक्षित विश्वास तुझ्यावर
नाही भरवसा आता गुळगुळीत रस्त्यावर
चालक वाहक खरंच आहे यांची कमाल
होऊ देत नाहीत कधी प्रवाशांचे हाल
सामान्यांना परवडणारा प्रवास तुझाच आहे
खरं सांगतो गोरगरिबांची आई तुच आहे
प्रत्येकाने प्रवास नेहमी बसनेच करावा
रापमचा अभिमान सकलांनी मानावा
आठवत सारेच माझ्या गावी उतरलो
जोडून हात तुला घरी माझ्या पोहोचलो
आनंदा वारांगणे,
मुख्याध्यापक,
मोलखेड, ता. सोयगाव



## घोषणांचा पाऊस

पुन्हा एकदा पडला
घोषणांचा पाऊस जोरदार
ठेवूनी सत्ता डोळ्यासमोर
घोषणांचा उडाला बार
होई अर्थाचा संकल्प
प्रत्येक वर्षी नवा
गरीबाच्या पदरी नाही
पडत काही भावा
घोषणा कितिही होवो
गरीब गरीबच असतो
विकासाचा तो रस्ता
त्याच्या दारी नसतो
नका करू घोषणा
फक्त द्या हमीभाव
शेतीमाल शेतकर्याचा
विकतोय कवडीमोल राव
करून अर्थाचे संकल्प
नाही पोहचणार विकास
जर होईल सुखी शेतकरी
तरच विकसित होईल देश
संदिप नानासाहेब वाकडे
मो.9766992776

## मनात विचार आला..!!!

मी शिवरायांच्या प्रथिमेकडे
पाहिल अन् मनात विचार आला
हेच ते छत्रपती ज्यांनी अठरापगड
जाती, बलुतेदार, अलुतेदार
सोबत घेऊन स्वाभिमानाचे
स्वराज्य निर्माण केले..!!

मी फुलेंच्या प्रतिमेकडे पाहिलं
अन् मनात विचार आला हेच ते
महात्मा ज्यांनी स्त्री-पुरुष भेद न
ठेवता सर्वांना शिक्षणाची दारे
खुली केली..!!

मी शाहुराजांच्या प्रतिमेकडे
पाहिल अन् मनात विचार आला
हेच ते राजर्षी ज्यांनी जात-पात,
धर्म न पाहता समतेवर आधारित
राज्याची स्थापना केली..!!

मी बाबासाहेबांच्या प्रतिमेकडे
पाहिलं अन् मनात विचार आला
हेच ते घटनाकार ज्यांनी न्याय,
हक्क, समानतेचा अधिकार,
स्वातंत्र्य देऊन धर्मनिरपेक्ष
नवभारत निर्माण केला..!!

मी अण्णाभाऊंच्या प्रतिमेकडे
पाहिलं अन् मनात विचार आला
हेच ते साहित्यरत्न ज्यांनी
आपल्या लेखणीतून कामगार,
शेतकरी, शोषित, पीडित,
वंचितांचे दुःख जगाच्या दरबारात
मांडले..!!

मी माणसांच्या गर्दीकडे पाहिलं
अन् मनात विचार आला हेच
ते हैवान ज्यांनी या महामानवांना
जातीपातीत वाटलं,
जाती-धर्माच्या नावावर अन्याय,
अत्याचार, दंगली घडवल्या
त्यांच्याच प्रतिमेचे झेंडे घेऊन
त्यांचे कार्य विचार पायाखाली
तुडवले..!!
लेखक/कवी-सुरज साठे
जन्मभूमी वाटेगाव
9370626619

## आईची माया

बाबा मला म्हणतात
सकाळी उठावे लवकर
नित्यनेमाने करावा
गृहपाठ भराभर

आजी मला म्हणते
पुजेसाठी फुलं आण
बायको मिळेल मग
गोरी गोरी पान

ताई मला म्हणते
आज बुधवार
टी.व्ही. कर सुरू
आता लागतो चित्रहार

आजोबा मला म्हणतात
बिघडली ही पोरं
अभ्यास न करता
खेळण्यात लक्ष सारं

दादा मला म्हणतो
पुरे झाले लाड
गोड गोड खाऊन
झालास कसा जाड

आई मला म्हणते
खातोस का दूधभात
पाठीवरून फिरविते
मायेचा हात

- रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106

## बळ



खोदुन पहा थोडेसेच
खाली असतेच ना पाणी!
धीर सोडूच नको मुळी,
सारीच खोटी नसतात नाणी!
घट्ट मिटूच नयेत आपले ओठ,
गाणी आपल्याच मनात असतात
ना! कित्येक जन्माचे असते,
रिकामेच गळणारे पाणी !
मूठ मिटूनच उगाच कशाला,
म्हणायचे आहे भरलेली!
उघडून ओंजळीत ही,
घ्यावीत मनातलीच तळी!
झराही लागेलच तिथे,
खोद आणखी जरासे !
उमेदीने जगण्यालाच,
बळही थोडेसेच लागते!!
सौ. पल्लवी नाईक पुणे

## बजेट...!

अर्थसंकल्पाचा सादर झाला बजेट,
गरीबांच्या स्वप्नांचा घात केला थेट.
आनंदीत उदयोगपती, आणि शेठ,
गरीबांना महागाईची देतात भेट.

मध्यमवर्गीयांचा यंदा केला विचार,
नोकरदारांना भरावा लागे अमाप कर.
पेट्रोल - डिझेल, गॅसचे वाढवितात दर,
आता,भाजी-भाकरी होई चुलीवर.

महग झाले हिरे - चांदी आणि सोने,
स्वस्त केली मोबाईल- कड धान्ये.
गरीबांना खायाला नाही घरात दाणे,
तरीही, शेअर बाजारात उसळे नाणे.

बजेट दरवर्षी येतात आणि जातात,
त्यात उदयोगांचा फायदा करून देतात.
बजेटचा फुगा जनतेमध्ये उडवितात,
गरीब मात्र उपाशी, श्रीमंत तुपरोटी खातात...!

अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## अवकाळी



हल्ली कधीही येते टिपटिप पावसाची
अवकाळी उग्र होते झिमझिम पावसाची
यावे खुशाल त्याने शेतात उगवणीला
मग सर्वांना आवडते रिमझिम पावसाची
उन्हाळ्यात हिवाळा नि हिवाळी पावसाळा
मना असह्य होते गिचमिड पावसाची
बरसावे रात्रभर वरूनि धो धो उजाडराणी
दिवसा नकोच आम्हां चिकचिक पावसाची
कांदा,तुरी,गव्हाची आली रे पिके सुगीला
नुकसानदायी ठरते रिपरिप पावसाची
बिघडवून टाकले ते वक्र कालचक्र पावसाचे
का झोप मोडता हो निपचित पावसाची

रज्जाक शेख श्रीरामपूर
9665778558

## जन्म पालवीचा

तापल्या उन्हात
जन्म पालवीचा
वेध सावलीचा
उन्हाळ्याला..
कोवळ्या उन्हात
पुलकित फांदी
अंगभर मेंदी
रंगलेली..
वाढत्या उन्हात
खुलणारे रूप
घामेजतो धूप
उकाड्याने..
फूल पाकळ्यांचे
स्वप्न साकारते
विश्व आकारते
मनाचेच..
वाऱ्या-वादळाशी
भिडूनिया थेट
कधी गळाभेट
आत्मानंदी..
उतरता सांज
'पानगळी' वेध
नसे भेदाभेद
वाटेवरी..!
महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि.
सांगली
मो. 9765374805



## राधे -शाम

सुर बांसुरीचे हवेने सोबत वाहुन
आणले राधेच्या मनाला येऊन छेडले
बांसुरीच्या मधुरतेतं बेधुंद भिजून
बहरली राधा प्रेमवेडी होऊन
चाहुल राधेला बांसरी वाजकाची
लागली होऊनी वेडी बावरी ध्वनी
मागे धावू लागली
शोधू लागली सैरावैरा
मधुर ती बासरी
शोधा शोध करुन ठिकाण ते गवसले
राधेला तिथे मग कृष्ण सावळे भेटले
पाहुनी कृष्णाला
राधेच्या मनात प्रेम जागले
वृदांवनात त्या प्रेम जन्मले
जगभरात "राधे-शामचे "प्रेम गाजले
मुरली जेव्हा वाजे कन्हैयाची
प्रेमाने भरुन येई हृदय राधेचे
मुरलीधर जेव्हा मुरली वाजू लागे
वृदांवन सार आनंदात न्हाऊ लागे
दिवानी राधा ही शाम भोवती फिरे
बासुरीतूनं मधुरता आणखी टप टप
गळे
निस्वार्थ मनाने प्रेम राधेने शामवर
केले तीच्या सर्वस्व पणाने कन्हैयाला
समरर्पित केले
कन्हैयाने ही प्रेम राधेचे स्वखुशीने
स्वीकारले राधे -शाम, राधे –शाम
नाव जगभर आज गाजले
- लक्ष्मण वाल्डे, पिशोर



## ती सध्या काय करते



पाहता तो सिनेमा
आज
तिच्याशी पुन्हा
बोलावे वाटते
आठवता ती विचारला
प्रश्न
ती सध्या काय करते

आठवताना तीला
अलवार
गाली मम हास्य
खुलते
उत्तर शोधतोय आजही
ती सध्या काय करते
प्रवास तिच्या
सोबतचा तो
मनासमोर तीच दिसते
बोलायला जाता
स्मरते
ती सध्या काय करते
- © स्वानंद नंदकुमार
मराठे

# ईपीएस ९५ पेन्शनधारकांना न्याय मिळेल ?

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

**भारताची वाटचाल जगातील तिसरी शक्ती म्हणून वर येत आहे आणि सोबतच भारतीय अर्थव्यवस्था बळकट होत आहे ही देशासाठी आणि देशाच्या १३० कोटी जनतेसाठी गौरवास्पद आणि आनंदाची बाब आहे.भारताने अनेक विकास योजना अमलात अणुन जगातील अनेक देशांना धक्का सुध्दा दिला आहे याचे मनापासून स्वागत आहे.परंतु गेल्या अनेक वर्षापासून ईपीएफ -९५ पेंशनधारक कमीत कमी ७५०० रूपये पेंशन व महागाई भत्ता मिळावा याकरिता कडवा संघर्ष करीत आहे.परंतु सरकार व ईपीएफओ यावर कानाडोळा करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते. मागील वर्षी पेंशनचा निर्णय सकारात्मक होण्याची चिन्हे दिसत होती.परंतु यानंतर कामगार मंत्री व सीबीटी यांच्या चर्चेवरून असे निदर्शनास आले की ईपीएस ९५ पेन्शन धारकांचा निर्णय आता वित्त मंत्री निर्मला सितारामन यांच्याकडे असल्याचे सांगितले जावु लागले होते.**

त्यामुळे चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएफ -९५ पेंशन धारकांच्या आशा उंचावल्या आहेत.यामुळे ७६ लाख ईपीएस पेंशन धारकांना वाटले की कोणत्याही परिस्थितीत चालु अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस पेंशन धारकांना वाढीव पेन्शन मिळुन शकते.मागील  अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनेक खासदारांनी पेंशनचा मुद्दा मोठ्या जोमाने उपस्थित केला आणि सकारात्मक सुध्दा होता व यावर काही ना काही अंतीम निर्णय होईल असे वाटत होते.परंतु सरकारकडून ईपीएस ९५ पेंशन धारकांना बद्दल काहीच निर्णय झालेला नाही.परंतु २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात काहीतरी चांगले होईल अशी अपेक्षा आहे.मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये केंद्रीय न्यासी बोर्ड व श्रम मंत्रालय यांनी असे वर्तवीले होते की ९००० रूपयापर्यंत न्युनतम(कमीत कमी)पेन्शन मिळुन शकते.अनेक वर्तमानपत्र व सोशल मिडियाच्या माध्यमातून ईपीएस ९५ पेन्शन धारकांना जी न्युनतम १००० रूपये पेन्शन मिळत आहे ती आता ९००० मिळुन शकते अशा प्रकारची सरकारची तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले होते.न्युनतम पेन्शन ९००० रूपये व महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत श्रम मंत्रालय व केंद्रीय न्यासी बोर्ड यातही चर्चा झाल्याचे सांगण्यात आले होते.

परंतु यावर वित्त मंत्रालयाचा शिक्कामोर्तब लागणे जरूरीचे असल्याचे सांगण्यात आले होते.परंतु मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात पेंशन धारकांच्या प्रती काहीतरी समाधानकारक निर्णय लागेल अशी आशा होती.परंतु ७६ लाख ईपीएस पेंशन धारकांच्या नशीबी  निराशा आली. परंतु ईपीएस पेंशन धारक आशावादी आहे त्यामुळे आताही वाटते की सन्माननीय वित्त मंत्री श्रीमती सितारामन ईपीएस पेंशन धारकांना योग्य न्याय देईल. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांबद्दल सरकारने जर वाढीव पेंशन बद्दल काहीच निर्णय घेतला नाही तर सरकार कडून वाढीव पेन्शन ही बातमी तोंडाला पाणे पुसणारीच म्हणावी लागेल.पेन्शनचा मुद्या १९१३-१४ पासून प्रलंबित आहे.यावर अनेक चर्चा पे चर्चा, तारीख पे तारीख व कमिटी पे कमिटी अशा अनेक प्रकारचे लपंडाव झालेत. परंतु अंतिम निर्णय झालेला नाही.प्रश्न असा आहे की  सरकारच सविस्तर चर्चा करून अंतिम निर्णय पेन्शन धारकांना का देत नाही? अशा गलथापा का मारायच्या, कारण पेन्शन धारक पेन्शन वाढीची आतुरतेने वाट पाहत आहे.त्यामुळे त्यांची थट्टा होणार नाही याची जबाबदारी केंद्रीय न्यासी बोर्ड, श्रम मंत्रालय, वित्त मंत्रालय व सरकार यांनी स्वीकारावी व पेन्शन धारकांना अंतिम निर्णय सरकारच्या माध्यमातून चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात ताबडतोब मार्गी लावावा असे मला वाटते. अधांतरी कोणताही निर्णय देवुन पेन्शन धारकांची चेष्टा किंवा थट्टा  होणार नाही याची जबाबदारी सरकारने स्वीकारावी. मार्च २०२१ ला संसदेच्या स्टॅडींग कमिटीने न्युनतम पेन्शन १००० रूपयांवरून ३००० रूपये पर्यंत करण्याची शिफारस केलेली होती.परंतु तेही सरकारने केले नाही.महत्वाचा मुद्दा म्हणजे पाच राज्यांच्या हायकोर्टने  ईपीएस-९५ पेंशन धारकांना पेन्शनचा मौलिक अधिकार असल्याचे सांगितले होते.त्यामुळेच सरकार २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अंतिम निर्णय घेईल असे वाटत होते परंतु निराशा हाती आली.ईपीएस ९५ पेन्शन धारक अनेक वर्षांपासून जगण्याइतकी पेन्शन मिळावी या मागणीसाठी कसोटीचे प्रयत्न सुरू आहेत.कारण ७६ लाख ईपीएस पेन्शन धारकांना सध्याच्या परिस्थितीत महागाईमुळे भयावह स्थितीचा सामना करावा लागत आहे.आर्थिक परिस्थितीने खचल्याने अनेक पेंशन धारकांचा मृत्यू सुध्दा झालेला आहे.



ईपीएस-९५पेन्शन धारकांना सरकारकडून किंवा राजकीय पुढाऱ्यांकडुन भिक नको तर त्यांच्याच पैशातून सन्मानजनक जगण्या इतकी पेन्शन हवी.२०२२ मध्ये भारत स्वतंत्र होवुन ७५ वर्षाच्या निमित्ताने अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केले आणि आता आपण ७६ व्या वर्षित पदार्पण करीत आहोत.परंतु आजही ७६ लाख  ईपीएस पेन्शन धारक महागाईमुळे अत्यंत दैनाअवस्थेत असल्याचे दिसून येते.परंतु गेल्या अनेक वर्षांपासून देशाचा ७६ लाख  पेन्शन धारक अल्पशा पेन्शनमध्ये जगत आहेत याकडे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी आतापर्यंत दुर्लक्ष केले.शेतकरी जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करतो तर कामगारवर्ग देश घडवीतो.परंतु त्यांच्या नशिबी जगण्या इतकाही पैसा नाही. आज अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक "जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही".कारण महागाई,खाण्या-पिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल,पाण्याचे बिल, गॅस सिलिंडर ११०० रूपये,घरटॅक्स व वयानुसार औषधोपचार इत्यादी १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार?याचा सरकारने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.पेंशनचा मुद्दा ज्वलंत असल्याचे केंद्र सरकारला माहित असुन सुद्धा त्याची दखल घेतली जात नाही हे पेंशन धारकांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.त्यामुळे यावर गा

गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.केंद्र सरकारने आतापर्यंत ७६ लाख ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले.तरीही ६० ते ७५ वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन, निवेदने देऊन वाढीव पेन्शनची आस लावून बसले आहेत. ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात वाढीव पेन्शनची आतुरतेने वाट पाहत असतो आणि आताही २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वाट पाहत आहे.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ चे पेन्शनधारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की "आपलाच पैसा आपणच चोर".त्यामुळे ईपीएस-९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की "जगावे की मरावे"अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे अशा गंभीर समस्या आहेत. शेतकरी देशाचा कना तर कामगार व कर्मचारी हा आधारस्तंभ आहे.केंद्र सरकार,श्रम मंत्रालय व वित्तमंत्री  श्रीमती निर्मला सितारामन यांना नम्र विनंती करतो की ईपीएस -९५ पेंशन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेंशन व महागाई भत्ता देवुन त्याची आर्थिक अडचण दुर करावी.कारण महागाईमुळे गरीब व सर्वसामान्यांच्या प्रती संपूर्ण भारतात वनवा लागला आहे. ही आग फक्त सरकारच विझवू शकते.कारण १००० ते ३००० रूपये पेंशन घेऊन ईपीएस- ९५ पेंशन धारक मरतो आहे याकडे सरकारने जातीने लक्ष देण्याची नितांत गरज आहे.असे सांगितले जात आहे की सप्टेंबर २०१४ पुर्वी सेवानिवृत्त झालेल्यांना वाढीव पेंशन करीता ऑप्शन फॉर्म भरण्याची सुचना  ईपीएफओ दिल्याचे सांगितले जात आहे अशी चर्चा आहे हा भाग नंतरचा आहे.परंतु ७६ लाख पेंशन धारकांचा जीवन-मरणाचा प्रश्न पहाता सरकारने कमीत कमी ७५०० रूपये पेंशन व महागाई भत्ता ताबडतोब चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर करावा.देशाच्या अनेक राज्यांत शिक्षकांच्या जुन्या पेन्शनचा मुद्दा गाजत आहे आणि याचा परिणाम आपल्याला विधानपरिषद निवडणुकांमध्ये दिसून आला.त्यामुळे मी लेखाच्या माध्यमातून आशा करतो की ७६ लाख ईपीएस पेंशन धारकांना सुरू असलेल्या २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात योग्य आणि अंतिम निर्णय घेवून ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या समस्येवर पडदा टाकाल ही विनंती.

# गावचा विकास देशाचा विकास



आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्यात नुकत्याच ग्रामपंचायत निवडणुका संपन्न झाल्या असून यात भाजप शिवसेना महाविकास आघाडी अनेकांनी ग्रामपंचायत वर आपला दावा असल्याचा आपले वर्चस्व असल्याचे सांगितले. आता राजकारण बाजूला ठेवून जर समाजकारण करण्याचा संकल्प नवीन ग्रामपंचायत सरपंच सदस्यांनी केला तर नक्कीच गावचा आर्थिक विकास साधता येईल. आपल्या देशातील जास्तीची लोकसंख्या ही ग्रामीण भागात आहे. त्यामुळे गावची अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी व गावचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायत ने सहकार्य करणे गरजेचे आहे.कारण कोरोना असताना देशाची अर्थव्यवस्था ही खेड्यांनी सांभाळली असून आता त्याच गावच्या अर्थव्यवस्थेला बळकट करण्याचे काम ग्रामपंचायत सरपंच सदस्यांनी एकत्र येत करायला हवे. गावाची अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर आपापल्या गावात सरकारी योजनेचा पाठपुरावा करून त्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून गाव विकासासाठी नवीन उपक्रम हाती घेऊन गावाच्या विकासास गती प्राप्त करून देता येईल. यासाठी ग्रामपंचायत सरपंच, सदस्य यांनी राजकारण दूर ठेऊन समाजकारण करत गावाचा विकास करावा. पण बऱ्याच ठिकाणी निवडणुकात खर्च झालेला असतो आणि तो काढण्यासाठी भ्रष्टाचार होताना दिसून येतो.अश्या भ्रष्टाचारावर जर नियंत्रण ठेवायचे असेल तर गाव विकासासाठी गावासाठी गावाच्या ठिकाणी एक समिती स्थापन करणे गरजेचे आहे व गावातील नागरिकांना विश्वासात घेऊन सर्वतोपरी विकास करणे गरजेचे आहे. पण आम्ही वेगळच करत बसतो ह्याला गाड नाहीतर त्याला गाड अशी गत होऊन जाते.

याच बरोबर ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व नेमलेली ग्राम समिती यांच्या मार्फत प्रत्येक महिना अखेर विकासकार्याचा व केलेल्या कामाचा फलक लावून सुद्धा विकास कामानां गती देता येईल. यासाठी प्रशासकीय अधिकारी यांनी गावातच थांबून गावच्या विकासास चालना देण्यासाठी प्रयत्न करणे व मार्गदर्शन करणे गरजेचे असून यासाठी योजनेची माहिती असलेल्या नागरिकांनी पुढे येत गावचा विकास करण्यासाठी गावाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी हेवे दावे बाजूला सारत पुढे यायला हवे.कारण माझ्या गावचा विकास हा माझा विकास असून परिणामी देशाचा विकास आहे हे विसरता कामा नये. चला मग एकत्र येत गावचा विकास करूया.

**राहुल अशोक त्रिभुवन**
**वैजापूर औरंगाबाद**

# माझे आबा आज्जी : छान छान कविता !

आधुनिक केसरी

**अरुण देशपांडे हे बाल साहित्यातील एक ठळक आणि सर्वदूर परिचित असलेले नाव! बाल साहित्यातील त्यांची कामगिरी लक्षणीय आहे.  नुकताच त्यांचा 'माझे आबा- आज्जी' हा बालकविता संग्रह प्रकाशित झाला आहे. बालकांना आवडेल, भुरळ घालेल अशा देखण्या स्वरूपात सप्तर्षी प्रकाशन, मंगळवेढा यांनी बाल वाचकांच्या भेटीला आणला आहे. २६ कविता असलेल्या संग्रहात आई, आबा, आजी यासह देश, तिरंगा, स्वातंत्र्यदिन, विविध सण, शेतकरी, पुस्तक, निसर्ग, कोरोना आणि आजोळ अशा बालकांच्या आवडीच्या विषयावर खूप छान लिहिले आहे.**

आई या कवितेत आईची महती स्पष्ट करताना कवी लिहितात,

***मनाच्या गाभाऱ्यात आहे***
***हृदय मंदिर हे गाव***
***वात्सल्याची मूर्ती त्यात***
***आई आहे तिचे नाव***

किती समर्पक शब्दांत आईबद्दल लिहिले आहे. मुल कितीही मोठं झालं तरी आईबद्दल मुलाच्या मनात एक वेगळेच स्थान असते.

विभक्त कुटुंब, वृद्धाश्रम अशा व्यवस्था स्वीकारण्याकडे कल असला तरीही कुटुंबात आजोबा आज्जीचे महत्त्व, गरज नक्कीच असते. त्यातही मुलांचे आईवडील दोघेही नोकरीला असले म्हणजे ही गरज अधिक जाणवते. नातवंडे ही आबा-आज्जीसोबत खूप रमतात. आबा- आज्जीसोबत बागेत जाणं हे ठरलेलेच. बागेतील धमाल वर्णन कविच्या शब्दात,

***माझे आबा -आज्जी***
***रोज बागेत येतात***
***दोघे माझ्या मित्रांशी***
***छान गप्पा करतात***

आज समाजात बंधूभाव ही भावना फारशी दिसत नाही. तो मुलांना समजावून सांगण्यासाठी 'भारत माता की जय' या कवितेतून कवी छान संदेश देतात,

***मी भारतीय आहे भावना***
***मना मनात सारे जागवू या***
***घेउनी तिरंगा हातात आज***
***भारतमाता की जय म्हणू या***

बालकांना महाराष्ट्राविषयी अधिक माहिती मिळावी म्हणून कवीने लिहिलेल्या 'महाराष्ट्र माझा' या कवितेतील काही ओळी...

***गड-किल्ले, भवती***
***सह्याद्रीचे सोबती***
***संत-महात्म्याचा***
***महाराष्ट्र माझा***

संक्रांत, दसरा, दिवाळी हे सण म्हणजे बाळगोपाळांसाठी आनंदाची पर्वणी! खाणे-पिणे, खेळणे, मज्जा करणे यासाठी मुलं या सणांची वाट पाहतात. म्हणून कवी लिहितात,

***हसत खेळत राहू***
***आनंद मानत राहू***
***दुःख विसरू चला***
***गोड गोड हो बोला***

शेतकरी! अन्नदाता, पोशिंदा म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्यांचे महत्त्व लक्षात यावे म्हणून 'बळीराजा' या कवितेत कवीराज व्यक्त होतात,

***झाडतो लढतो***
***अस्मानी संकटाशी***
***दुष्काळा हरवतो***
***हिंमतबाज बळीराजा***

सध्या लहानथोर अगदी आबा-आज्जीसह सारेच भ्रमणध्वनीच्या मोहजालात अडकले असल्याचे आपण पाहतो. बालकांना या चक्रव्यूहातून बाहेर काढायचे असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही म्हणून कवी देशपांडे 'वाचू या पुस्तकं..' ही रचना सादर करतात,

मोबाईल मधले
सही
वाचा तर तुम्ही
पुस्तके
चॅटिंग करण्यापेक्षा हे
हे तर नक्की खूप
बरे...!

'निसर्ग आणि माणसे' ही कविता ही अत्यंत महत्त्वाची आहे कारण निसर्गाचा ऱ्हास थांबवायचा असेल तर मानवाने निसर्गाची हानी थांबवले पाहिजे ही गरज ओळखून कवी बालकांना साद घालतात,

***कसे होईल हो सांगा***
***या निसर्गाचे रक्षण***
***थांबणार ना जोवरी***
***या निसर्गाचे भक्षण***




आजकाल बागेची आवश्यकता आहे, गरज आहे हे ओळखून ठिकठिकाणी बागेची निर्मिती होते आहे पण बागेचे व्यवस्थापन, संरक्षण हे मोठे आव्हान उभे राहते आहे. बागांची दुरावस्था पाहून कवी पोटतिडकीने 'बाग सारी रूसून बसली' ही कविता सादर करतात,

झोका म्हणाला- परी बघ
जरा
कशी झाली हालात माझी
साखळ्या तुटल्या किती
साऱ्या
नवीन बसवा आता साऱ्या

कोरोना! सारे व्यवहार ठप्प! आबालवृद्ध घरात बंद! वडील घरी असले तरी घरून काम करण्यात व्यग्र, कामासाठी बायका येत नसत ही परिस्थिती जाणून एक बालक त्याच्या बाबांना 'कोरोना' या कवितेतून साद घालतो,

***थोडं तरी करा मॅनेज***
***एकटी करते सारं***
***आई नाही येत आता बाई***
***थकून जाते किती आई***

***आजोळ!*** नातवंडांसाठी आनंददायी, धम्माल मस्ती करण्याचे असे ठिकाण! लाड करणारे आजी-आबा, सोबत धिंगाणा करणारे मावशी- मामा आणि समवयस्क असे भावंडे! 'माझे आजोळ' ही कविता याच आशयाची आहे. कवी अरुण देशपांडे हे आजोळच्या मायेचा झरा दाखवताना म्हणतात,

***आजोळी खरा अखंड आहे***
***आजी- आबांच्या मायेचा झरा***

कवी अरुण देशपांडे यांना बाल मानसशास्त्राची चांगली जाण आहे हे या संग्रहातील काव्यरचना वाचताना लक्षात येते. बालकांना समजतील, आवडतील अशा सोप्या शब्दांच्या रचना त्यांनी सादर केलेल्या आहेत. कुठेही विनाकारण उपमांचा भडिमार नाही. वाचनीय, मार्गदर्शक, ज्ञान वर्धक अशा कविता असल्याने बालकांसह सर्वांना आवडतील अशा आहेत.

मित्रवर्य अरुण देशपांडे यांचे मनापासून अभिनंदन! आगामी साहित्य निर्मितीसाठी शुभेच्छा!

माझे आबा आज्जीः बालकविता
**संग्रह कवीः अरुण देशपांडे**
**प्रकाशकः सप्तर्षी प्रकाशन**
**मंगळवेढा पृष्ठ संख्याः ३८**
**किंमतः ६०/-**
**आस्वादकः नागेश शेवाळकर पुणे**
**(९४२३१३९०७१)**

# खोटा वारसदार शोधण्यात धन्यता



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**इतरांवर खापर फोडुन स्वतः ला दोष मुक्त समजणं आणि आपण अगदी योग्य बरोबर आहेत.अस समजणं हे थोड्या काळासाठी आपल्याला समाधान देऊ शकत त्या मधुन दिशादर्शक प्रेरणादायी प्रगती आपण साधु शकत नाहीत. आपलं जीवन हे आपलं आहे आपल्या जीवनाशी संबंधित कोणताही निर्णय घेताना आपला विवेक हा जागृत असलाच पाहिजे. यदाकदाचित जर निर्णय चुकला फसला तर वेळीच सावरता देखील आलं पाहिजे.सत्य स्वीकारणं आणि स्वतःला बदलणं सृष्टी वरील सर्वतम घटना आहे. अगदी प्रमाणिक आणि सत्यनिष्ठ बाब हिच आहे. आपल्या जीवनातील कोणत्याही अडचणींना दुखांना घडामोडींना आपण स्वतः व्यक्तिशः जबाबदार असतो .पण हि जबाबदारी स्वीकारण्याच धारीषठ्य आपल्या मध्ये निर्माण होईल एवढी उंची कदचित आपली नसते . म्हणून आपण त्याला खोटा खोटा वारसदार शोधतो आणि आपल मन हलकं करतो.**

आपल्या चुकीला इतर कोणतरी जबाबदार आहे असं समजुन आपल्या चुकीचा खोटा वारसदार शोधल्या शिवाय आपल्याला बरं वाटतं नाही हा मानवी स्वभाव आहे .पण वास्तवात हे सत्य आहे का तर नक्कीच नाही.आपल्या चुकांना इतर कोणीही हे कधीच जबाबदार नसतं याला ज्ञान म्हणतात फार फार हे ज्ञान आपल्याला योग्य वेळी उमजत नाही म्हणून आपलं कही चुकलं अथवा आपण कमी पडलो आहेत हि भावना आपल्या मध्ये निर्माण होत नाही ते शोधण्याचा अथवा सत्य शोधण्याचा प्रयत्न आपण करतही नाही. जीवन मार्गावर अनेक घटना घडामोडी घडत असतात कधी लाभ होतो तर कधी नुकसान लाभ आहे तो पर्यंत चिंतन मंथन काहिच नसतं . सदरील घटनेने जर आपलं नुकसान झालं तर प्रमाणिक पणे आपण आपली चुक कबुल करून त्या मध्ये सुधारणा करण्याची मानसिक तयारी करणं गरजेचं असतं पण आपण असं करत नाही. इथंच आपण फसतो.आपल्या मध्ये सुधारणा करून पुढे जाण्यासाठी समक्ष होण्या ऐवजी आपण खोटा वारसदार शोधुन दुबळे होतो. मानवी जीवन तसं पहिल तर अनंत घडामोडींनी भरलेलं असतं घडामोडी संपतील ते जीवन कसलं पण या सगळ्या घडामोडींमुळे अनेक आपण दुःखी खिन्न, उद्विग्न झालेले असतो. कारण अगदी सोपं असतं घटना घडामोडी ह्या आपल्या मनाविरुद्ध घडलेलेल्या असतात. ते आपल्याला पचवता येत नाही मनात साठवता येत नाही अशा वेळी आपण एखाद्या त्रयस्थ शोधून मोकळं होण्याचा प्रयत्न करतो . आपल्या मनात प्रचंड खुप काही साठलेल असतं आणि साठलेलं बाहेर पडलच पाहिजे.पण काय साठवायच काय साठवायचे नाही हे मात्र आपल्याला समजलं उमजलं पाहिजे.दैनंदिन आपल्या जीवनात कोणतीही घटना घडमोड अथवा सुख दुःखाचे क्षण निर्माण होण्यासाठी आपण स्वतः सोडता इतर कोणीही जबाबदार नसतं हे वास्तव आहे.पण जबाबदारी इतरांवर ढकलली अथवा इतरांवर दोष टाकला तर अंहकार स्थिर होतो आणि थोडं बरं वाटतं पण हे खोटं खोटं बरं असतं. आयुष्य आपलं आहे आपण कसं जगावं हे आपल्यावर अवलंबून असतं आणि आपण निर्णय घेताना अनेकदा चुकतो. चुकल्यावर त्याचे परिणाम पण तसेच येतात आणि हेच परिणाम आपल्याला नको असतात.पण तसं होत नाही परिणामांना सामोरे तर जावेच लागते परिणामांना सामोरे जात असताना आपल्याकडं उपलब्ध ज्ञान आपल्याला पुन्हा उभा करत कि संपवत म्हणजे एकंदरीत आपण कोणत्या ज्ञानावर विचारावर तत्वज्ञान वर उभा आहेत हे खुप महत्वाच आहे. मुळात सुधारणा ही महत्वाची असते. सुधारणा झाली पाहिजे मग ती कशीही असेल. पण आपण सुधारणा करण्या ऐवजी जखमे सोबत खेळत बसतो. त्यामधून मग फार काही उल्लेखनीय चांगलं निष्पन्न होत नाही म म्हणून आपल्या चुकीचा वारसदार शोधण्याच्या भानगडीत पडण्यापेक्षा स्वतःला सुधारा आपलं आयुष्य सार्थकी लावा.



# जय जय महाराष्ट्र माझा... गर्जा महाराष्ट्र माझा...



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**कविवर्य राजा निळकंठ बढे यांच्या जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या गीतामधील दोन चरणांचे गीत महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून स्वीकारण्याच्या निर्णय राज्य सरकारने नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे. हे गीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून १९ फेब्रुवारी २०२३ पासून अंगिकरण्यात येणार आहे.**

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत राज्य गीत म्हणून स्वीकारण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून संपूर्ण राज्यातून या निर्णयाचे स्वागत होत आहे. महाराष्ट्राला स्वतःचे राज्यगीत असावे ही खूप वर्षापासूनची मागणी होती. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून राज्याला राज्यगीत असावे ही मागणी अनेक दिग्गजांनी केली होती उशिरा का होईना ही मागणी मान्य झाल्याने राजभरात आनंदोत्सव साजरा होत आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात राज्याला राज्यगीत मिळाले हा अजब योगायोग म्हणावा लागेल त्यासाठी राज्य सरकारचे आभारच मानावे लागेल. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत म्हणून जाहीर कारण्यासंबंधीचा अध्यादेश राज्य सरकारने काढला आहे त्यासोबतच राज्यगीताच्या औचित्य पालनासंदर्भात काही मागदर्शक सूचनाही राज्य सरकारने जारी केल्या आहेत. शासनाच्या सर्व सार्वजनिक कार्यक्रमाच्या सुरवातीला राज्यगीताचे वादन, गायन हे ध्वनिमुद्रित आवृत्ती सोबत अथवा स्वतंत्रपणे करण्यात यावे. १ मे महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीतानंतर राज्यगीत वाजवले अथवा गायले जाईल. राज्यातील सर्व शाळा महाविद्यालयात दैनिक सत्र सुरू होण्यापूर्वी परिपाठात राज्यगीत वाजवले किंवा गायले जाईल. तसेच सर्व सामाजिक, राजकीय, संसज, क्रिडाविषयक कार्यक्रमाच्या सुरवातीस राज्यगीत वाजवले किंवा गायले



जाईल. राज्यगीताला राष्ट्रगीताचा मान देण्यात आला असल्याने राज्यगीत सुरू असताना सर्वांनी सावधान स्थितीत उभे राहून त्याचा सन्मान करावा. राष्ट्रगीताबाबत जे तारतम्य बाळगले जाते तेच तारतम्य राज्यगीताबाबतही बाळगण्यात यावे अशा मार्गदर्शक सूचना राज्य सरकारने जारी केल्या आहेत.

हे गीत वाजवताना किंवा गाताना त्याचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी सर्वांना घ्यावी लागणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षात राज्य शालेय मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्येही राज्यगीताचा समावेश होणार आहे. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या गीताला राज्य गीताचा दर्जा देण्यासंदर्भात अधिकृत अधिसूचना निघाली असल्याने आता हे अजरामर गीत खऱ्या अर्थाने राज्यभर गर्जनार आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. गेल्या ६३ वर्षात महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात प्रगती केली. आज महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत राज्य मानले जाते. दिल्लीचेही तख्त राखणारा महाराष्ट्र आज सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. संतांची आणि वीरांची पुण्यभूमी असलेला महाराष्ट्र देशाच्या रक्षणासाठी सर्वात पुढे असतो. जेंव्हा जेंव्हा हिमालय संकटात येतो तेंव्हा तेंव्हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून जातो असे वर्णन या गीतामधून केला आहे. त्याच गीताला आज राज्यगीताचा दर्जा मिळाल्याचा अभिमान राज्यातील तमाम जनतेला आहे.

# सुगीचे दिवस...!

आधुनिक केसरी

**सुगी तोंडावर आलेली होती. तांबडा - पिवळा सूर्य भाकरवाडीच्या ससोबाच्या टेकडीआडून वर आला. पातळ पिवळा प्रकाश ओतीत वर - वर सरकू लागला. थंडीने गारठून बसलेली रानपाखरे त्या उबेने सरसावले आणि हुरड्यात आलेले डबकं हेरून मेळाव्याने उतरू लागले. त्यांना हाकारता - हाकारता रामू अगदी जेरीला आला.गोफणीच्या फटकाऱ्या बरोबर ठिसूळ दगडांचे गोटे डांबक्यात सोडू लागला. तो सारा आवाज गावातल्या बाया-बापड्यांच्या कानावर टिपकू लागे. रानचिमण्या सूर मारीत होत्या. खाली पीक हुरड्यात आले होते. शेताशेतातून आगट्या पेटल्या होत्या. हुरडा खाण्याची एकच धमाल उडालेली होती. इतरही पाखरे ज्वारीच्या पिकांवर घिरट्या घालीत होती. शिवारभर फिरत असलेला वारा पिकांच्या गंधात न्हाऊन निघालेला होता. या शिवारात एक वेगळेच लावण्य आलेले होते.**

भाकरवाडीतल्या पाटलांच्या शेताच्या पट्ट्यात ज्वारी वाऱ्याच्या झोतावर खळखळून हसू लागे. ज्वारीचे हिरवट धांडे हलत. लांबशा धारदार पानांची लाडिक सळसळ शिवारभर चालू होती. ज्वारीची भरीव कणसे जाडशा शुभ्र दाण्यांनी लगडून आलेली. हिरव्याशा पिकांच्या माध्यमातून शिवारभर समृद्धीने हसत. रामूने अधामधात दाट पिकांतून भदाड्या मडक्याच्या तोंडाची भीतीयुक्त बुजगावणी पाखरांना हुसकावून लावण्या - साठी तयार केलेली होती. बुजगावणी डोळ्यांत तेल घालून ज्वारीच्या शेताची राखण करे. पण पाखरे भलतीच धीट व शहाणी त्यांना न भिता अगदी बुजगावणीच्या अंगाखांद्यावर विसावत. अधूनमधून ज्वारीच्या पिकावर हल्लाबोल करीत. रामूने आणि सुमनने तीन पोत्यांच्या धान्याच्या मोबदल्यात भाकरवाडीच्या पाटलांचे संपूर्ण ज्वारीचे शेत तयार करून धान्य पाटलांच्या घरी पोहचावीत.या अटीवर ज्वारीचे शेततयार करण्यास घेतले होते.

संध्याकाळी सांजावत असताना रामू पाटलांच्या शेतात मुक्कामी थांबला. सोबत मोती कुत्रा व गोफण आणि थंडीपासून बचाव करण्यास अंगावर एखादी शाल असायची. आंब्याकडेच्या शेतात वाणीचे एक ताट डोलते. रामूला वाणीच्या लज्जतदार हुरड्याची चव चाखण्याची संधी मिळते. धारदार विळ्याने रामू अंधार दाटायच्या अगोदर वाणीचे चार-पाच दळदार नारळासारखी कणसे खुडून आणतो, आणि हिरव्यागार भरलेल्या दाण्याचा दुधाळ सुगंध त्याच्या नाकाला आवडतो. आंब्याच्या झाडाखाली जमा केलेले वाळलेले गवत - गौऱ्या नि काड्यांच्या ढिगात ठिणगी पडली की,आगटीवर रामू कणसे भाजू लागला. दरम्यान दाट अंधार सभोवती दाटून आलेला असे. रात





किड्यांची लयबद्ध किर्र किर्र सुरू झालेली होती. आंब्याच्या दाटशा झाडात विसावलेली रानपाखरे अधूनमधून फडफडत होती. भाजल्या जाणाऱ्या कणसांतून मोठा गोडसा सुगंध शेतात दरवळू लागे. सोबतच्या शालीवर कणसांना लगडून रामू हातात घेऊन तोंडाच्या फुकीवर हुरडा स्वच्छ करे आणि हळूहळू ओंजळ- ओंजळ भाजलेल्या दाण्याचा हुरडा तयार झालेला तोंडात घाली. त्या हुरड्याला एक लज्जतदार चवीची त्याला जाणीव होई.

हुरड्याची चव घेतल्यावर रामू ज्वारीच्या राखणीसाठी लाकडाने तयार केलेल्या माच्यावर जाई.दाट अंधार पडल्यावर मोती कुत्रा ज्वारीच्या पिकांकडे पाहून भुंकू लागे.तेवढयात ज्वारीची धांडे जोराजोराने हळू लागे. कारण रानगव्यांचा दमदार कळप ज्वारीच्या शेतात शिरलेला होता. त्यामुळे रामू चकीत होऊन घाबरला. पण माचीच्या खाली उतरण्याची त्याची हिंमत होत नाही. शेजारच्या शेतातूनही राखण करणारे गडी ओरडू लागले, " रामू रानगवे तुझ्या ज्वारीच्या शेतात शिरले रे, माचीवर किंवा झाडावर जाऊन जीव वाचव." ऐन वेळी सारा शिवार जागलेला होता. बऱ्याचशा धांड्यांचा फडशा पाडून रानगव्यांचा कळप पाणी पिण्यासाठी नदीकडेच्या दिशेने निघून गेला. नंतर कुठल्यातरी प्रहर रामूचा डोळा लागतो. हुरड्यात आलेली कणसे वाळून पिवळी पडतात. चांगली उमललेली करडीची काटेरी फुले. काळी माती आणि वाढलेली हराळी यांचा वास बरोबर घेऊन गार वारा वाहतो. शेतातल्या पोपटी तुरीच्या झाडांना शेंगांच्या लडी लदबदून आलेल्या होत्या. नाजूकशा टंच भरलेल्या तुरीच्या शेंगा शोभून दिसत होते.

अवघे शेती-शिवाऱ्याच्या डोळ्यांत सुगीचे हे देखणे नि समृद्धीचे चित्र साऱ्या रानोमाळात तरळू लागलेले असायचे. हुरड्यांचा सुगंध कितीतरी दिवस नाकात दरवळू लागे. सुगीच्या हंगामात शेती - शिवाराचा असा अनोखा लळा लागायचा की, रामुचे पाय असे अधूनमधून रानभरी होत असून सुगीचे दिवस केव्हा संपत हे सुद्धा कळत नसे...!

**- अय्युब पठाण लोहगांवकर.**
**ता. पैठण. मो. ९७६४३५०३७४.**

# ज्येष्ठ नागरिक संघ, रुग्ण सेवा केंद्राचा वर्धापन दिन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळच्या रुग्णसेवा केंद्राचा सहावा वर्धापन दिन ज्येष्ठ नागरिक भवन मध्ये गुरुवार दिनांक 2 फेब्रुवारी 2023 रोजी जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर उपेंद्र किंजवडेकर , बालरोग तज्ञ उपस्थित होते . विशेष अतिथी म्हणून डॉक्टर नितीन देशपांडे, नेत्रतज्ञ रामकृष्ण नेत्रालय तसेच प्रमुख वक्ते म्हणून डॉक्टर ओंकार माटे मानसोपचार तज्ञ लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री अरविंद वाळवेकर, अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळ यांनी भूषविले. प्रथम दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि रमेश गायकवाड यांनी सुश्राव्य असं प्रार्थना गीत गायलं . रुग्णसेवा केंद्राचे अध्यक्ष श्रीयुत रणजित दीक्षित यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात ज्येष्ठ नागरिकांना विविध वैद्यकीय उपकरण विनामूल्य दिली जातात व रुग्ण सेवा केंद्राने केलेल्या कार्याचा संपूर्ण समर्पक असा आढावा घेतला.उपस्थित मान्यवरांचा शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला . या कार्यक्रमात अनेक मान्यवर तसेच डॉक्टर देणगीदार सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते त्यामध्ये डॉक्टर अशोक पाटील, डॉक्टर अवधूत साठे, डॉक्टर श्रीनिवासन, श्रीयुत वाघमारे, श्री हनीफ, श्री प्रशांत भोर , अनुराधा करपे, उषा तलवार, प्रकाश राणे, दीपक दिघे ,प्रभाकर गुमास्ते, प्रकाश लखापते , श्री गिरीश बर्वे , श्रीमती रेखा वाळवेकर, श्रीमती स्वाती फडके , श्री गणेश करमरकर, श्रीमती सुलभा प्रधान इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त प्रमुख पाहुणे डॉक्टर उपेंद्र किंजवडेकर यांनी रुग्णसेवेच्या कार्याचा त्यांनी मनापासून गौरव केला आणि श्रोत्यांशी संवाद साधत आफ्रिकेतील रवांडा येथील परिस्थिती विशद केली. विशेष अतिथी डॉक्टर नितीन देशपांडे यांनी "नेत्र बँक" नवी मुंबई मध्ये लवकरच सुरू करणार असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी डॉक्टर ओंकार माटे, मानसोपचार तज्ञ यांनी "टाईम बँक" ची संकल्पना मांडली व हा त्यांचा ड्रीम प्रोजेक्ट



असल्याचे देखील त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे सध्याच्या बदलत्या परिस्थितीनुसार व बऱ्याच ज्येष्ठांची मुले परदेशात किंवा जवळ नसल्याने ज्येष्ठांच्या मध्ये प्रचंड नैराश्य, एकटेपणामुळे आलेले आहे, त्यामुळे त्यांच्या स्वभावात उदासीनता, असुरक्षितता जाणवते, आशावाद हरपल्यासारखा वाटतो व नैराश्याने ग्रासलेले आहेत. त्यामुळे माझा आता जगून काय उपयोग अशी निर्वानाची वृत्ती त्यांची झाली आहे .नवी मुंबई हे रचनाबद्ध शहर असल्यामुळे जुन्या मुंबईतून अनेक लोक या ठिकाणी स्थलांतरित झालेले आहेत परंतु इथल्या फ्लॅट संस्कृतिच्या मुळे "अर्बन आयसोलेशन" त्यांना जाणवतो. ह्या वयात कोणाशी बोलावं आणि आता ओळखी कशा वाढवाव्यात असा प्रश्न त्यांना पडतो. त्यामुळे संवाद खुंटल्यासारखा होतो . अशावेळी डॉक्टर माटे म्हणाले की, त्यांचा "अर्बन आईसोलेशन" घालवण्यासाठी आम्ही त्यांना ज्येष्ठ नागरिक संघामध्ये सामील व्हा, त्यातील कार्यक्रमात रस घ्या असे सुचवतो. त्याचप्रमाणे जेष्ठांना सल्ला देण्याची फार आवड असते परंतु जेष्ठांनी केवळ सल्ला दान स्वरूपात द्यावा तो सल्ला अमलात आणला की नाही याचा अट्टाहास करू नये.कारण जनरेशन गॅप मुळे आताची पिढी सल्ला मानेलच असे नाही. शक्यतो विशीच्या नंतरचा आत्ताचा आधुनिक तरुण सल्ला मनावर घेतच नाही असे दिसून येते. ज्येष्ठांनी आपण आपल्या जीवनात केलेल्या चुका सांगाव्यात त्यामुळे मनाचा भावनिक निचरा होतो आणि तरुणांना देखील त्या अनुभवाचा फायदा होऊ शकतो. श्रीयुत अरविंद वाळवेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रुग्णसेवा केंद्राच्या कार्याचा गौरव केला त्यामध्ये नंदलाल बॅनर्जी व रुग्णसेवेचे अध्यक्ष रणजीत दीक्षित यांच्या कार्याची प्रशंसा केली. अवयव दानाच्या संदर्भात श्री जनार्दन यांनी त्यांच्या पत्नीच्या मृत्यू पश्चात चार प्रकारचे अवयव दान करून सामाजिक बांधिलकी जपली. एका मातेने आपल्या मुलास किडनी दान करून आईच्या प्रेमाचा साक्षात्कार घडवला हा अनुभव प्रत्यक्ष त्या मुलाने कथन केला. त्या संदर्भात बोलताना श्री अरविंद वाळवेकर म्हणाले आई म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचे स्वरूप असते याची प्रचिती मिळाली. श्री प्रशांत भोर यांनी 49 वेळा प्लाजमा दान केला तसेच अठरा वेळा रक्तदान केले.



## किशोर शितोळे यांची भाजपा महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तापदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी औरंगाबाद करिता किशोर शितोळे यांची महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्य अशी निवड केली आहे.

शांत, संयमी अभ्यासपूर्ण मांडणी हे किशोर शितोळे यांचे वैशिष्ट्य आहे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे विश्वासू म्हणून ते ओळखले जातात. टीव्ही वरील अनेक चर्चा मध्ये त्यांनी मुद्देसूद मांडणी करून, विरोधकांना निरुत्तर केले आहे. आजवर त्यांनी भूषविलेली पदे - भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य, भाजपा- TV PANELIST, अध्यक्ष-देवगिरी ना सह बँक. मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अध्यक्ष- NGO "जलदूत" अशी आहेत. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतूक होत आहे. मी ही जबाबदारी पक्षहितासाठी अभ्यासपूर्ण आणि समयोचित मांडणीने यशस्वीपणे पार पाडेन याची ग्वाही देतो असे त्यांनी आधुनिक केसरीच्या प्रतिनीधीशी बोलताना सांगीतले.

## मैत्री कट्टा कवी मनाचा आयोजित राज्यस्तरीय कविसंमेलन थाटात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मैत्री कट्टा कवी मनाचा साहित्य समूह नागपूर आयोजित राज्यस्तरीय ०१ले कविसंमेलन दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी यशोमंगल सभागृह उस्मानपुरा ,औरंगाबाद येथे मैत्री कट्टा कवी मनाचा समूहाच्या स्पंदन चारोळी संग्रहाचा लोकार्पण सोहळा व पुरस्कार वितरण सोहळा पार पडला यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ.हबीब भंडारे तर उद्घाटक म्हणून अनिल साखरे सह अशोक टेंभूर्णीकर ,
तर प्रमुख अतिथी म्हणून जे. के. राऊत , सचिन वालतुरे सह प्रमुख अतिथी शोभाताई वेले,आशा ब्राम्हणे, समूह संस्थापिका अल्का धोंडणे-साखरे,समूह संस्थापक अनिल पाटील,समूह संचालिका कल्पना टेंभुर्णीकर,संचालक प्रा.नानाजी रामटेके,भाष्यकार संतोष मेश्राम, आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. दुसऱ्या सत्रात कवि संमेलन घेण्यात आले. त्यात अध्यक्षस्थानी डॉ. यमुना नाखले, नागोराव सोनकुसरे प्रमोद पाताडे सह आदीची उपस्थिती होती. याप्रसंगी जगदीश चव्हाण,संतोष चंदगीर, अनिल पाटील, स्मिता गायकवाड, अनिल गायकवाड चंद्रकांत तायडे, प्रभाकर खिल्लारे,उत्तमराव म्हस्के, डॉ. मधुकर दिवेकर,प्रभाकर दुर्गे, ज्योती अहिरे, आशाताई ब्राम्हणे, नखले, शोभाताई वेले, मंगल वाघमारे, वैशाली खंडारे, सुनंदाताई आंभोरे, जयश्री ताई ढाकरगे, अशोक वासाटे, कविता गेडाम, डॉ. भणगे शैलेंद्र, ग्रीष्मा पाताडे,नागोराव सोनकुसरे, प्रा. नानाजी रामटेके, संतोष मेश्राम, सुयश वाघमारे, पुंजाजी ढोले आदींनी आपले काव्य सादर केले. यावेळी दोन्ही सत्राचे सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले तर प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय समूह संस्थापिका अल्का साखरे - धोंडणे यांनी तर पहिल्या सत्राचे आभार प्रदर्शन कल्पना टेंभुर्णीकर तर दुसऱ्या सत्राचे प्रा.नानाजी रामटेके यांनी केले.




## पाच वर्षांपासून फरार भामटा अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** उत्तम परताव्याचे आमिष दाखवंत शहरातील ७० ते ७५नागरिकांची २कोटी२२लाखांची फसवणूक करणाऱ्या भामट्याला आर्थिक गुन्हेशाखेने बंगळूरुहून कर्नाटक पोलिसांच्या मदतीने अटक करुन आणले. त्याच्या विरोधात एमपीआयडी (महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इंट्रेस ऑफ डिपॉझिटर) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. कोर्टाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. मोहम्मद अनिस आयमन



रा.बंगळूरु असे अटक आरोपीचे नाव आहे. २०१९ मधे या प्रकरणी सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. रिदास इंडीया, असे या भामट्याच्या कंपनीचे नाव आहे. शहरातील नागरिकांकडून कोट्यावधी रु जमाकेल्यानंतर आरोपीने शहर परिसरातील सिध्दनाथ वडगाव येथे ६०एकर जमीन खरेदी केल्याचे पोलिस तपासात उघंड झाले. या प्रकरणात सादातनगरातील मोहम्मद रफी मोहम्मद ताहेर शेख हे फिर्यादी आहेत.गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी मोबाईल क्रमांक व पत्ते बदलत होता. पोलिस निरीक्षक दादाराव शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय तृप्ती तोटावार यांनी आरोपीचा माग काढत जेरबंद केले. वरील कारवाई पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, पोलिस उपायुक्त अपर्णा गिते, प्रभारी सहाय्यक पोलिस आयुक्त अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## आरोग्यवर्धिनी केंद्र जटवाडा येथे स्वच्छता दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**जटवाडा :** आरोग्यवर्धिनी केंद्र जटवाडा येथे आज दि.04/02/2023 रोजी स्वच्छता दिवस पाळण्यात आला यावेळी आरोग्य केंद्र जटवाडा येथील आरोग्य अधिकारी डॉ. नवीन शेख, आरोग्य सेवक तायडे,आरोग्य सेविका श्रीमती मेश्राम मिलिंद कला डॉ. सुरज बन्सी कांबळे सर येथील NSS वाळण टीयर्स यांनी स्वच्छता शिबिरात अस्पूर्तपणे भान घेऊन संपूर्ण आरोग्य केंद्र इमारत आणि परिसर स्वच्छ केला. यावेळी आरोग्य केंद्रतर्फे सॅनिटायझर वाटप करण्यात आले.



## निधोना येथे नवरंग नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील निधोना येथे नवरंग नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित औरंगाबाद शाखेचे उद्घाटन(दि३) शुक्रवारी आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.
नवरंग नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित औरंगाबाद कार्यालय निधोना येथील शाखेचे उद्घाटन विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा फुलंब्री विधानसभेचे आमदार हरिभाऊ बागडे नाना यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आर. आर. पाटील फाऊंडेशन चे अध्यक्ष विनोद पाटील, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देविदास आधाने, यशस्विनी पतसंस्थेच्या अध्यक्षा सविता आधाने, नगराध्यक्ष सुहास शिरसाठ, अनुराधाताई चव्हाण,ऐश्वर्या गाडेकर, राहुल डकले, संजय त्रिभुवन, सरपंच बिजू बाई राऊतराय, उपसरपंच सुभाष राऊतराय,चेअरमन अशोक गाडेकर,अभिषेक गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना विनोद भैय्या पाटील म्हणाले की, आधाने परिवार हा जिल्ह्यामध्ये यशस्विनी महिला पतसंस्था सह त्यांनी अनेक व्यवसायातून उभारी घेतली व त्या संस्थेमध्ये ठेवी ठेवल्या तर त्या ठेवी सुरक्षित राहतील व त्यांचा कारभार पारदर्शक आहे. यावेळी हरिभाऊ बागडे नाना उद्घघाटन पर मार्गदर्शन करताना पतसंस्थेमध्ये ज्यांनी ठेवी घेऊन कर्ज दिले तर ते कर्ज वसुल झाले पाहिजे गोडीने ठेवी घ्याव्या परंतु सतत मागणी करून कर्ज हे वसुलीस प्रधान्य द्यावे सहकारी संस्था चालवताना



कायदा पोट नियम यांचा संस्थेच्या कामकाजात नियमाचे पालन केले तरच सहकारी संस्था पतसंस्थेला यासाठी संस्था चालताना कठोर भूमिका घ्यावी त्या सहकारी चळवळीमध्ये महिला बचत गट करण्याचा सहभाग वाढत आहे.केंद्रांनी महिला बचत गटांना ही केंद्र सरकारने बजेटमध्ये तरतूद केली. त्यामुळे बचत गटांचा संख्या मोठी वाढ झालेली आहे त्यावेळी सुहास शिरसाट अनुराधाताई चव्हाण, सविता अधाने यांनी संस्थेला मनोगतपर शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी विनोद गायकवाड यांनी आभार मानले तसेच या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. परिसरातील सरपंच ,उपसरपंच, सोसायटी चेअरमन, व्हॉईस चेअरमन व सदस्य बचत गटाच्या महिला यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यालयाचे उद्घाटन संपन्न झाले.

# मनसेच्या दणक्याने परतूर पं.स. प्रशासन हादरले

## बोगस शेततळे कागदावर तयार करून शेतकऱ्यांची फसवणूक करून उचलले पैसे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जालना जिल्हा परिषद कार्यालयासह परतुर पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी परतुर बोगस शेततळे, बोगस घरकुल, फुल शेती, बोगस कारभारा बाबत माहिती देताना प्रकाश सोळंके म्हणाले की, मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी जालना यांच्या मार्फत.दि.२ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देऊन तक्रार करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील परतुर पंचायत समिती (एमआरईजीएस) योजने अंतर्गत परतुर तालुक्यातील चिंचोली येथील ५ शेतकऱ्यांची फसवणूक केली म्हणून दि.१६/१/२३/ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योग्य वेळेत तक्रारीची दखल न घेतल्यामुळे चिंचोली येथील श्री.वसंत उत्तमराव चव्हाण, नारायण रंगनाथराव सोळंके या शेतकऱ्यांनी शेतात जेसीबी पोकलेन यंत्राच्या साह्याने दिनांक २६/२७ फेब्रुवारी २०२३ रोजी रात्री रातोरात २ शेततळे खोद काम करुण घेतले.

मोठी कारवाई होणार म्हणून निलंबनाच्या भीतीपोटी, हा निवेजीत कट रचून पैसे लुबाडण्याच्या कटात अडथळा निर्माण झाला म्हणून संबंधित गटविकास अधिकारी परतुर,सहाय्यक अभियंता, तांत्रिक अभियंता, ग्रामसेवक, रोजगार सेवक चिंचोली यांनी शेतकऱ्यांना लुबाडायचे काम थांबले आहे,म्हणून परतूर तालुक्यातील चिंचोली गावातील ५ शेतकऱ्यांच्या शेतात शेततळे नसताना बिल दिले, करण शेततळे नसताना बिल दिले संबंधित अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून अर्धे पैसे तुम्हाला अर्धे पैसे आम्हाला हा फार्मूला वापरून बोगस शेततळे कागदावर तयार करून शेतकऱ्यांची फसवणूक करून पैसे उचलले, म्हणून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांची भेट घेऊन १६ जानेवारी २०२३ रोजी तक्रार केली होती. या शेततळ्याच्या विषयाला वाचा फुटावी म्हणून जालना येथे पत्रकार परिषद घेऊन हा विषय पत्रकार परिषदेमध्ये मांडल्यानंतर अनेक वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर परतुर पंचायत समितीतील



मास्टर माईंड अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू झाली. या नंतर चिंचोली शिवारात रातोरात दोन शेततळे जेसीबीच्या साह्याने निर्माण केले, चिंचोली येथील शेततळे लाभार्थी शेतकरी भगवान गुलाबराव कातारे, सिद्धेश्वर साहेबराव कातारे, महादेव भुजंगराव टेकाळे, वसंत उत्तमराव चव्हाण, नारायण रंगनाथ सोळंके या ५ शेततळे लाभार्थी शेतकरी त्यांच्यापैकी १) वसंत उत्तमराव चव्हाण २) नारायण रंगनाथराव सोळंके या २ शेतकऱ्यांनी जेसीबी यंत्राच्या साह्याने शेततळे खोदले या बाबतचे जिओ टॅग फोटो आहेत पुरावा म्हणून तक्रारी सोबत जोडून देत आहोत असे हि सोळंके यांनी निवेदनात नमूद केले आहे,कारण दिवसाढवळ्या केंद्र व राज्य शासनाच्या डोळ्यात भुरकी टाकून शासनाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या या गटविकास अधिकारी परतुर,सहाय्यक अभियंता,तांत्रिक अभियंता, ग्रामसेवक,रोजगार सेवक चिंचोली या कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणार यात मात्र शंका नाही, शेवटी सोळंके म्हणाले की जिल्हा परिषद आमदार अंतर्गत होणारा भ्रष्टाचार थांबला नाही महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनसे स्टाईल आंदोलन करणार, पत्रकार परिषदेमध्ये उपस्थित मनसे उपजिल्हाध्यक्ष राम नवल, कृष्णा गोवर्धन सोळंके मनसे तालुकाध्यक्ष परतुर, सोपान गोरे मनसे शहराध्यक्ष परतुर, तुकाराम कदम मनविसे शहराध्यक्ष परतूर, अर्जुन मोहिते, आत्माराम जगताप, विश्वंभर कुलकर्णी यांच्यासोबत अनेक महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# १७ वर्षांपासून असलेले अनैतिक संबंध बिघडले; शिक्षकाविरोधात बलात्काराचा गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** १७ वर्षांपासून असलेले अनैतिक संबंध बिघडल्यानंतर शिक्षीकेने सहकारी शिक्षका विरोधात शोषणाची फिर्याद देताच बलात्काराचा गुन्हा पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात दाखल झाला. बालाजी गुंजरगे, धंदा- शिक्षक असे आरोपीचे नाव आहे.

२००६ साली पीडिता ही धामनगाव शिवारातील मारसावळी या जिल्हापरिषद शाळेवर शिक्षीका म्हणून रुजू झाली. त्यानंतर दरम्यानच्या काळात पीडिता व शिक्षकाचे प्रेमसंबंध जुळले त्यापासून पीडितेला मुलगाही झाला. पण आरोपी शिक्षक पीडितेचा व तिच्या मुलाचा सांभाळ करत नसल्याने पीडितेने




३ फेब्रुवारी २३रोजी पोलिस आयुक्तालयाच्या भरोसा सेलकडे बलात्काराची तक्रार दिली. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकिऱ्यांनी दिले. पुढील तपास पोलिस निरीक्षक राजश्री आडे करत आहेत.

# अतिवृष्टीच्या अनुदानाच्या प्रतीक्षेत शेतकरी

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला होतं. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळविण्यासाठी अनेक शेतकरी संघटना व राजकीय पक्षांनी आंदोलने देखील केली होती. यावेळी स्वतः मुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. सरकारने तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अधिकाऱ्याने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या पिकाच्या झालेले नुकसानीचे पंचनामे केले . या मुद्द्यावर विधानसभा व विधानपरिषद दोन्ही सभागृहात गदारोळ झाला होता. परंतु अद्यापही शेतकऱ्यांना अतिवृष्टीच्या अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेली नाही. यामुळे शेतकरी वर्गात सरकार विषयी नाराजीचा सूर उमटून दिसत आहेत. मायबाप सरकारने लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करावी अशी मागणी शेतकरी वर्गात जोर धरू लागली आहे.

अतिवृष्टीच्या अनुदानाची निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने अनेक शेतकरी संघटना आता आक्रमक भूमिका घेणार असल्याचे दिसून येत आहे. अतिवृष्टीच्या अनुदानाच्या भरोशावर शेतकऱ्यांनी उसनवारी व सावकाराकडून खाजगी कर्ज काढून आपल्या शेतात पेरणी केली परंतु अनुदानाची वाट पाहता पाहता गेले चार ते पाच महिने झाले अद्यापही शेतकऱ्यांना सरकारकडून कसलीही मदत मिळालेली नाही.

यातच मुला बाळांचे शिक्षण व कुटुंबाची जबाबदारी कशी सांभाळावी या चिंतेत शेतकरी हवालदील झालेला आहे. सरकारने फक्त पोकळ आश्वासन न देता शेतकऱ्यांना थेट त्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम वर्ग करून त्यांना योग्य ती मदत करावी अशी सर्व शेतकऱ्यांची मागणी आहे.



# वेडगाव शाळेतील प्रतिकृतीची इसरोला भेट देण्यासाठी निवड



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नुकतेच ५० वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सेंट मायकल इंग्लिश स्कूल, चंद्रपूर येथे पार पडले. गोंडपीपरी सारख्या अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषदेची वेडगाव शाळेतील नाविण्यपूर्ण प्रतिकृतीची उत्कृष्टरीत्या सादरीकरण कु.अक्षरा संतोष कळाबे या विद्यार्थिनीने केल्यामुळे इसरो, बेंगलोर या संस्थेत भेट देण्याकरिता निवड झाली.

इसरो (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) ही भारतातील अंतराळ क्षेत्रात कार्य करणारी संस्था आहे.देशाच्या विकासात आजच्या विद्यार्थ्यांना संशोधनात संधी निर्माण व्हावी यासाठी बेंगलोरला भेट देण्यासाठी दरवर्षी निवड केल्या जाते.

तालुका,जिल्हा स्तरावरीय विज्ञान प्रदर्शनात प्रसाधन गृह स्वच्छ करण्याचे यंत्र या प्रतिकृतीचे अतिउत्कृष्ठ सादरीकरण केल्यामुळे मार्गदर्शक विज्ञान विषय शिक्षक मिलिंद मडावी व विद्यार्थिनीला भेट देण्याची संधी प्राप्त झाली आहे.त्याचा फायदा शाळेतील इतर विदयार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल हे निश्चित.

गोंडपीपरी तालुक्यातून भेट देण्यासाठी विद्यार्थ्यासह मार्गदर्शक शिक्षकांची निवड झाल्याबद्दल पंचायत समिती गटविकास अधिकारी शालिक माऊलीकर, गटशिक्षणाधिकारी समाधान भसारकर, केंद्रप्रमुख इंद्रपाल मडावी, मुख्याध्यापक सुधाकर पवार, शेखर मेश्राम, बिरा गोलावार, कचरू कोंडेकर,बाळू शेडमाके, प्रमोद चालूरकर व तालुक्यातील इतर शिक्षक मार्गदर्शक शिक्षक, विद्यार्थिनींचे अभिनंदन करीत आहे.


# डॉ. प्रवीण तोगडिया सोमवारी यवतमाळमध्ये

## हिंदू धर्मरक्षा निधी व संघटन बांधणीबाबत दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ प्रवीण तोगडिया सोमवार दिनांक ६ फेब्रुवारीला यवतमाळात येत आहेत. वीर हिंदू विजेता हिंदू असा संदेश देत त्यांनी विदर्भात दौरा सुरु केला असून आंतर्राष्ट्रीय हिंदू परिषदेची स्थापना केल्यानंतर त्यांचे पहिल्यांदाच यवतमाळ मध्ये आगमन होत आहे. हिंदू धर्मरक्षा निधी संकलन तसेच संघटना बांधणीच्या दृष्टीने तोगडियांचा हा दौरा महत्वपूर्ण मानला जात आहे. डॉ प्रवीण तोगडिया यांनी प्रखर हिंदुत्वाची भूमिका घेऊन देशभरात हिंदू समाज संघटित केला, यवतमाळ मध्ये देखील त्यांनी यापूर्वी केलेल्या दौर्यात अयोध्येत राममंदीर निर्माण, गौहत्या बंदी, शेती व शेतकरी, जनसंख्या नियंत्रण या मुद्यांवर हिंदू समाजात जागृती केली आहे. सोमवारी बोरेले नगर येथील मनीष जयस्वाल यांच्या निवासस्थानी डॉ तोगडिया यवतमाळ जिल्ह्यातील हिंदू समाजातील गणमान्य व्यक्तींच्या भेटी घेतील. तर मंगळवारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून ते अमरावतीला प्रयाण करतील. यावेळी त्यांच्यासोबत आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे प्रांत प्रभारी मोतीलाल चौधरी, प्रांत मंत्री संतोष ठाकूर, राष्ट्रीय बजरंग दल प्रांत अध्यक्ष अनुप जायसवाल, राष्ट्रीय महिला परिषद प्रांत अध्यक्ष अस्मिता भट्ट आदींची उपस्थिती राहणार आहे.




नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार


सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# आणि ते मंगल झाले पुस्तक प्रकाशन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** एच.आय.व्ही बाधित बालकांच्या जीवनात पालवी फुलवणाऱ्या मंगलताई शहा यांचा जीवन प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे. मागील ४० वर्षापासून मंगलताईंच्या सेवा कार्याचा दीप अखंडपणे तेवत आहे. आज त्यांच्या सेवा कार्यावर आधारित ' आणि ते मंगल झाले ' हे पुस्तक दीपस्तंभा प्रमाणे प्रत्येकाला दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

पंढरपूर येथील कर्मयोगी सभागृहात गुरुवारी (ता.२) आयोजित 'आणि ते मंगल झाले' या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बडवे, माजी आमदार प्रशांत परिचारक, कीर्तनकार ॲड.जयवंत महाराज बोधले, पुस्तकाच्या लेखिका ' जोहडकार ' सुरेखा शहा, पुस्तकाचे संपादक सीए पवन झंवर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. माजी आमदार प्रशांत परिचारक आपल्या अध्यक्षीय मनोगतात पुढे म्हणाले, येथील ओसाड माळरानावर मंगलताईंनी एच.आय.व्ही. बाधित बालकांचा पालवी प्रकल्प सुरू केला. त्यांच्या सेवा कार्याच्या वाटचालीचा मी सुरुवातीपासूनचा साक्षीदार आहे. तर कीर्तनकार ॲड.जयवंत महाराज बोधले म्हणाले, मंगलताईच्या नावातच 'मंगल' शब्द आहे. समाजाच्या दृष्टीने 'अमंगळ' असलेल्या वंचित घटकांना त्यांनी आपल्या सेवाकार्यातून मंगल केले आहे. त्यामुळेच 'आणि ते मंगल झाले' हे पुस्तकाचे शीर्षक समर्पक आहे. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बडवे म्हणाले, एच.आय.व्ही. बाधित बालकांसह निराधार महिला, वृद्ध, मनोरुग्ण यांच्या वेदनेवर फुंकर घालण्याचे अनमोल कार्य मंगलताई करीत आहेत. आणि ते मंगल झाले हे पुस्तक म्हणजे या सर्वांच्या वेदनेचा हुंकार आहे. त्यांचा विलक्षण असा प्रेरणादायी जीवन प्रवास जाणून घेण्यासाठी प्रत्येकाने हे पुस्तक आवर्जून वाचले पाहिजे. ज्येष्ठ साहित्यिका सुरेखा शहा म्हणाल्या, मंगलताई यांचे असामान्य सामाजिक कार्य समाजाला माहित व्हावे यासाठीच हा लेखन प्रपंच मी केला आहे. मंगलताई शहा आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, 'जियो और जीने दो ' या उक्तीप्रमाणे समाजातील निराधार गरजू व्यक्तींची निरपेक्षपणे सेवा करणे हेच ध्येय ठेवून आजपर्यंत वाटचाल केली. या वाटचालीमध्ये समाजातील सर्व क्षेत्रातील संवेदनशील लोकांचे मोलाचे सहकार्य लाभले. हे पुस्तक त्याचेच प्रतीक आहे.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, व्हाईस चेअरमन माधुरी जोशी, सर्व नूतन संचालक, सोलापूर बालकल्याण समितीचे अध्यक्ष समीर सय्यद, सदस्य ॲड.सुवर्णा कोकरे, प्रकाश ढेपे, राजस शहा, यांच्यासह पंढरीतील राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, उद्योग आदी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डिंपल घाडगे यांनी तर सूत्रसंचालन स्वाती जोशी यांनी केले. आभार आशिष शहा यांनी मानले.

# मुखेड-बनोटी तलावाचे काम निकृष्ट

## धार दाबण्याआधीच सांडव्याला तडे

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील मुखेड-बनोटी शिवारात गोदावरी पाटबंधारे विभागाअंतर्गत मुखेड-बनोटी साठवण तलावाचे काम सुरू असून, या तलावाच्या सांडव्यासाठी अतिअल्प सिमेंट व ओढ्याच्या वाळूचा वापर करण्यात आला आहे. त्यातच तलावाच्या भिंतीला पिचिंगसाठी तलावातील ठिसूळ दगडाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे या तलावाची धार दाबल्यास पहिल्याच पावसात हा तलाव फुटून त्याखालील गावे बेचिराख होणार असल्याने या कामाची फेर चौकशी करण्यात यावी तसेच भ्रष्ट अभियंत्यावर कडक कारवाई करण्याची मागणी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सय्यद जीलानी सय्यद अकबर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता, यांच्या सह प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मुखेड-बनोटी साठवण तलाव मोजणी करते वेळी पळाशी शिवारातील गट क्रमांक २४ मध्ये केवळ दोनच शेतकऱ्यांकडे फळबाग होत्या, मात्र संबंधित अभियंता नुसरत बेग यांनी शेतकऱ्यांना रेडिमेड पाच ते सहा फुटाची फळबागेची झाडे आणून लागवड करायाला लावून बागायती क्षेत्र दाखवून शासनाचे अधिक पैसे मिळवून दिले आहे.यात त्यांनी शेतकऱ्यांकडून लाखो रुपये घेऊन मोठा घोटाळा केला आहे.

पळाशी शिवारातील सय्यद नाईम गट क्रमांक १९ मध्ये ८० आर क्षेत्र बुडीत क्षेत्रात संपादन केले आहे.हे क्षेत्र बुडीत क्षेत्रात येतच नाही.यात शासनाच्या डोळ्यात धूळफेक करण्यात येऊन शासनाच्या पैसा आपल्या घशात घातला आहे. त्याचप्रमाणे पळाशी शिवारातील शेतकरी सय्यद नूर यांची गट क्रमांक २१ मधील ६५ आर क्षेत्र बुडीत झाल्याने त्यांना शासनाचा मोबदला मिळाला आहे. दरम्यान त्त्यांनी येथील दोन हजार ट्रॉली काळी माती जी तलावाच्या धार दाबण्याच्या कामासाठी उपयोगात आली असती ती दुसरीकडे घेतलेल्या शेत जमिनीत वाहून नेली आहे.यासाठी अभियंता नुसरत बेग यांनी सदर शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन ही माती विक्री केलेली आहे. यात शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

साठवण तलावासाठी संपादित क्षेत्रातील कोरड्या विहिरी अभियंता बेग यांनी शेतकऱ्यांना जेसीबीने खोदून बारमाही पाण्याच्या दाखवून शासनाचे पैसे मिळऊन देण्यासाठी शेतकऱ्यांकडून प्रत्येकी लाखो रुपये उकळून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारला आहे.

या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय फेरचौकशी करण्यात येऊन यात झालेला कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करणाऱ्या अभियंता नुस रत बेग यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावीकारवाई न झाल्यास प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांतर्फे तीव्र आंदोलनाचा ईशारा शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष सय्यद जीलानी व शहीदखा पठाण यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. या प्रकरणी शाखा अभियंता नुसरत बेग यांच्याशी संपर्क केला असता सय्यद जीलानी यांनी केलेले आरोप तथ्यहीन असून मुखेड-बनोटी साठवण तलावाचे काम शासनाच्या नियमानुसार करण्यात आलेले असून सैयद जीलानी यांचे आरोप तथ्यहीन आहेत.

# आयुक्तांच्या बंगल्यासमोर हातगाड्या लावणार

## शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एक महिण्यापूर्वी कायद्याचा अभ्यास करुन पुन्हा बोलावतो, असे म्हणणार्या आयक्तांचा उर्वरीत अभ्यास पुर्ण करण्यासाठी शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनने धरणे आंदोलनात कायद्याचा वर्गच सुरु केला. आजपर्यंत चर्चेसाठी बोलावले नाही व मनपा अतिक्रमण विभागाचे हल्लेही थांबवलेले नाही. म्हणून मनपा आयुक्तांच्या बंगल्यासमोरच कोणत्याही वेळी हातगाड्या लावुत असा निर्वाणीचा इशारा शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन ने दिला आहे . याबाबत असे की, हातगाडी वाल्यांना तुच्छतेने वागवुन जी 20 च्या बैठकीतील पाहुण्यांना हातगाड्या दिसणार नाही अशी व्यवस्था करणे म्हणजे आपल्याच माणसांची आपल्याला लाज वाटण्या सारखे आहे. तेव्हा नाईलाजास्तव मनपा आयक्तांच्या बंगल्यासमोरच हातगाड्या लावणार असा निर्वाणीचा इशारा युनियनने दिला आहे . फेरीवाले फक्त भारतातच नाही तर ,विकसित परदेशात देखील आहेत. पथविक्रेते सुशिक्षित बेरोजगार आहेत, सरकार नोकर्या देत नाही आणि हे तरुण चोर्या करु इच्छित नाही म्हणुन कष्ट करत आहेत आणि तुमचे अतिक्रमण विभागाचे अधिकारी काही राजकारण्यांच्या इशार्यावर पथविक्रेत्यांच्या पोटावर लाथ मारत शहरभर फीरत असतात. पथविक्रेता उपजीवीका संरक्षण व विनिमयन कायदा २०१४ अंतर्गत पथविक्रेत्यांच्या संरक्षणाची जबाबदारी म.न.पा. प्रशासक / आयुक्त यांची अस्थाई शहर पथविक्रेता समितीचा अध्यक्ष या नात्याने आहे. काही-काही दिवसांच्या अंतराने म.न.पा. अतिक्रमण विभागाचे पथक कायद्याचे उल्लंघन करून पथविक्रेत्यांवर हल्ले करीत आहे. आम्ही कायद्याला मानत नाही, असे खूलेआम म्हणत आहेत. म.न.पा. औरंगाबाद अतिक्रमण विभागाच्या पथकाने एन-११, एस.बी.ओ.ए. शाळेसमोरील पथविक्रेत्यांवर हल्ला केला. यावेळी धरणे आंदोलनात ॲड. कॉ. अभय टाकसाळ यांनी पथविक्रेता उपजिवीका संरक्षण व विनिमयन कायदा 2014 चे जाहीर वाचन जनतेच्या न्यायालयात केले.

# पुर्णेत वराहचोरी प्रकरणात गुन्हा दाखल; दहा वराह जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** शहरासह तालुक्यात गाढव वराहांसह अन्य जनावरांच्या चोरीच्या घटना सातत्याने घडत असून असाच एक चोरीचा प्रकार दि.०२ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी ०४-०० वाजेच्या सुमारास पुर्णा शहरातील एकलारे पेट्रोल पंपामागील परिसरात घडला येथील वराह पालक मनोज आनंदसिंग सौदा रा.व्यंकटी प्लॉट पुर्णा यांच्या मालकीच्या एकलारे पेट्रोल पंपा मागील वराह कोंडवाड्यातील तब्बल १० वराह त्यांचा मुलगा राहूल मनोज सौदा घरी जेवन करुन येऊस्तर या ठिकाणी कोणीही नसल्याचा फायदा घेऊन आयशर टेम्पोत भरुन पळवली राहुल सौदा या वराह कोंडवाड्याकडे मोटार सायकलवरुन आल्यानंतर त्यांना टेम्पो जातांना दिसला यावेळी सदरील टेम्पोचा त्यांनी पाठलागही केला परंतु संबंधित टेम्पो चालकाने आयशर टेम्पो सुसाट वेगाने पळवला यावेळी आयशर टेम्पोचा क्रमांक एम.एच ०४ जिसी ४२३३ राहुल सौदा यांनी लिहून तब्बल दोन दिवस शौधाशोध केल्यानंतर दि.०३ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांना वसमत येथील त्यांच्या पाहुण्यांकडून समजले की एक आयशर टेम्पो वराह भरुन परभणीकडे जात आहे. या वराह चोरी प्रकरातील आयशर टेम्पोचा मागोवा घेत मनोज सौदा त्यांच्या परिवारातील त्यांचे नातेवाईक वसमत-परभणी मार्गावरील झिरोफाटा येथे गेले असतांना त्यांना वराह भरलेलाआयशर टेम्पो क्रमांक एम.एच ०४ जिसी ४२३३ हा झिरोफाटा येथे उभा असलेला आढळून आला यात डोकावून पाहिले असता त्यांना त्यांचे मालकीचे कान कापलेले चोरीस गेलेले दहा वराह दिसले यावेळी त्यांनी चालकास नाव विचारले असता त्याने आपले नाव बाबाराव रामदास वानखेडे असल्याचे व सदरील आयशर गाडी अकोला येथील रहिवासी बच्चन यांनी किरायाने केल्याचे सांगितले यावेळी मनोज सौदा यांनी तात्काळ पुर्णा पोलिस स्थानकात फोन करून पोलिसांना घटनास्थळावर बोलावून गाडीसह चालक बाबाराव वानखेडे व बच्चन यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी आरोपी चालक बाबाराव वानखेडे व बच्चन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पौष्टिक तृणधान्य काळाची गरज : सुरेंद्र पवार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षे 2023 निमित्त धर्माबाद येथे तालुका स्तरीय कार्यशाळेचे आयोजन बुधवारी (ता.1) करण्यात आले होते. भारत सरकारने यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले.मानवी जीवनात तृणधान्यचे महत्व अधोरेखित व्हावे यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोविंद पाटील सोनटक्के हे होते.

या कार्यशाळेचे प्रस्ताविक करताना धर्माबादचे कृषी अधिकारी सुरेंद्र पवार म्हणाले की,धर्माबाद तालुक्यात पुर्वी टाळकी ज्वारी हा पिक प्रामुख्याने घेतल्या जात होते.मात्र आता ज्वारीच्या लागवडीचे क्षेत्र कमी झाले आहे.आपल्याला ज्वारी, बाजरी, मका,राळा, राजगिरा,नाचणी यासारख्या तृणधान्यातुन खनिजे व जीवनसत्त्वे मिळतात.याअभावी मानवी जीवन विपरीत परिणाम होतो.प्रकल्प आधिकारी एस.एल. बोरगावे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की,शासनाने हे वर्ष तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केल्यामुळे त्याचा लाभ शेतकऱ्यांना होईल त्यामुळे शेतकऱ्यांनी तृणधान्याची लागवड करावी. तसेच लोकांनी आपल्या आहारात तृणधान्याचे खाद्य वाढविला पाहिजे तरच आपण सुदृढ व निरोगी बनू शकतो. या प्रसंगी बळीराम पा. रामपुरकर, कृषीप्रक्रिया उद्योजक दिगांबर खपाटे बन्नाळीकर, अविनाश जैरमोड,मोहन पाटील बन्नाळीकर यासह महीला बचत गट,FPO, शेतकरी गट,शेतकरी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन माधुरी उंदावत यांनी केले तर आभार प्रदर्शन लखमोड सर यांनी केले. ह्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी सहायक लक्ष्मण जालावार,संतोष डोपलवार,नरसीकर सर व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची असून त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा .बँक कोणाचीही अडवणूक करणार नाही .आम्ही सर्वोत्परी सहकार्य करू .

**बद्रीनाथ चाटे, मॅनेजर,एसबीआय, धर्माबाद .**

तृणधान्याचे मानवी आहारात असायला हवे .त्यामुळे मानवाचे आरोग्य निरोगी राहते .मात्र जंकफूड, फास्टफूडमुळे जिभेचे चोचले पुरविले जात असले तरी आरोग्यासाठी तृणधान्यच पोषक आहे .

**विश्वास अधापुरे, कृषी विकास अधिकारी**



# वैजापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील विनायकराव पाटील महाविद्यालय येथे दिनांक 3 फेब्रुवारी ते 5 फेब्रुवारी 2023 रोजी जि प अधिकारी व कर्मचारी यांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेमध्ये वैजापूर तालुक्यातून अधिकारी आणि कर्मचारी अश्या अनेक खेळाडूंनी मैदानी खेळ, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस, धावणे यात सहभाग घेतला. तसेच दि 4 फेब्रुवारी ला कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, बॅडमिंटन तर दि 5 फेब्रुवारी ला जलतरण, क्रिकेट आणि सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजनसुद्धा करण्यात आले आहेत.

या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी विठ्ठल हरकल तर प्रमुख पाहुणे हेमंत उशीर, बोयनर एच. आर. ,अमेय पवार, मनीष दिवेकर, म्हस्के बी.के. संजय चव्हाण,रॉयल धुळे आदी अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती. या स्पर्धेचे उद्घाटन हरकल यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व खेळाडूंना शपथ देऊन स्पर्धेला सुरुवात झाली. पंच म्हणून गजानन गायके, बाळासाहेब व्यवहारे, भरत निंबाळकर, अंजुम पठाण, रामदास पिंपळे, मुनवर शेख, सुरेश कसबे, विजय दारवंटे, उषा अंभोरे, सारिका कुहिले, जनार्दन खिल्लारे, मोहन निकम, रमेश कवडे, भीमराव वाठोरे, भारत पवार, संतोष बरबंडे, के. डी मगर, विकास घोरड, शेख हनीफ, लक्ष्मण नरसिंगे, मनोज सोनवणे आदींचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शहाणे यांनी केले. तर खेळाडू वृत्ती असलेले सहाय्यक गटविकास अधिकारी अमेय पवार यांनी आभार मानले. प्रसंगी पत्रकार प्रशांत त्रिभुवन सुनील त्रिभुवन सह आदींची उपस्थिती होती.




# मनोरंजनातून हसत खेळत नवमतदार समजून घेत आहेत मतदानाचे महत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**प्रमोद पाणबुडे**

**वर्धा :** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात हसत खेळत मनोरंजनातून जनजागृती केली जात आहे. सापसिडी, लुडोचा आनंद घेत घेत नवमतदार मतदानाचे महत्व, मतदार नोंदणी, निवडणूक आयोगाचा इतिहास समजून घेत आहे. मुलांच्या या खेळात अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकांत देशपांडे यांनी सहभाग घेतला. खेळात विजयी झालेल्या मुलांना त्यांनी बक्षिसे दिली.

गेल्या तीन वर्षांपासून साहित्य संमेलनात निवडणूक जनजागृती या विषयवार विविध उपक्रमांसह विशिष्ट परिसंवाद निवडणूक आयोगाच्यातीने आयोजित केला जातो. आयोगाच्यावतीने वर्धा येथील संमेलनात आयोगाच्या या उपक्रमांना नवमतदारांसह सर्वसामान्य नागरिक, मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे. विशेष म्हणजे आयोगाच्या जनजागृती खेळांचा नवमतदार आनंद घेत असल्याचे दिसत आहे. आयोगाच्यावतीने चार स्वतंत्र दालने लावण्यात आली आहे. त्यातील दोन दालनांमध्ये निवडणूक आयोगाच्या स्थापनेपासूनचा आतापर्यंतचा इतिहास दाखविण्यात आला आहे. आयोगाचा हा रंजक आणि तेवढाच खडतळ प्रवास पाहतांना लोकशाहीच्या सुरुवातीपासूनचे आतापर्यंतचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. याठिकाणी स्वतंत्र भारताच्या पहिल्या मतदाराचा फोटो व माहिती तसेच निवडणूक प्रक्रियेत होत गेलेला बदल दर्शविण्यात आला आहे.

दुसऱ्या दालनात निवडणूक आयोगाच्यावतीने प्रकाशित व निवडणूक जनजागृती विषयक पुस्तके ठेवण्यात आली आहे. ही पुस्तके विक्रीस सुध्दा उपलब्ध आहे. याच ठिकाणी संमेलनात येणाऱ्या नागरिकांना मतदानाचे महत्व, मतदार नोंदणी, नोंदणीतील बदल करण्याची सोय उपलब्ध आहे. याठिकाणी उपस्थित असलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यासाठी नागरिकांना लागणारे सर्व सहाय्य उपलब्ध करून देत आहे. संमेलनातील ग्रंथ प्रदर्शनाच्या परिसरात विशेष जनजागृती चित्रफित दाखविण्यात येत आहे. ही चित्रफित देशातील विविध भाषांमध्ये आहे. याच ठिकाणी जनजागृती सापसिडी व लुडोचा खेळ आहे. येथे नवमतदार या खेळांसोबत मतदानाचे महत्व समजून घेत आहे. या खेळांना मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकांत देशपांडे यांनी भेट देऊन नवमतदारांसोबत खेळात सहभाग घेतला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, निवडणूक उपजिल्हाधिकारी प्रविण महिरे, उपविभागीय अधिकारी सुरेश बगळे, तहसिलदार रमेश कोळपे उपस्थित होते.

# खामगावकडे जाणाऱ्या एसटीला अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** येथून खामगावकडे जाणाऱ्या एसटी बसला झालेल्या अपघातात चालक वाहकासह किमान पंचवीस प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये बुलढाण्यासह अकोला व वाशीम जिल्ह्यातील राहिवासीयांचा समावेश असून, त्यांना मेहकर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमीपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सूत्रांनी सांगितले.

आज शनिवारी ( दि. ४) दुपारी दीड वाजताच्या सुमारास खामगाव आगाराची (एम एच -एन ८२८९ क्रमाकाची) बस सुकाणूमधील (स्टेअरिंग) बिघाडामुळे मार्गानजीकच्या झाडाला धडकली. मेहकर खामगाव मार्गावरील पाथर्डी घाटात हा अपघात झाला. जखमी प्रवाशांची संख्या जास्त असल्याने काही काळ गदारोळ उडाला. घटनास्थळी जानेफळचे ठाणेदार राहुल बोंदे व सहकाऱ्यांनी भेट देऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. अपघातात चालक विवेक काळे, वाहक बाळू गव्हाणे यांनाही दुखापत झाल्याचे सांगण्यात आले.

तपशील पुढीलप्रमाणे आहे. कांताबाई अवचार वय ६२ वर्ष रा. कोटा शिरपूर तालुका मालेगाव जिल्हा वाशिम, सुरेश जनार्दन खराटे वय २७ वर्ष रा. जोगेश्वरी तालुका रिसोड जिल्हा वाशिम, प्रयागबाई जनार्दन खराटे वय ६० वर्ष राहणार जोगेश्वर तालुका रिसोड, शेख यासीन शेख खुबन वय ७० वर्ष राहणार नवघरे मंगरूळ ता. चिखली, अब्दुल रशीद अब्दुल कादिर वय ७२ वर्ष राहणार बाळापूर जिल्हा अकोला, मनोरमा गबाजी मिसाळ वय ६५ वर्ष राहणार मलकापूर पांगरा तालुका सिनखेडराजा, रोहिणी घनश्याम जाधव वय १५ वर्षे राहणार पाथर्डी तालुका मेहकर, ऋतुजा जीवन जाधव वय १५ वर्षे, शंकर रामा कांबळे वय ७५ वर्ष रा. मारुती पेठ तालुका मेहकर, सीताराम नानू चव्हाण वय ७५ वर्ष राहणार शिर्ला नेमाने ता खामगाव, प्रीती बुढन मार्कंड वय १४ वर्ष राहणार लाखनवाडा, भावेश मूलचंद राठोड वय १६ वर्ष रा. पाथर्डी, हरिभाऊ त्रंबक सोळंके वय ६५ वर्ष रा. पारखेड फाटा, अनुसया हरिभाऊ सोळंके वय ५५ वर्ष रा. पारखेड फाटा, कविता गोपाल एकनाथ वय १९वर्ष, अमित घनश्याम जाधव वय १६ वर्ष रा. पाथर्डी, स्नेहा केवलसिंग चव्हाण वय १६ वर्ष रा. पारखेड, किरण मुरलीधर राठोड वया १८ वर्ष रा. पारखेड, अश्विनी कैलास राठोड १६ वर्ष रा. पाथर्डी, रेखा प्रकाश चव्हाण १६ वर्ष पारखेड, वेदिका सुरेश जाधव १६ वर्ष पारखेड, कोमल रोहिदास राठोड वय १६ वर्ष पारखेड, राणी नवलचंद जाधव १६ वर्ष पारखेड, सोनू संतोष जाधव वय १६ वर्ष. दरम्यान, घटनास्थळी एसटी महामंडळाचे कार्यशाळा अधीक्षक हर्षल साबळे, खामगाव आगार व्यवस्थापक रणवीर कोळते, तसेच प्रवीण तांगडे, संजय मापारी, अंकित शिंदे यांनी भेट देऊन बसची पाहणी केली.



आधुनिक केसरी न्यूज

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय औरंगाबाद येथील अत्याधुनिक सोनोग्राफी यंत्राचा वर्षपूर्ती सोहळा आज संपन्न झाला तो आठवणीतील क्षण आनंद द्विगुणीत करणारा ठरला...कदाचित राज्य कामगार विमा योजनेत पहिल्यांदाच एखाद्या यंत्राचा वर्षपूर्ती सोहळा झाला हा योगायोग वाटतो.


काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in